
# श्री साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक



**श्री साईबाबांच्या संदेशाचा जगभर प्रसार करणे हे श्री साईलीलाचे मुख्य उद्दिष्ट आहे.**



# श्री साई वाक्सुधा

सत्संगे नासे देहाभिमान।
सत्संगे तुटे जन्ममरण।
सत्संगे भेटे चैतन्यघन।
ग्रंथविच्छेदन तात्काळ॥ १४८॥

पावावया उत्तमगति।
पावन एक संत संगति।
शरण जातां अनन्यगति।
निज विश्रांति आंदणी॥ १४९॥

नाहीं नाम नाहीं नमन।
नाहीं भाव नाहीं भजन।
तया कराया निज परायण।
संत महाजन अवतार॥ १५०॥

गंगा भागीरथी गोदा।
कृष्णा वेण्या कावेरी नर्मदा।
याही वांच्छिती साधूंच्या पदा।
येतील कदा स्नानार्थ॥ १५१॥

जगाचीं पातकें स्वयें क्षालिती।
परी तयांची पाप निवृत्ति।
विना संत पद प्राप्ति।
होईना ती कदापि॥ १५२॥

— श्री साई सच्चरित् अध्याय १० वा.

# सुविचार

परोपकाराय फलन्ति वृक्षाः
परोपकाराय दुहन्ति गावः।
परोपकाराय वहन्ति नद्यः
परोपकारार्थ मिद शरीरम्॥

दुसऱ्यावर उपकार करण्यासाठी झाडांना फळे येतात, दुसऱ्यांवर उपकार करण्यासाठी गाई दुध देतात, दुसऱ्यावर उपकार करण्यासाठी नद्या वाहतात. तसेच हे शरीरही परोपकारासाठीच आहे.

या मासिकात प्रकाशित झालेल्या लेखातील मतांशी संपादक सहमत आहेतच असे नाही.


# श्री साईलीला - अनुक्रमणिका - जून १९८६


| क्रमांक | शिर्षक | लेखक-कवी नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | संपादकीय | — साई म्हणजे साक्षात् ईश्वर | ४ |
| २. | श्री अवतार साईनाथ | — श्री. वि.म. हटवार | ५ |
| ३. | श्रद्धा ही कधीही अंध असत | — श्री. कृ.व्यं. हवालदार | ७ |
| ४. | भिक्षान्न | — डॉ. सुमती खानविलकर | ८ |
| ५. | अन् मी अवाक् झालो | — डॉ. अनिल मोरे | १० |
| ६. | जया मनी जैसा भाव | — श्री. सुरेश बोवलेकर | १२ |
| ७. | श्री साईनाथांचा शरणार्थी | — श्री. विश्वास खेर | १३ |
| ८. | चला शिरडीला | — श्रीमती कमल मुळये | १६ |
| ९. | खापर्डे यांची शिरडी दैनंदिनी १३ | — साईनंद | १७ |
| १०. | देह देवाचे मंदिर | — श्री. भालचंद्र गन्द्रे | २० |
| ११. | साईकृपेने नातू बरा झाला | — श्री. भास्कर जोशी | २१ |
| १२. | ११ व्या अध्यायाचे महत्व | — सौ. मथुराबाई हिब्बारे | २२ |
| १३. | बाबांची शिकवण | — श्री. शां.ना. अवचट | २३ |
| १४. | बाबांनी हाक ऐकली | — श्री. पांडुरंग भुजबळ | २४ |
| १५. | वाट जाते शिरडीच्या गावा | — सौ. कलावती चव्हाण | २६ |
| १६. | साईभक्ती-साईशक्ती | — श्री. गणेश बडगुजर | २७ |
| १७. | तव चरणी पाहू दे साई | — श्री. विजय हजारे | २९ |
| १८. | साईनाथांनी घेतलेली परीक्षा | — श्री. दिनकर वर्दम | ३० |
| १९. | दर्शन द्यावे साईदेवा | — कु. रंजना बोन्हाडे | ३१ |
| २०. | हे साई तू आई आहेस | — श्री. अशोक माहिमकर | ३२ |
| २१. | बाबांनी भक्ताची लाज राखली | — श्री. वि.गो. पाठक | ३३ |
| २२. | कासवी | — सौ. भावना जेऊरकर | ३४ |
| २३. | साई मज दिसला | — श्री. बा.बा. चमणकर | ३५ |
| २४. | श्री साईनाथांची अशी कृपा | — सौ. नीलम देशपांडे | ३६ |
| २५. | बाबांचे नमस्कार करावयास लावणारे चमत्कार | — श्री. सत्यवान गायकवाड | ३७ |
| २६. | माझा शिरडीतील पहिला अनुभव | — श्री. शं.ग. सारंगकर | ४० |
| २७. | साई माऊली | — श्री. पी.के. गोघ | ४३ |
| २८. | साई कृपेचा वर्षाव | — कु. तेजस्विनी तारळेकर | ४६ |
| २९. | साईऋण मुक्त आपण होऊ का? | — श्री. मधुकर अंबाडे | ४७ |
| ३०. | साई चुकवा जन्म मरण फेरा | — सौ. संगीता गोडबोले | ५० |
| ३१. | एक शोध साईरामाचा | — श्री. चकोर आजगावकर | ५१ |
| ३२. | साईइच्छा बलियेसी | — श्री. आशिष हजारे | ५२ |
| ३३. | वेताळास मुक्ती मिळाली | — सौ. निर्मला मालवणकर | ५३ |
| ३४. | समाधीस ज्याचे लागतील पाय | — श्री. विजय सहस्रमते | ५४ |
| ३५. | चित्तशुद्धी हाच आनंद | — श्री. प्रमोद रायसोनी | ५५ |
| ३६. | धाव धाव श्री साईनाथा | — सौ. रेखा माहिमकर | ५६ |
| ३७. | बाबांची सप्रेम भेट | — | ५७ |
| ३८. | साईनाथ या हो | — श्री. ग.रा. पालकर | ५८ |
| ३९. | श्री साई | — कु. लीना पराडकर | ५८ |
| ४०. | शिरडी वृत्त | — जाने. ८६ | ५९ |
| ४१. | शिरडी वृत्त | — मार्च-एप्रिल ८६ | ६१ |

## साई! साई! साई!



## * साई म्हणजे साक्षात ईश्वर *



संत चूडामणि भगवान साईबाबा आज देहरूपाने आपल्यात वावरत नसले तरी निराकार अंशरूपाने त्यांचे वास्तव्य सर्व चराचरात आहे यात संशय नाही. बाबांच्या भक्तांना श्रीसाईनाथांच्या अस्तित्वाचे त्यांच्या प्रचितीबद्दलचे अनुभव, त्यांचे· संबंधीचे साक्षात्कार पदोपदी येत आहेत आणि यामुळेच की काय श्रीसाईनाथांचे भक्त जगभर आज आहेत. क्षणाक्षणाला त्यांची संख्या वाढत आहे. ठिकठिकाणी श्रीमहाराजांची मंदिरे बांधली जात आहेत. त्यातून बाबांच्या पाषाणमूर्तींची स्थापना केली जात आहे. पूजा, अभिषेक, आरत्या, दर्शन, इ. विविध विधी मोठ्या प्रमाणावर रोजच्या रोज होत आहेत. उत्सव कालात मंदिरातून तोबा गर्दी उडत आहे. बाबांच्या सुकीर्तीचे, सुयशाचे, सुकार्याचे हे गमक होय असेच म्हणावयास हवे.

श्री साईबाबा श्रेष्ठ संत होऊन गेले असले तरी त्यांना भगवंताचाच मान दिला पाहिजे. त्यांनी आपल्या हयातीत आपल्या भक्तांना श्रीशंकराचे, विठ्ठलाचे, प्रभूरामचंद्राचे, श्री अक्कलकोट स्वामींचे दर्शन देऊन तृप्त केले आहे. आपल्या भक्तावर त्यांनी असीम माया केली आहे. आपल्या हिंदू पुराणातून, तसेच धार्मिक ग्रंथातून देवाचे अस्तित्व मान्य केले गेले आहे. हिंदू धर्मियांची तर देवाच्या अस्तित्वावर पूर्ण श्रद्धा आहे, विश्वास आहे, आणि त्या श्रद्धा व विश्वासाच्या आधारावरच तो आपले जीवन जगत आहे. ईश्वरी साक्षात्कार कसा व केव्हा होईल ही मात्र अगम्य बाब आहे, व त्यावर विचार करणेही योग्य नाही. तथापि ईश्वरी साक्षात्कार भक्ताच्या मानवी देहाला एकदा तरी होतोच होतो यात प्रत्यवाय नाही. त्याबद्दल संशय बाळगण्याचे मुळीच कारणही नाही. कुणाला हा साक्षात्कार कळून येतो कुणाला उशीरा कळतो, तर कुणाला तो कळूनही येत नाही. एवढाच फरक.

भगवद्‌गीतेत श्रीकृष्ण भगवानाने अर्जुनास स्पष्ट सांगितले आहे की -

यदा यदाहि धर्मस्य ग्लानिर्भवती भारत
परित्राणाय साधुनाम विनाशायच दुष्कृताम् ।
धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे

याचा अर्थ असा ज्यावेळी मानवी देह कर्तव्य पराङमुख होऊन दुसऱ्या बाबींकडे लक्ष पुरवितो आणि समाजात अकर्तव्य स्थापित करण्याचा प्रयत्न करतो, धर्माच्या हानीला करणीभूत होतो त्यावेळी मानव प्राण्याला परत कर्तव्य परायण करण्याकरिता, समाजातील निष्क्रियता नष्ट करण्याकरिता भगवंताला रूप, देह धारण करून या पृथ्वीतलावर येऊन

मानवी वृत्तीला स्वकर्तव्य, तसेच परकर्तव्याची जाणीव करून द्यावी लागते इतकेच नव्हे तर ही संपूर्ण जबाबदारी त्याला घेऊन मानवी प्राण्याकडून ते सर्व करवून घ्यावे लागते. अत्याचाराचा निषेध, कर्तव्याची हेळसांड आणि सद्‌भावना विनाकारण त्रास देणाऱ्या किंवा छळ करण्याच्या त्याच्या आसुरी प्रवृत्तीला आळा घालण्याचे काम अशा देहधारी भगवंतालाच पार पाडून न्यावयाचे असते; ते पार पाडण्यासाठी त्याला विविध उपायही योजावे लागतात.

अर्जुन हा श्रीकृष्णाचा मित्र असला तरी त्याचा तो निस्सीम भक्त होता. श्रीकृष्णाचे वचन म्हणजे अर्जुनाला देव वाणीच होती; आणि या वाणीतून निघालेला प्रत्येक शब्द झेलण्यास तो तयार असे. या त्याच्या श्रद्धेमागील हेतु काय? कोणती अशी शक्ती अर्जुनाला हे करण्यास भाग पाडीत असे? या प्रश्नांची उत्तरे अगदी सोपी आहेत आणि ती म्हणजे श्रीकृष्ण हे मानव देहधारी जरी होते तरी ते प्रत्यक्ष भगवान होते आणि आपल्या भक्ताच्या-अर्जुनाच्या-सहवासाने ते राहात असत. ईश्वराचे अस्तित्व व त्याच्या लीला त्याला अगम्य वाटत असत तरी त्या मागील शक्तीचा कधीच त्याने निषेध केला नाही.

महाभारतात याचे ठळक उदाहरण दाखविता येते. भीष्मासारख्या रणधुरंधर योद्ध्याला अर्जुनासारख्या महारथीलाही धाराशर्या करणे शक्य झाले नाही. भीष्माचार्यांना शरपंजरी - अर्थात्च धाराशर्या-करण्याकरिता शेवटी श्रीकृष्णाला सुदर्शन चक्रच हाती घ्यावे लागले, आणि भीष्माचे पारिपत्य करावे लागले. एकीकडे संरक्षण आणि दुसरीकडे भक्ताची लाज राखणे यावरून काय दिसून येते तर एकीकडे मानवी शक्तीकडून जे अशक्य ते शक्य करण्याकरिता एक विराट शक्ती अस्तित्वात येते आणि ती शक्ती म्हणजेच ईश्वराचे अस्तित्व.

जे कार्य भगवान श्रीकृष्णाने केले तेच कार्य भगवान श्रीसाईंनी आपल्या भक्तांसाठी केले. अनेक भक्तांनी यामुळेच की काय "साई" म्हणजे स+आई आईच्या वत्सलतेने ममतेने सांभाळारा, जोपासणारा, असा आतापर्यंत केलेला आहे. पण आज आम्ही मात्र 'साई' म्णजे "साक्षात् ईश्वर" असाच खराखुरा अर्थ भक्तांसमोर ठेवीत आहोत. साईबाबा म्हणजे खरोखरीच परमेश्वर. भक्तांनो, बाबांनी दिलेले संदेश, आदेश, उपदेश यांचे पालन करा, बाबांचे अडीअडचणीतच असताना नव्हे तर एरवीही नामस्मरण करा आणि साई म्हणजे साक्षात ईश्वर हा खराखुरा अर्थ तुम्हाला पटतो की नाही हे तुमचे तुम्हीच ठरवा हं.

●

# श्री अवतार साईनाथ

— श्री. वि.म. हटवार,
१४९, रेशीमबाग, नागपूर - ९.

परमहंस जीवनमुक्त अवस्था असणाऱ्या संतांचा अवतार होतो. श्री साईबाबा कुठले, त्यांचा जन्म केव्हां झाला याचा उलगडा होणे हे साधारण सर्वसामान्य माणसाच्या आवाक्याबाहेर आहे. म्हणून नदीचे मूळ व ऋषीचे कुळ शोधू नये असे म्हणतात. शिरडी स्थानी अवतार कार्य झाले.

साईबाबा नाम लाभले। आवडे बहु चित्त रंगले।
दुष्ट दुर्मती रोग वारिले। अपार संकटी भक्त रक्षिले।
नमन माझे गुरुवारी। आपुल्या ब्रीदासी सत्य करी।
नमन माझे कृपाळू साईश्वरा। गुणप्राज्ञा भक्तप्रियकरा।

तोंडाने **"अल्लाह मालिक"** गुणगान करीत आपल्या भक्तगणांच्या भेटी घेऊन मिळेल ती भाकरी खावी व इतरांना वाटावी हा नित्यनियम. भक्तांची भाजी भाकर भक्तीभावाने अर्पण केलेली असल्यामुळे तिची गोडी चाखून साईनाथांना परमानंद होई. श्री साईंचे चरित्र साईलीला मासिकातून जनसामान्यास सांगावे हे परमपवित्र कार्य आहे. श्री साईबाबा शिरडी निवासी जनांचे रक्षण आपल्या अपत्याप्रमाणे करीत. ह्या भक्तप्रेमामुळे दररोजचा नित्यक्रम श्रीहरींचे चिंतन, कथा-किर्तन, श्रवण असाच होता. भक्ताने साई दरबारात एखादी इच्छा मनात आणून तिच्या पूर्ततेविषयी दृढ निश्चय बाळगून, ती इच्छा अंतर्मनाला भिडली की कार्यसिद्धी झालीच पाहिजे. जसा शुद्ध विचार तसे फळ, म्हणून विचारावर पूर्ण श्रद्धा असणे आवश्यक आहे.

श्री साईबाबाने दररोज संसारात व्यथांनी पिडलेल्या लोकांसाठी कांही मार्गदर्शन करावे. त्यांच्या आयुष्यातील प्रश्नांना देता आली तर उत्तरे द्यावीत. मित्रांनो, संकल्प व सिद्धी यामध्ये नेहमी ईश्वरेच्छा उभी असते. मन प्रसन्न, समाधानी असेल तर सबुरीने मानवी कृती साकार होते. मनाची चलबिचलता नष्ट होऊन चित्त एकाग्र व्हावे, विचार समृद्ध व्हावेत व बुद्धि तीव्र व्हावी असे वाटत असेल तर श्री साईनाथास शरण जावे. हे जर वाचकाला जमले तर त्याच्या आयुष्याची दिशाच बदलेल. अंधश्रद्धेने कोणाच्या बुवाबाजीस बळी पडू नये. मनःशांती आणि मनाचा विकास होण्यास मानसपुजेला महत्त्व आहे.

अध्यात्मज्ञानाने, मासिकातील भक्तानुभवाने माणूस विकारांवर मात करून आपल्या उन्नत्तिसाठी व भविष्यकाळ चांगला व्हावा म्हणून संतश्रद्धेने प्रेरित होऊन सुखी होतो. आत्मज्ञानाने परमार्थ साधणे ही यशस्वी जीवनाची गुरुकिल्ली आहे. जागृत मनावर प्रभावी परिणाम होत असतो. ज्यांना श्रीसाईबाबांचा सहवास लाभला त्यांच्या जीवनाचे सार्थक झाले. संतांचा सहवास मिळाला तर आपल्या जीवनाचे स्वरूप बदलते. त्याचप्रमाणे सत्पुरुषांचे मन सात्विक असल्यामुळे साईक्षेत्री त्यांच्या मनांतील सात्विक प्रवाद आपल्या मनातील अस्वस्थता दूर करतात. हा आनंद दिव्य असतो. कित्येक विद्वान साईश्वरावर निःस्सीम भक्ती करणारे आहेत. अशांना विश्वातील आनंद व प्रेम उपभोगता येते. अवतारी साईने दिलेले आशीर्वाद खरे ठरले आहेत.

**जुलै अंक - खास गुरुपोर्णिमा अंक**

**श्री साईलीलाचा पुढील अंक गुरुपोर्णिमा अंक म्हणून १ जुलै रोजी थाटात प्रसिद्ध होईल.**

# श्रद्धा ही कधीही अंध असत नाही.

— श्री. कृ.व्यं. हवालदार,
'गंगाधर निवास',
जयचामराज नगर, हुबळी ५८० ०२०.

सद्गुरु साईनाथांनी श्रद्धा आणि सबुरी हे दोन अर्थपूर्ण मंत्र जीवनसाफल्यासाठी दिलेले आहेत. एकनिष्ठतेने भारावलेल्या मनात डोळस श्रद्धा सदैव जागती असते. श्रद्धा निरपेक्ष असावी. आपण इतक्या श्रद्धेने देवाला भजतो तरी जीवनातली दुःखे आणि संकटे दूर होत नाहीत असा विचार श्रद्धाळू माणसाच्या मनालाही स्पर्श करू नये म्हणून बाबांनी दिलेला दुसरा दिलासा 'सबुरी'.

विज्ञानाची प्रगती कितीही प्रचंड असली तरी विज्ञानाला आजही परमेश्वरी शक्तीच्या अस्तित्वाचा शोध लावता आलेला नाही. परमेश्वर हा खरोखरच भक्तांच्या भेटीला जातो असे म्हणतात आणि याची प्रचीती कांही ठिकाणी येते हे खरे असले तरी विज्ञानयुगात अशा घटकांना तुच्छ लेखण्याची उच्च विद्याविभूषितांची फॅशन बनली आहे, आणि या तुच्छ लेखण्याच्या भूमिकेतूनच अंधश्रद्धा हा शब्द आकाराला आला आहे. श्रद्धा ही कधीही अंध असत नाही. दिसायला एक आणि मनात भलत्याच भावना-याला श्रद्धा म्हणता येत नाही. श्रद्धेत एकनिष्ठ निश्चल भावना ही महत्त्वाची असते. देखावा हे श्रद्धेचे अंग असूच शकत नाही. पैशाच्या मागे धावू लागलेल्या जगात श्रद्धा आणि संस्कृती ही दोन्ही नष्ट झालेल्या असल्याने स्वार्थ आकाराला आला. देवाच्या दारात सुद्धा हा स्वार्थ भक्तांच्या मनी मानसी डोकावू लागला आणि श्रद्धेची जागा ठिसूळ बनत गेली. पण जन्मजात परमेश्वरी शक्ती घेऊन 'मी अल्लाचा बंदा आहे' म्हणून कार्य करणाऱ्या साईबाबांसारख्या महान विभूती 'श्रद्धा' आणि 'सबुरी'चा महान उपदेशच मानवाच्या आणि अखिल जगाच्या कल्याणासाठी जेव्हा देऊन जातात; आपल्या हयातीत चमत्कारांनी लोकांना भारावून टाकतात. परमेश्वराजवळ, धर्मजातीचे बंधन नसते असे निक्षून सांगतात. एवढेच नव्हे तर स्वतःच्या आचरणातून प्रगट करतात. त्यांचे सामर्थ्य आणि शिकवण तुच्छ लेखता येत नाही.

पैसा मिळविणे हीच ज्याची श्रद्धा आहे तो नेहमी प्राप्तीवरच लक्ष्य केंद्रीत करतो, स्वार्थाने जीवन सुखी होते अशी ज्याची श्रद्धा असेल असा माणूस भल्याबुऱ्याची चाड न बाळगता स्वार्थालाच सदैव पूजत असतो. याचाच अर्थ मनाच्या अशा प्रकारच्या धारणेमुळे जीवनाची बैठकच तशी झालेली असते. मात्र परमेश्वरावरील श्रद्धा नेहमी निर्मळ, एकाग्र, उपासनेतून आकाराची लागते. देव भावाचा भुकेला असे नेहमी म्हटले जाते हे सत्य आहे. श्रद्धा या भावनेला कुठलीही तडजोड मान्य होत नाही. 'श्रद्धा' हे मानवी जीवनाचे मूळ स्तोत्र आहे असे म्हटल्यास वावगे ठरू नये, आणि म्हणून सद्गुरु साईनाथांनी दिलेला हा महामंत्र मानवजातीच्या आणि जगाच्या कल्याणासाठी आहे.

अंधश्रद्धा हा शब्द अलिकडे सतत कानावर पडत असतो. अंधश्रद्धेचा उगम अचूक श्रद्धास्थान न गवसण्यात आहे आणि श्रद्धास्थानांचा आभास निर्माण करणाऱ्या आणि पिशाच्च विद्या अथवा जादूटोणा करण्याच्या विद्येच्या जोरावर चमत्कार करून दाखविणाऱ्यांनी भोळ्या माणसांना फसविले अथवा बनवले तर त्याचे स्वरूप विकृत बनते. अशा विकृत मनोवृत्तीतून आणखी एक शब्द आकाराला आला त्याचे नाव 'बुवाबाजी'. विकृती हा बुवाबाजी आणि अंधश्रद्धेचा आधार आहे.

कुठलीही महान विभूती, सदाचरणी आणि परमेश्वरी सामर्थ्य घेऊन भक्तजनांच्या कल्याणासाठी प्रगट होते तिच्या मनी विकृती नसते. म्हणूनच श्री साईनाथांबद्दल श्रद्धा निर्माण होते तेव्हा बाबा मुसलमान होते की हिंदू हा शूद्र विचारही मनात डोकावत नाही. मंदीर आणि मस्जिद समिप आणणाऱ्या बाबांनी 'सबका मालिक एक है' हे सांगण्याचा हेतू एकच आणि तो म्हणजे धर्म निरपेक्षता. जाती आणि वर्णभेद ही मानवाने निर्माण केली. परमेश्वरांनी नाही, आणि म्हणून 'श्रद्धा' या शब्दाला अधिक व्यापक अर्थ आहे.

शोध लावणारा संशोधक जेव्हा हाती घेतलेल्या कार्यात एकरूप होतो आणि यश येईपर्यंत परिश्रम घेत असतो त्याच्या त्या एकाग्रतेला निष्ठा असे म्हटले जाते आणि निष्ठा ही 'श्रद्धे'चेच आणखी एक अंग आहे. ही निष्ठा जेवढी निर्मळ आणि एकाग्र असेल त्यावर त्याचे फलित अवलंबून असते. परमेश्वरांवरील श्रद्धेचेही असेच आहे म्हणून साईनाथांनी आणखी एक शिकवण दिली ती म्हणजे 'अल्ला तेरा भला करेगा!'

बाबांच्या या सर्व उपदेशांची मूळ बैठकच 'श्रद्धा' आणि 'सबुरी' ही असल्याने त्याने ती आपण जितकी निर्मळपणाने आचरणात आणू त्यावरून आपल्याला कळून येईल की श्रद्धा कधीही अंध नसते.

# भिक्षान्न

— डॉ. सुमन खानवीलकर,
बॉंबे पुना रोड,
लोणावळा.

साईनाथा खूप खूप दिवसांची इच्छा आहे, की आपण ज्या ज्या घरी जावून भिक्षा मागितली, त्या त्या घरी दुपारचे १२ च्या दरम्यान (बाबांसारखेच) अनवाणी पायांनी जावून भिक्षा मागावी अन् खावी, पण ते जमतच नाही. एकाद्या तरी शिर्डीवारीत असे घडावे असे मनोमन वाटत आहे. असे कां वाटते कोण जाणे!

बाबा! तुम्ही ज्या घरची भाजी भाकरी मागीतली असे ते घर सुद्धा पूर्व सुकृताचेच असणार अन् ते अन्नही! म्हणून खूप खूप वाटते कधीना कधी असे करावे नि तो आनंद उपभोगावा, एवढेच नव्हे, खात्री आहे की त्या घरातली कमाई चांगल्या तऱ्हेची असावी नि माणसंसुद्धा प्रेमळ व सात्विक-सोज्वळ असावीत.

बाबा, त्या अन्नातला बराचसा भाग पशुपक्षादींची पोटे भरण्यात जात असे नि कांही भाग तुम्ही स्वतः खात असा. म्हणून बाबा आपणही असे करावे म्हणजे काही तुमची बरोबरी करणे असे नव्हे हं! बाबा, तुम्ही त्या घरी भिक्षेखातर गेल्याने तुमचे पाय त्या घराला लागलेले, त्या घराला पावनता आलेली असणार म्हणून त्या घरी जावे व लीनता अंगी बाणावी म्हणून भिक्षा मागावी व तुम्ही पावन केलेल्या घरातले अन्न खावून आत्तापर्यंत जे अन्न खाल्ले त्या अन्नाचा शरीरातील दूषीतपणा जावा. अन् त्याद्वारे आपले षड्‌रिपू नष्ट व्हावेत. रक्ताच्या कणाकणात भिनलेला अभिमान निघून जावा. ज्या अन्नास लागणारा पैसा कदाचित् योग्य रितीने आला नसेल. अन्न पिकणारी जमीनही वादावादी-शिव्याशापादी विकारांची असेल, धान्य पिकविणारा, धान्य विकणारा व धान्य शिजविणारी व्यक्ती यापैकी कोणीही तन-मन-धनाने अपवित्र वृत्तीचे कृतीचे असू शकेल. कारण म्हणतात ना, आपण ज्या घरचे अन्न खातो, वा खावे लागते तसेच आपल्या शरीराची जडण-घडण बनते आणि अर्थात त्यामुळे त्याचा आपल्या स्वभावधर्मावर परिणाम होतो. त्या वृत्तींतूनच मग माणूस पाप अथवा पुण्याच्या आहारी जावून ते ते गोळा करू लागतो.

अशा ह्या असंख्य विचार द्वंद्वात सापडल्याने माझी अवस्था चक्रव्यूहातल्या अभिमन्यू सारखी झाली होती व अचानक काळोखात एखादा तारा चमकावा त्याप्रमाणे मनात आले की जरूर 'संताघरचे अन्न या साऱ्या वृत्तींचा झालेला अनिष्ट परिणाम समूळ नष्ट करतील'' कारण म्हणतात ना? ''जर कधी संताघरी गेलात, तर जेवून अथवा प्रसाद घेतल्याशिवाय येवू नये!'' ह्या थोरांच्या म्हणण्याला अनुसरूनच मला ह्या उपरोक्त माझ्या मनात आलेला विचार सार्थ वाटला व त्यानुसार मी माझ्या मनीचे आलेख घेवू लागले की आत्ता कसे काय शरीरातील-मनातील अन्नाद्वारे आलेल्या दुर्गुणादी विकारांचा जास्तीत जास्त समूळ नायनाट करावा व आपण अधिकाधिक माझ्या परमप्रिय दैवताची शिर्डीश्वरांची लाडकी लेक बनावे?

हल्लीच्या या यंत्रयुगात ज्या माणूसकीहीन वातावरणात आपण वावरत आहोत, जगत आहोत. अर्थात ती हवा, पाणी नि श्वासोच्छ्वास यांतून निर्माण होणाऱ्या जीवनावश्यक वस्तूंवरच आपली उपजिवीका अवलंबून असते. मग अर्थात त्याच अनुरोधाने आपली मनोवृत्ती चालते. त्यामुळे मधुन-मधून तिर्थाटनाला जावे असे साधुसंत कां सांगत आले हे उमजू लागले. कारण की तेथील पवित्र वातावरण नि पावनभूमी तिर्थस्वरूपाने वाहणाऱ्या नद्या त्यांचे अंगावर पडणारे पवित्र जल प्राशन केल्याने कांही काल तरी माणसांचे काम-क्रोधादी षड्‌रिपूपासून संरक्षण व्हावे.

म्हणून म्हणते बाबा, एकदा तरी तुम्ही ज्या घरचे अन्न सेवन केलेत त्या घरचे अन्न मला खावयास मिळावे. तुमच्यासारखे संत जे अन्न खातात निश्चितच ते अन्न पवित्रच असणार. अथवा ते स्थान-अन्न पवित्र होणार. तुम्हाला ज्या ज्या कोणी जेवू घातले, ते खरोखरच भाग्यवान म्हणूनच त्यांचे जन्मोजन्मीचे भाग्य उदयाला आले.

तेव्हा या जन्मामध्ये अगर गतायुष्यामध्ये जे कांही खाण्यापिण्याने तन-मनावर वाईट परिणाम झाले असतील ते नष्ट व्हावेत म्हणून हे साईनाथा मी माझे हात-पाय चालतात

तो पर्यंत एकदातरी वरील इच्छा पूर्ण व्हावी म्हणून तुम्हाला मागणे मागत आहे. शेवटी कर्ता करविता सर्व कांही तूच आहेस. या जगात एवढे निर्मळ अन्न कोठे आहे की जे अन्न आपली बुद्धी शुद्ध करील. अणुरेणुतला अभिमान नष्ट करील नि मला जास्तीत जास्त तुमच्या सान्निध्यात येण्यास मदत करेल. माझी ही सर्व धडपड-स्वार्थ हा फक्त तुमच्या चरणी येण्यासाठी आहे. सारी सुखे मिळाली, त्या क्षणभंगूर सुखातली तृप्तीपण समजली, अनुभवली म्हणून तुझ्याकडे येण्याची, तुझ्या भेटीची, दर्शनाची अंतरीची तळमळ मला अस्वस्थ करू लागली आहे. "जळाविण मासोळी" कशी तळमळते तशीच माझी अवस्था झाली आहे. "वाट चुकलेले पाडस जसे हरीणीला (मातेला) चौफेर शोधत असते." तद्वत्च मी तुम्हाला शोधते आहे. तुमच्या साक्षात दर्शनाला अंतरातून झेपावते आहे. तुमच्या सान्निध्यात राहण्याची अभिलाषा बाळगते आहे.

एक तर तुमच्या पुजेचा, ध्यानाला, वाचनाला हवा तसा वेळ मिळेना झालाय. मिळालाच वेळ तर मन शांतता लाभेना. त्यामुळे मनाला समाधान मिळेना. कशातच समाधान लागेना झालेय. आता फक्त तुमच्याकडे येण्यासाठी कोणता ना कोणता तरी मार्ग अनुसरावा याचा विचार करत आहे. तेव्हा हे प्रभो साईनाथा; आता तरी तू मला तुझी म्हण अन् लौकरात लौकर माझी ही इच्छा पूरी कर!

बस्स् मी केवळ सदैव तुझीच, ह्या प्रिय शिर्डीवाल्या. साईनाथांचीच लाडकी पोर आहे रे; तरी तू मला आता तरी तुझीच म्हण रे, साईनाथा

# अन् मी अवाक् झालो

— डॉ. अनिल एन्. मोरे.
साईधाम
मु. धनसार, [अल्याळी-आंबेवाडी]
ता.पो. पालघर, जि. ठाणे

द्वारका माईतील उदीचे लहान-थोर चमत्कार ऐकून आहे. वेळोवेळी त्याची प्रचीती देखील येते. परंतु मंगळवार दिनांक १४.१.१९८६ रोजी आलेला ताजा असा हा अनुभव.

त्याचं असं झाले. माझ्या दवाखान्यात शनिवार दिनांक ११.१.१९८६ रोजी रात्री एक ४/५ वर्षाच्या वयाचा मुलगा आला. कपाळावर बरीच मोठी खोक पडली होती. सर्वप्रथम

विचार आला की, २/३ टाके सहज द्यावे लागणार. टाके द्यायचे म्हणजे तो भाग बधिर करण्यास इंजेक्शन द्यावे लागणार. कपाळाच्या मधोमध जखम-रक्त भळाभळा वाहतेय. गाल, ओठ, मान रक्तानी भिजलेली आहे. अशा परिस्थितीत आणि छोटासा मुलगा — टाके देणं थोडसं अवघडच होतं. आणि अशा अवस्थेत हॉस्पिटलमध्ये पाठवणं हेही माझ्या मनाला पटण्याजोगं नव्हतं. [हॉस्पिटलमध्ये पाठवणं हाच एकमेव उपाय होता] मी औषध वगैरे लावून रक्त थांबवल, अन् थोडीशी उदी जखमेवरील पहिल्या पट्टीवर टाकून बँडेज बांधलं. माझ्या मनात जबरदस्त धास्ती होती. ती ही की, आपण त्याला हॉस्पिटलमध्ये पाठवलं नाही ही फार मोठी चूक केली. रात्री अचानक पुन्हा रक्तस्राव सुरू झाला तर? अशा पद्धतीनं मनात धाकधूक होतीच. तर काही होणार नाही, आपण बाबांची उदी लावलीय. सर्व काही बाबाच पाहतील. आपण निश्चिंत राहिलेलं बरे, असे मानून मी निश्चिंत झालो. ह्या बालकाच्या वडीलास झोपताना डोक्याची रचना कशी असावी व इतर काही आवश्यक सूचना केल्या. दुसऱ्या दिवशी रविवार असल्याने दवाखानाही बंद.

सोमवारी रात्री ह्या बाळाच्या आईस ह्याच्या जखमेविषयी विचारलं तर त्या म्हणाल्या की, मोठं बँडेज सोडलं आहे. आता पाठवून देऊ काय? मीच त्यांना उद्या सकाळी पाठवून द्या म्हटलं. विचार केला की, पट्टी आहे तर असू द्या, उद्याच ड्रेसिंग करू. कारण तोवर जखम थोडीशी सुकलेलीही असेल.

मंगळवारी दवाखान्यात मी "श्रीसाईसत् चरित्रामधील ४४ वा अध्याय" वाचीत असताना जयदिप त्याच्या वडीलांसह आला. मी त्याची जखम पाहिली — "**अन मी अवाक् झालो.**" त्याची जखम पूर्णपणे जुळून आली होती. माझा विश्वास बसेना डोळ्यावर की हे सर्व झालंच कसं? जयदिप त्या दिवशी [शनिवारी] आला होता तेव्हा त्याच्या जखमेवर २/३ टाके लावावेच लागणार असं कुठल्याही डॉक्टरांचं मत झालं असतं ती जखम नुसत्या पट्टीनं [अर्थात ह्यात साईबाबांची उदी होतीच] बरी झाली होती. मी अक्षरशः धन्य झालो. उदीची अगदी चमत्कारासारखी प्रचिती मला आली होती. मी त्याच्या वडिलांसह हा सर्व चमत्काराचा प्रकार झाल्यागत म्हटले. व तुमचा साईबाबांवर विश्वास आहे काय? म्हणून विचारले तर त्यांनी आपल्या गळ्यातील [साईबाबांचा] लॉकेट — हातातील साईबाबांची अंगठी दाखविली. धन्य ते साईभक्त आणि साईकृपा. आपल्या भक्ताला कुठल्याही संकटातून तारून न्यायचे वचन बाबांनी सत्य करून दाखवले.

वेदनेने कण्हत असलेला बालक — ती जखम पाहून मनात चुटपूट करणारे ते पितामह — आणि जखम ही टाक्याविना बरी होणार कशी ह्या विचारात पडलेल्या मला अशा आम्हां तिघांना साईबाबांनी वेगळ्याच आनंदमय सागरात नेवून सोडलं होतं.

विशेष म्हणजे ह्यांच्याच घरातील श्री साईबाबांची तसबीर पाहण्यात मला बोलवले. मी दवाखाना बंद करून घरी गेलो तर जयदीपच्या आईने कुरड्या अन् शिरा असा अल्पोहार माझ्या पुढ्यात ठेवला अन् माझ्या आनंदाला पुन्हा एका गोडीचे स्वरूप दिले.

# जया मनी जैसा भाव

— श्री. सुरेश के. बोबलेकर,
एम.एस.सी.एफ.एस.एस. (लंडन),
१६७।५३२२ अरुण निवास, कन्नमवार नगर नं. १,
विक्रोळी (पूर्व), मुंबई - ४०० ०८३.

ह्या गोष्टीला आज पांच वर्षे होऊन गेली. इतकी वर्षे इच्छा असूनही "साईलीला"च्या वाचकांच्यापुढे हा अमृतानुभव मी सादर करू शकलो नाही. याला काय बरे कारण असू शकेल? दुसरे काय? श्री. सद्‌गुरु साईनाथांची इच्छा----

पांच वर्षापूर्वी माझी आई हयात असताना आम्ही सर्व कुटुंबियांनी शिरडीस जाण्याची योजना आखली होती. मी, आई, वडील, माझी सौभाग्यवती, मुलगी सोनाली व माझा धाकटा भाऊ या सर्वांनी शिरडीच्या श्री साईबाबांचे दर्शन घेण्याचे ठरविले होते. रात्री ८.४५ वाजता बॉम्बे सेंट्रलहून सुटणाऱ्या एस्.टी. बसने आम्ही प्रयाण करणार होतो. पण दुपारी २ वाजल्यापासून चि. सोनालीस जुलाब सुरू झाले. चार वर्षांच्या त्या मुलीस जुलाब होऊन अशक्तपणा आला होता. माझे वडील अत्यंत घाबरले होते. संध्याकाळी ४ ते ७ वाजेपर्यंतच्या काळांत त्यांनी डॉक्टरांकडे ४ खेपा घातल्या; आणि मला व माझ्या आईला ते शिरडीला जाण्याचा कार्यक्रम रद्द करण्याबाबत विनंती करू लागले. मी सुद्धा थोडाबहूत चलबिचल झालो होतो. पण आईच्या ठाम निश्चयापुढे मी व माझे वडील, कांहीच करू शकलो नव्हतो. तरीही शिरडीस गेल्यावर जर जुलाब चालूच राहिल्यास चि. सोनालीचे कसे हाल होतील याविषयी आईला समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे तर आईने जमदग्नीचाच अवतार घेतला. तिने आमचा श्री. साईबाबांवर विश्वास नसल्याचा आमच्यावर आरोप केला आणि चि. सोनालीला आमच्या घरातील श्री साईबाबांच्या फोटोसमोर नेले व जोरात प्रार्थना केली.

"हे बाबा, तुझ्याकडे आम्ही यायचे ठरवले आहे.
आम्ही तुझे दर्शन घेऊन येईपर्यंत ह्या
माझ्या सोनूची काळजी तुझ्यावर टाकत आहे."

यानंतर आम्ही कोणीच कांहीही न बोलता ठरल्याप्रमाणे शिरडीस गेलो. तीन दिवस तेथे मुक्काम केला व नंतर परत मुंबईस आलो. दर्शन घेण्याचा कार्यक्रम व तेथील मुक्काम अत्यंत समाधानात पार पाडला गेला. पण जेव्हा आम्ही परत घरी पाऊल ठेवले तेव्हा चि. सोनालीस जुलाब सुरू झाले. मी आईला म्हटले, "असे कसे हे तुझे बाबा, पुन्हा त्यांनी त्रास दिलाच की?" आई म्हणाली, "वेड्या भोग हे भोगलेच पाहिजेत. मी बाबांना आम्ही शिरडीस जाऊन परत येईपर्यंत काळजी घेण्यास सांगितले होते. त्यांनी ते पार पाडले. आता आपण परत घरी आलो आहोत व सोनालीला डॉक्टरकडे घेऊन जाऊ शकतो." माझ्या मनामध्ये श्रीसाईबाबांच्या वचनातील 'जो जो मज भजे जैशा भावे-----" ह्या पंक्ती एकसारख्या घोळू लागल्या.

# श्री साईनाथांचा शरणार्थी (१३)

लेखक : ब्रह्मीभूत स्वामी साईशरणानंद
अनुवादक : वि.बा. खेर.

[या लेखापासून सुरवात करून एकंदर तीन लेखात पूर्वाश्रमीचे वामन प्राणगोविंद पटेल यांना मार्च १९१४ ते ऑक्टोबर १९१६ दरम्यान आलेले अध्यात्मिक अनुभव क्रमशः दिले जातील.]

बाबांच्या आज्ञेप्रमाणे १९१४ मध्ये विलेपार्ल्याला परतलो. जहांगीर गुलाब भाई बिलिमोरिया या सॉलिसिटर्सच्या पेढीवर जाऊन ज्येष्ठ भागीदार जहांगीर यांना भेटलो. त्यांना मी शिरडीस दीर्घकाळ राहिलो ते पसंत पडले नव्हते. मला शिरडीला जाऊन दोन तीन महिने झाल्यावर त्यांनी एक पत्र लिहिले होते त्यात त्यांनी असे म्हटले होते की माझ्या सारख्या सामान्य स्थितीच्या माणसाने साधु-फकिरांच्या नादी लागणे योग्य नाही; आणि ताकदीवजा एक वाक्य लिहिले होते की जर लवकर आला नाहीस तर पहिली टर्म फुकट जाईल व पुनः त्या वर्षाची टर्म भरावी लागेल. त्या पत्राला मी विवेकपूर्वक उत्तर पाठविले होते की बाबांची आज्ञा मला ईश्वराप्रमाणे असल्यामुळे बाबांनी अनुज्ञा दिल्यावर लगेच परत येईन परंतु तोपर्यंत मला येथून निघणे शक्य नाही. जहांगीर मला म्हणाले की तू इतका दीर्घकाळ मुंबई बाहेर राहिल्यामुळे पुनः दोन वर्षाची टर्म भरणे तुला प्राप्त आहे. म्हणून पेढीवर जाण्याचे तहकूब करून मी नोकरीच्या शोधात लागलो. त्यासाठी त्यांचे सर्टिफिकेट घेऊन अर्ज केले. त्यातून रु. ८० च्या पोलिस प्रॉसिक्यूटरच्या व नवसारीच्या सी.जे.एन.एल. हायस्कूलच्या असिस्टंटच्या जागांसाठी इंटरव्हयूसाठी बोलावणी आली. दोहोपैकी कुठल्या जागेच्या इंटरव्हयूसाठी जावे असे शिरडीस जाऊन बाबांना विचारल्यावर त्यांनी पोलिस प्रॉसिक्यूटर होऊ नकोस, शिक्षक हो असा सल्ला दिला. त्यानुसार गुरुपौर्णिमेनंतर शाळेच्या मुंबईतील सेक्रेटरीला भेटून मासिक रु. ६५ वेतनाची जागा स्वीकारली.

शिरडीहून परतल्यानंतर किंवा शिरडीहून निघण्यापूर्वी काकासाहेबांमार्फत बाबांना विचारले की मी घरी ईश्वराच्या नामस्मरणातच काल व्यतीत करावा की काही उद्योग करावा? बाबा म्हणाले, "आपण आपले काम करावे." परंतु जहांगिरांचे उत्तर ऐकून ईश्वराच्या नामस्मरणाशिवाय काहीच करत नव्हतो. म्हणून काकासाहेब दीक्षित आपल्या पत्नीसह माझ्या घरी आले व त्यांनी मला समजावले की काही कामधंदा तर केलाच पाहिजे. कारण बाबांची तशी आज्ञा आहे व नंतर थोड्याच दिवसात मी परत शिरडीला गेलो. उन्हाळ्याच्या सुट्टीचे दिवस होते. सर्वांनी मला पाहून ते बाबांना म्हणाले, "वामनराव आले." माझ्याकडे प्रेमाने बघून बाबा म्हणाले, "हो, आईजवळ त्याचे पैसे आहेत ना अजून!" घरून फराळाचे काय आणले आहेस असे राधाकृष्णआईने विचारता, बरोबर आणलेल्या पुऱ्या, शंकरपाळ्या, मुठिया वगैरे दाखवून तिला खाण्याचा आग्रह केला. तेव्हा ती म्हणाली, "असे काय आणतोस? आपण आपली भाकरीच आणत जावी."

शिरडीत त्यावेळी बाबांसाठी वाळ्यांच्या पडद्यांचे काम चालले होते. ते काम शिकून मी केले पण खरं. त्यावेळी राधाकृष्णआई मला म्हणाली, "तू गेल्यावर मला करमत नव्हते व रडू पण येई." नंतर पुनः म्हणाली, "तुला चांगल्या रीतीने पाठवून दिला होता, मग कशाला परत आलास? तुला खुर्चीवर बसणे पसंत नसावे." वारंवार ती म्हणे, "पैसे कमावून केव्हा या माझ्या संसाराला मदत करशील?" थोडा काल राहून मी जाण्याची गोष्ट काढली. त्या सुमारास मनु सुभेदार विलायतेहून परत आल्याची वार्ता समजली ती राधाकृष्णआईला सांगून त्याला महिना रु. ४०० ची प्रोफेसरची नोकरी मिळाल्याचे सांगितले. तेव्हा ती म्हणाली की आम्ही अगदी गरीब आहोत असे तू समजतोस. घे तुला किती पैसे पाहिजेत? रु. ५०, ७५, १००, १५० किती?" याहून अधिक आंकडा तिच्या बोलण्यात आला नाही. काही काळ माझी मासिक प्राप्ती रु. २५०, २७५ पर्यंत होती. 'क्रॉफर्ड बेली'मध्ये असताना मासिक रु. ३५० पगार अकरा महिने मिळाला व शिवाय पाचशे रुपयांचा बोनससुद्धा मिळाला. काही दिवस कामधंदा नसतानाचा हिशोब करता व सरासरी काढता रु. १५० ची मर्यादा राधाकृष्णआईने सांगितली ती खरी असावी. तिचे बोलणे असे द्विधायुक्त असे. कधी कधी वैराग्य ग्रहण करण्याचा आग्रह तर कधी तिच्या शिरडीतल्या पसाऱ्याला पैसे कमावून हातभार लावण्याचा आग्रह.

पुष्कळांच्या तोंडून ऐकले होते तसेच तुकारामांसारख्यांच्या चरित्रावरून ही मला असे वाटले की परमेश्वर प्राप्तिसाठी एकांताची व मौनाची खास जरूर आहे. सात दिवस अशा रीतीने बसण्याचा मी विचार केला. असे झाल्यावर माझ्या खोलीचे दार बंद करून खोलीच्या एका बाजूला स्वयंपाकघर होतं तेथे एका कोपऱ्यात भगवत्स्मरण करत मी बसलो. वासुकाका, वामनराव नार्वेकर वगैरे मंडळींनी मला हाका मारून दार ठोठावले. परंतु मी दाद दिली नाही. असे दोन दिवस गेले. तिसऱ्या दिवशी तहान लागली. खोलीच्या बाहेर चौकात एका मातीच्या घागरीत पाणी होते ते पिऊन थोडे दिवस काढले. नंतरचे दोन तीन दिवस पहाटे उठून सध्या दुकानाच्या पाठीमागे विहीर आहे तेथील हौदामधून लोक पाणी भरून घेऊन जात त्या पाण्याने तहान भागवली. खोलीत तर पाणी नव्हतेच. तिसऱ्या दिवशी बाबांच्या दर्शनाला गेलो व नंतर राधाकृष्णआईकडे पण गेलो तेथे वामनराव नार्वेकर होते त्यांनी मला विचारले, "रात्री झोपता का?" मी उत्तर देण्यापूर्वीच राधाकृष्णआई म्हणाली, "झोप तर येतेच ना! तो तर प्रकृतीचा धर्म आहे." तिच्या या उत्तरामुळे मला काही बोलण्याचे राहिले नाही. परंतु मी पाहिले की बाबांना व राधाकृष्णआईला मी सात दिवस एकांतात काढण्याचा विचार सोडून तिसऱ्या दिवशी बाहेर आलो ते पसंत पडले नाही. मी बाबांच्या पाया पडलो तेव्हा ते काही बोलले नाहीत यावरून माझे बाहेर येणे बाबांना पसंत नव्हते. हे मला उमगले. म्हणून लगेच पुनः दार बंद करून बसलो. त्यानंतर शनिवारी आरती होऊन गेल्यावर दोन तीन वाजता कपडे घालून बाहेर आलो व बाबांचे दर्शन घेऊन मुंबईला परत जाण्यासाठी त्यांच्याकडे अनुज्ञा मागितली. तेव्हा बाबा म्हणाले, "उद्या सकाळी जा." काकासासाहेब दीक्षित बाबांच्या जवळच असावेत. ते मला त्यांच्या घरी

नंतर तिने एक हापुसचा आंबा पण मला दिला. मी म्हणालो, "मला नको, बाबांसाठी ठेव." तेव्हा तिने उत्तर दिले, "हा तर प्रसाद आहे. सर्व खाऊन टाक." म्हणून दुधात कुस्करलेली सर्व भाकरी खाल्ली. तेवढ्यात राधाकृष्णआईने वाटी उचलून तीत थोडे पाणी घातले व आतून आंगुळी फिरवून स्वतः पाणी प्याली. मी प्रसादाचा आंबासुद्धा ग्रहण केला. गुरुपौर्णिमेचा तो संस्मरणीय दिवस होता. सकाळी स्नान करून द्वारकामाईकडे गेलो तेव्हा बाबा एकटेच बसले होते. दुसरे कोणी नव्हते. म्हणून हिंमत करून मी वर गेलो. बाबांनी मला जवळ बसवले व हळुच एकनाथी भागवतातील एक वाक्य बोलून म्हणाले, "उदी घे आणि जा." उपदेशाचा भावार्थ हाच होता की भगवान सर्वव्यापी आहे.

# चला शिरडीला

चला शिरडीला जाऊ।
नेत्री साईबाबा पाहू।।
घेऊ दर्शन समाधीचे।
साई सर्व व्यापलासे।।
काय वर्णु चमत्कार।
लहान मोठे पुष्पहार।
मन जाते भारावून
पुष्पे आली ती कोठून।।
पणत्या लावाव्या एके हारी।
करू दिवाळी साजरी।।
गेले स्वतः बाजारी
तेल मागती घरोघरी।
नाही म्हणती व्यापारी।।
मनी गेले रागावून
सुलगावल्या पणत्या
तेला अभावी पाण्यान।।

प्रगटले शिरडीत। राहु लागले।
मशिदीत। काय वर्णावे
त्यांच्या लीला जन लागले भजनाला।।
भक्त त्यांचे कितीतरी
नाही करीत बरोबरी।।
नको लाडू पेढे साखर खडी।।
नाही त्यांना त्याची गोडी।।
भक्तीभावाचा भुकेला।
शिरडीत तो राहिला।
साद देतो तो हाकेला।।
त्याच्या समाधीवर
घालू चादरी शाली हार।
करू त्यांना नमस्कार।।
करू नैवद्य आणि धूप दीप।
पाहू साईचे श्रीमुख
कमलेला होते सुख।।

**— श्रीमती कमल बी. मुळये**
डोंबिवली

# श्री खापर्डे यांची शिरडी रोजनिशी

**साईनंद**

**गुरुवार दिनांक २१-१२-१९११**

सकाळी मी नेहमीप्रमाणे उठलो. प्रार्थना केली आणि दरवेशी साहेबांबरोबर गप्पा मारीत बसलो. ते म्हणाले मला एक स्वप्न पडले. त्या स्वप्नात तीन मुली आणि एक आंधळी स्त्री दार ठोठावत आहेत असे दिसले. त्यांनी त्यांना विचारले, ''तुम्ही कोण आहांत?'' त्यांनी उत्तर दिले आम्ही मनरंजन करण्यासाठी आलो आहोत. त्या उत्तरावर त्रासून जाऊन त्यांनी लाथ झटकून त्यांना तिथून निघून जाण्याचा हुकूम केला आणि पुन्हा प्रार्थना सुरू केली. प्रार्थनेचे शब्द ऐकताच त्या तीन मुली आणि ती आंधळी म्हातारी पळून गेली. त्याने मग त्या खोलीतीलच नव्हे तर त्या रहात्या घरातील आणि गावातील सर्वांना शुभाशिष प्रदान केले. या स्वप्नाचा अर्थ काय असे त्यांनी मला श्री साई महाराजांना विचारण्यास सांगितले. साई महाराज मशिदीत आल्यानंतर मी जेव्हा त्यांचे दर्शनास गेलो आणि जरा जवळ त्यांचेसमोर बसलो. इतक्यात साई महाराजांनी एक गोष्ट सांगण्यास सुरूवात केली. ते म्हणाले, कालच्या रात्री मला माझ्या गुप्तांगावर आणि हातावर कुणीतरी कशाने तरी फटके दिले. त्यांनी तिथे मग तेल लावले. काही वेळ इकडे तिकडे भटकले, शौचाला गेले आणि मग थोडे बरे वाटू लागल्यावर ते धगीजवळ येऊन बसले. मी थोडा वेळ श्री बाबांचे पाय चेपले आणि तेथून परतल्यावर दरवेशीसाहेबांना बाबांनी सांगितलेली ही घटना सांगितली. या घटनेचे उत्तर अगदी स्वच्छ होते. दुपारच्या आरतीनंतर मी भावार्थ रामायण वाचत बसलो; नंतर साई महाराजांना चावडीजवळ पाहिले, नंतर पुन्हा शेजारतीचे वेळीही चावडीकडेच पाहिले. नंतर भीष्मांचे भजन आणि राम मारूती महाराजांच्या नकला झाल्या. एवढे झाले तरी दिक्षित आपले रामायण वाचत होते.

दुसऱ्या दिवशी सकाळी काकड आरतीला हजर रहाण्यासाठी म्हणून सकाळीच उठलो. परंतु माधवराव देशपांडेनी पुन्हा पुन्हा सांगीतल्यावरून की तिथे जाण्याचा विचार सोडून दिला. परंतु नंतर माधवराव स्वतःच तिथे गेले आणि मी मात्र त्यांचे बरोबर गेलो, त्यांना सोबत दिली. आज साई महाराज छान दिसत होते. ते स्वस्थपणे मशिदीत गेले. ते जेव्हा बाहेर पडले तेव्हा आम्ही सर्वांनी त्यांना वंदन केले आणि दरवेशसाहेब यांनी आज परत जाण्याचा प्रयत्न केला परंतु साई महाराजांनी त्यांना आवश्यक ती परवानगी दिलीच्च नाही. दरवेशसाहेब किंचित् आजारी झाले त्यांना ताप आला होता. डॉ. हाटेंनी त्यांना औषधोपचार केले, मला आठवते की यापूर्वीच एका ठिकाणी नमूद केले आहे की टिपणीस नावाचे एक सज्जन आपल्या पत्नी समवेत राहात होते. ती आजारी पडली तेव्हा डॉ. हाटेंनी तिला बरे वाटावे म्हणून सर्व ते उपाय केले. राममारूती महाराजही तिच्या सेवेला हजर होतेच तिला संध्याकाळी आकडी आली आणि त्यातच ती अचकट विचकट अभद्र बोलू लागली. दिक्षित, माधवराव देशपांडे आणि इतर तिला पहाण्यासाठी

घेऊन गेले. आरती केव्हाची होऊन गेली होती परंतु त्यांनी मला आपल्या घरी जेवायला घातले. राधाकृष्ण आई त्यांना म्हणाली, "याचे शौच घट्ट होऊन खड्यासारखे आले असेल. म्हणून त्याला सांगा की कॉफीत तूप घालून पी म्हणजे शरीरात विकृती निर्माण होणार नाही." ती असे पण म्हणाली की बाबांच्या कृपेमुळेच मी अन्नाशिवाय व पाण्याच्या थोड्याशा घुटक्यांवर सात दिवस काढू शकलो. हे तिचे म्हणणे अक्षरशः खरे होते असे मी समजतो. बाबांच्या कृपेनेच माझी ही इच्छा पुरी झाली हे निर्विवाद आहे. काही खास आध्यात्मिक लाभ मला झाला असे त्यावेळी जाणवले नाही. परंतु भगवंताच्या ध्यानासाठी जी तयारी लागते त्यात कुटुंबियांसंबंधी आसक्ती व विशेषतः मोठ्या बहीणीचे स्मरण यांनी व्यत्यय आलेला पाहिला. सात दिवसांच्या एकांतात राधाकृष्ण आईसारखा चेहरा असलेल्या ऊर्ध्वगमन करणाऱ्या काल्पनिक गोपीचे तिचे पाय अधांतरी असतानाचे प्रत्यक्ष दर्शन झाले पण ती माझ्याबरोबर काही बोलली नाही. राधाकृष्ण आईचे तुकारामाच्या गाथेच्या काही पानांसहित जागृत अवस्थेत दर्शन झाले.

बाबांच्या आज्ञेप्रमाणे दुसऱ्या दिवशी बाबांचे व राधाकृष्ण आईचे दर्शन घेऊन पार्ल्याला गेलो. निघताना काकासाहेबांनी मला रेशमी बांधणीची गुरुगीता वाचण्यासाठी दिली. काही दिवसांनी गुरुपौर्णिमा आली तेव्हा पुनः शिरडीला गेलो. बाबांनी काही पुस्तक दिले नाही किंवा काही सूचना पण केली नाही. परंतु बाबांना प्रसन्न करण्यासाठी मी एक इंग्लिश कविता रचली तिच्या जणुकाही उत्तरात बाबांनी काकासाहेबांना गुरुगीता मला देण्याची प्रेरणा केली. परंतु माझे अज्ञानाचे आवरण दूर झाले नव्हते. जिथे तिथे प्रेरक साई आहे ही भावना दृढ झाली नव्हती. ज्ञानग्रहणाची अशी अभिलाषा उत्पन्न झाली नव्हती की जिच्या योगे ज्ञान कुठूनही आले तरी आत्मसात करता यावे. म्हणून बाबांनी किंवा राधाकृष्णआईंनी गुरुगीता दिली नसल्यामुळे मी ती वाचली नाही व न वाचताच काकासाहेबांना परत केली. परंतु सन् १९३५ नंतर अनेकदा गुरुगीता वाचली. आता खात्री होते की ज्यावेळी काकासाहेबांनी राधाकृष्णआईच्या संमतीने गुरुगीता मला दिली त्यावेळी वाचली असती तर वेळेवर पुष्कळ प्रश्नांचा उकल झाला असता. यावरून बोध होतो की बाबा जे काही पुस्तक दुसऱ्याकरवी देववतात त्यावर नजर तर टाकलीच पाहिजे.

आदल्या वेळी शिरडीला गेलो तेव्हा राधाकृष्णआईने पुरी वगैरे सोबत न आणता भाकरी, भाजीच आणायला सांगितले होते त्याप्रमाणे मी गुरुपौर्णिमेला शिरडीला गेलो तेव्हा तेच पदार्थ घेऊन गेलो. दुसऱ्या दिवशी राधाकृष्णआईने विचारले तेव्हा नेलेल्या वस्तु दाखविल्या. तिने त्यातील भाकरी खाल्ली किंवा काय ते आठवत नाही परंतु एक दिवसाची शिळी भाकरी मी खाण्याचा प्रयत्न केला तेव्हा घशाखाली महामुश्किलीने ती उतरली. दूध किंवा असा काही पातळ पदार्थ आणण्याचे स्मरण मला राहिले नाही.

गुरुपौर्णिमेच्या दिवशी राधाकृष्णआई म्हणाली, "आज तुला आरतीनंतर बाबा त्यांचा प्रसाद पाठवणार आहेत. तो आरती संपल्यावर येथे येऊन घेऊन जा. अरे, एवढ्या कळकळीने प्रभूदर्शनासाठी येथे येतो तरी कोण?" आरतीनंतर गेलो तेव्हा वाटीत दुधात कुस्करलेली बाजरीची भाकरी मला देऊन ती म्हणाली, "घे, ही सर्व खाऊन टाक."

म्हणून गेली. ती पूर्वी ज्या घरात रहात होती त्या घराच्या मालकाने दोन महारांच्या मदतीने तिच्यावर ताबा चालविला होता. मालकाने जाहीर केले होते की आपण हिला ठार मारून टाकू पण साईबाबांनी हुकूम केला की तसे करू नकोस. साई महाराजांनी त्या दोन महारांना पण दूरच ठेवले. जेव्हा टिपणीसांनी आपल्या बायकोला या वाड्यात शिरून जा असा धाक दपटशा दिला तेव्हा त्या मृतात्म्यांनी कळवळून क्षमा मागितली आणि पुन्हा असे करणार नाही असे ती म्हणाली. साईबाबा आपणाला मारतील असेही ती म्हणाली. नेहमीप्रमाणे भीष्मांचे भजन झाले आणि त्यानंतर दिक्षितांचे रामायण मध्यरात्रीपूर्वी आटोपले.

## शनिवार दिनांक २३-१२-१९११

मी आज सकाळी बऱ्याच लौकर उठलो आणि पुन्हा झोपी गेलो आणि मग मात्र उशिराने उठलो. मी उठून खाली आलो आणि कळले की शिंगणे, त्यांच्या पत्नी आणि दरवेशी साहेब यांनी आपापल्या घरी परतण्यासाठी बाबांची परवानगी मिळविली होती. शिंगणे पतिपत्नी मुंबईला परतली आणि दरवेशी साहेब कल्याणला गेले. दरवेशी साहेबांनी आध्यात्मिक क्षेत्रात बरीच प्रगती केलेली आहे. साईमहाराजांना जाता-येताना बघण्यासाठी म्हणून ते भिंतीच्या भगदाडातून पण त्यांचे दर्शन घेत असत. मी बराच वेळ गप्पा मारीत असल्याने आमची ही अशी संधी मात्र हुकत असे. काल मुंबईचे एक सॉलिसिटर श्री. मैत्री आपल्या कुटुंबासमवेत आले. त्यांचेबरोबर त्यांचे चार भाऊ आणि बरीच मुले होती. ते फार चांगले गृहस्थ आहेत. मी त्यांचेबरोबर गप्पा मारीत बसलो. गेल्या वर्षी मी ज्यांना भेटलो होतो ते महाजनी आज येथे आले आहेत. त्यांनी येताना फार चांगली फळे आणि श्रीसाईबाबांच्या दिव्यासाठी काचेची वर्तुळाकार चिमणी आणली. भाईंदरचे गोवर्धनदासही येथेच आहेच. त्यांनीही येताना फार सुंदर फळे आणली तसेच साईबाबांच्या चावडीतील सुधारित खोलीस लावण्यासाठी रेशमाचे पडदे आणले. तसेच छत्र, चामरे आणि पंखे घेऊन बाबांच्या बरोबर मिरवणुकीने जाणाऱ्या स्वयंसेवकांसाठी नवीन कपडेही तयार करून आणले होते. ते एक श्रीमंत गृहस्थ आहेत असा त्यांचा बोलबाला होता. माधवराव देशपांडे आणि माझी पत्नी व मुलगा यांच्यामध्ये दिक्षित वाड्यात रहाण्यासंबंधी एक निरर्थक अप्रिय गैरकरार झाला होता. त्यावेळी साईबाबा म्हणाले की हा वाडा माझा स्वतःचा आहे. दिक्षितांचा नव्हे की माधवराव देशपांडेंचा नव्हे, आणि मग हा वाद शेवटी येथेच संपला आज बाहेर पडताना मी साई महाराजांना पाहिले नाही परंतु ते बाहेरून परतल्यावर मशिदीत जाऊन मी त्यांचेबद्दलचा अत्यादर व्यक्त केला. त्यांनी मला फळ दिले; आणि चिलीम ओढावयास दिली.

भोजनानंतर दुपारी मी काही वेळ झोपलो आणि नंतर आज आलेली दैनिक वर्तमानपत्रे वाचत बसलो. वामनराव पाटील (पटेल) एल.एल.बी.ची परीक्षा उत्तीर्ण झाले. डॉ. हाटेही परीक्षा उत्तीर्ण झाल्याने मी त्यांचे अभिनंदन केले. साई महाराज म्हणाले आज आपल्याला चांगली बातमी कळेल. टिपणीसांनी आज आपली रहाण्याची जागा बदलली त्यांच्या पत्नीची प्रकृती आज बरी आहे. ती असावी तितकी आज अस्वस्थ नव्हती.

राममारूती बुवा अद्यापही येथेच आहेत. आम्ही शेजारतीला गेलो. त्यांची निघालेली मिरवणूक खूपच भव्य होती. मिरवणूकीबरोबरचे नवीन नवीन पडदे आणि स्वयंसेवकांनी घातलेले नवीन नवीन पोषाख खूपच छान दिसत होते. मला हे सारे बघून खूपच आनंद वाटला. काय माझे दुर्दैव पहा! मी अशा प्रकारच्या भेटी देऊ शकत नाही काय! ईश्वर सर्वश्रेष्ठ आहे. रात्री भीष्मांचे भजन आणि दिक्षितांचे रामायण वाचनाचे कार्यक्रम झाले.

**रविवार ता. २४-१२-१९११**

आज सकाळी मी लौकर उठलो आणि काकड आरतीला गेलो. आरतीहून परतल्यावर मी प्रार्थना केली आणि बाहेर पडलो. श्री. मंत्री यांना परत जाण्याची परवानगी मिळाली. त्यामुळे ते आज आपल्या कुटुंबासमवेत येथल्या एकूण एक सर्वांना निरोप देऊन परत गेले. खरोखरच ते एक फार फार सज्जन गृहस्थ आहेत. वामनराव पाटील (पटेल) सुद्धा गेले. यानंतर गाठीभेटी घेणाऱ्यांचा एक घोळका आला. त्यामध्ये अनुसयाबाई नावाच्या एक महिला होत्या. ती आध्यात्मिक क्षेत्रात चांगलीच प्रगती केलेली होती त्यामुळे साई महाराजांनी तिला खूप चांगली वागणूक देऊन चार फळे दिली. नंतर त्यांनी एक बाप व त्याच्या पाच मुलांची कहाणी सांगितली. पांचापैकी चौघांनी मागणी करून विभागणी केली. चौघापैकी दोघा भावाभावांनी आपल्या वडिलांसह पुन्हा एकत्रित यावे असे ठरविले. बापाने बायकोला त्या दोघा भावाभावांपैकी एकाला वीष देण्याचा हुकूम केला व तिनेही तो अमलात आणला. दुसरा एका उंच झाडावर चढला होता तो खाली पडून जबर जखमी झाला व मरणाच्या पंथाला लागला. पण केवळ बापाच्या पुण्याईमुळे तो कसाबसा त्यानंतर पुढे बारा वर्षे जगला. या मुदतीत त्याला एक मुलगा व मुलगी झाली व त्यानंतर मात्र तो मरण पावला. साईबाबांनी पाचव्या मुलाचे काय झाले ते सांगितलेच नाही आणि मग माझ्या मते ही कथा अपुरीच राहिली. दुपारच्या भोजनानंतर मी अंमल लवंडलो आणि उठलो व रामायण वाचत बसलो. संध्याकाळी आम्ही नित्याप्रमाणे चावडी समोर साईसाहेबांना वंदन करण्यासाठी उभे राहिलो. रात्री भीष्मांचे भजन झाले व दिक्षितांचे रामायणही झाले. डॉ. हाटे अद्यापही येथेच आहेत. ते फार फार छान सद्गृहस्थ आहेत. श्री. महाजनीही येथेच आहेत.

**सोमवार दि. २५-१२-१९११**

मी सकाळी उठलो. प्रार्थना केली. साई महाराज बाहेर निघालेले मी पाहिले. ते एका ठिकाणी श्री. महाजनी व इतरांबरोबर बोलत बसले. आज बरेच पाहुणे गेले आणि बरेच पाहुणे आले आणि सर्वत्र गडबड धावपळ दिसत होती. आज गोवर्धनदासांनी भोजन दिले. साई महाराजांचे दर्शनासाठी आलेल्या प्रत्येकाला त्यांनी आमंत्रित करून भोजन दिले. माझा मुलगा बळवंत याला रात्री स्वप्न पडले ते असे की एलिचपुरच्या आमच्या घरी साई महाराज व बापूसाहेब जोगांचे कुटुंब भेटले. साईबाबांना त्यांनी तिथे जेऊ घातले. त्याने हे स्वप्न मला सांगितले खरे पण मला वाटले तो केवळ भास

असावा. पण बाबांनी आज बळवंताला बोलावून म्हटले, "अरे, काल मी तुमच्या एलिचपूरच्या घरी गेलो होतो तिथे मला जेऊ घातले पण दक्षिणाच दिली नाही. आता तू मला पंचवीस रुपये दक्षणा दे" तेव्हा बळवंत माधवराव देशपांडे यांचे बरोबर बिऱ्हाडी गेला व त्याने पंचवीस रु. दक्षिणा आणून दिली. (बळवंत म्हणजे कै. कविभूषण अण्णासाहेब खापर्डे हे होत)

दुपारच्या आरतीचे वेळी साई महाराजांनी मला पेढ्याचा फळाचा प्रसाद दिला; आणि बंद करण्याची ठसठशीत खूण केली. मी तात्काळ साष्टांग नमस्कार केला. आज भोजनाला खूपच विलंब झाला. दुपारचे चार वाजून गेले होते तरी आटोपलेच नव्हते. मी गोवर्धन- दासांबरोबरच जेवलो होतो. त्यांचा भोजन मंडप आमच्या बिऱ्हाडाजवळच होता व तो त्यांनी स्वतःच्या खर्चाने बांधला होता. भोजनानंतर मला सुस्ती आली आणि मग मी गप्पा मारत बसलो. सायंकाळी आम्ही सर्वांनी साई महाराजांना दोन्ही वेळेला पाहिले. एकदा नित्याप्रमाणे रपेटीला बाहेर आलेले आणि नंतर पुन्हा भजन मिरवणुकीबरोबर चावडीत परतत असतांना. कोंडाजी फकिराची मुलगी आज रात्री गमावली. आमचे बिऱ्हाडाजवळच तिला पुरली. रात्री भीष्मांचे भजन व दिक्षितांचे रामायण वाचनाचे कार्यक्रम नित्याप्रमाणे झाले.

(क्रमशः)

# "देह देवाचे मंदिर"

येथेचि बसुनि, चित्र सारे पाहे
 मन मात्र राही, शिरडीत—
रामनवमीचा सोहळा, पाहिला म्या आनंदे
 देव हासे सानंदे, येथूनच
माझा देह-गाभारा, जाहला हो मंदिर
 त्याला लावेन झुंबर, श्रद्धेचे—
येथूनच आता हाका म्या मारेन
 देवा सलाम करेन, पामर हा
माझा साई तो, माझाच श्रीराम
 जीवनांत ना वाण, उरली रे—

**— श्री. भालचंद्र केशव गद्रे**
सुखनिवास, चेंदणी, ठाणे.

# साईकृपेने नातू बरा झाला

— श्री. भास्कर गो. जोशी
साईप्रसाद ४२ श्रीकृष्णनगर
बोरीवली (पूर्व)
मुंबई-४०० ०६६

**शरण मज आला आणि वाया गेला।**
**दाखवा दाखवा ऐसा कोणी ॥**

श्री साईबाबांचे हे बोल जेव्हां प्रत्यक्षात अनुभवास येतात तेव्हां त्यांच्याबद्दल श्रद्धा अधिकाधिक दृढ होत जाते. असाच एक अनुभव मला नुकताच आला.

माझा मोठा मुलगा आपल्या दोन मुलांना (मोठा वय वर्षे ४ व धाकटा वय वर्षे १॥) घेऊन अमेरिकेहून येथे ७ डिसेंबरला सकाळी आला. आला तोच सर्दी तापाने आजारी झाला. दोन दिवसांनी तो बरा झाला तोच त्याच्या धाकट्या मुलाला ताप यावयास लागला. आमच्या फॅमिली डॉक्टरकडे नेल्यानंतर त्यांनी सांगितले की हवापाणी बदलल्यामुळे मुलाला ताप आला आहे. दोन दिवसांत बरे वाटेल. परंतु ताप कमी होण्याऐवजी वाढतच गेला. मुलगा काही खाईना की पीईना. म्हणून आम्ही त्याला लहान मुलांच्या स्पेशालिस्टकडे नेले. त्याने औषधे लिहून दिली. ती दिल्यानंतर सुद्धा ताप कमी होईना. एके रात्री तर ताप १०४॥ झाला. आम्ही घाबरून गेलो. आमच्या तोंडचे पाणी पळाले. श्री साईबाबांचा धावा सुरू केला. बाबांच्या पुढे धरणे धरले. नातवाला बाबांची उदी लावली. साई नामाचा जप सुरू केला व मनापासून प्रार्थना केली. बाबा! तुम्हीच तारणहार आहात मुलाला लवकर बरे करा. डॉक्टरांना टेलिफोन केला. त्यांनी सांगितले की मुलाला थंड पाण्याने स्पंज करा. बाबांचे नाव घेऊन आम्ही त्याला चक्क थंड पाण्याने आंघोळ घातली. ताप १०३ झाला. सकाळी १॥ झाला. परंतु पुन्हा वाढला. आम्ही स्पेशालिस्टकडे गेलो. त्यांनी मुलाला हॉस्पिटलमध्ये ठेवावयास सांगितले. छातीचा एक्सरे काढला. रक्त तपासले. दोन्ही परीक्षेत काही सापडले नाही. मग असे का व्हावे? मुलगा इतक्या लांबून भेटीसाठी आला. सूनबाईंना रजा नसल्यामुळे त्या येऊ शकल्या नाहीत. लहान नातवंडे बघायला मिळावी म्हणून मुलगा एकटा दोन लहान मुलांना घेऊन आला. मुलाला बरे नसल्यामुळे त्याला रात्रीची जागरणे म्हणजे त्याचीही तब्येत बिघडायची. बाबा! आमच्या पदरी अपयश येऊ देऊ नका. म्हणून सतत धावा चालू ठेवला. नातवाला हॉस्पिटलमध्ये ठेवले. त्याच्या उशीखाली बाबांच्या उदीची पुडी ठेवली. डॉक्टरांना कळेना काय झाले असावे. त्यांनी उपचार चालू ठेवले. दुसऱ्या दिवशी टेंपरेचर १०० वर आले व तिसऱ्या दिवशी नॉर्मल झाले. एक दिवस जास्त हॉस्पिटलमध्ये ठेऊन मुलाला घरी आणले. मुलगा एकदम खेळायला लागला, जेवायला लागला. माझा मुलगा तर मुलांना घेऊन लवकरच परत अमेरिकेला जावयाच्या गोष्टी

करीत होता. परंतु साईबाबांनी लाज राखली. ते पाठीशी असल्यावर कळी काळाचीही भीती वाटत नाही. त्यांच्या कृपेने सर्व ठीक झाले व पूर्वी ठरल्याप्रमाणे ३ जानेवारीला ही मंडळी परत गेली असे आहेत आमचे साईबाबा म्हणूनच ते म्हणतातः

शरण मज आला आणि वाया गेला।
दाखवा दाखवा ऐसा कोणी।।

# साईसच्चरित्रातील अकराव्या अध्यायाचे महत्त्व

— सौ. मथुराबाई हिब्बारे,
घर नं. १-८-२५ सिंगारबाग,
मु.पो. बीदर (कर्नाटक राज्य)
५८५४०१.

श्री साई सच्चरित्रातील अकरावा अध्याय मी अधून-मधून वेळ मिळाल्यास वाचीत असे. दररोज तो वाचावयाचा माझा नेम नव्हता. १९८२ च्या फेब्रुवारी महिन्यात मला एक अडचण आली. आम्ही कोणत्याही संकटाच्या वेळी श्री साईबाबांना आधार समजून त्यांच्यावर सर्व काही सोपवितो, आणि ह्या वेळी देखील साईबाबांना स्मरून आज ना उद्या काम होईल असे समजत होतो. पण ते कांही केल्या होईना माझ्या शाळेच्या कांही महत्त्वाच्या कागदावर आमच्या खात्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांची सही पाहिजे होती. पण ऑफिसमध्ये काम करणारा कारकून ते कागद वरिष्ठ अधिकाऱ्यापर्यंत जाऊ देत नव्हता. कांही तरी चुका काढून ते शाळेला हेडमास्तरकडे पाठवू लागला. त्यासाठी माझ्या पतीने त्यात जात्या लक्ष घातले तर वेगळेच प्रकरण उद्‌भवले आम्ही साई भक्तीचे स्तोम माजवून लोकांना फसवतो. असा खोटा आरोप ह्यांच्यावर आला. पण त्याला कोणताच आधार नसल्यामुळे तो तेथल्या तेथेच जिरला. अशा वेळी मला चिन्ता वाटणे साहजिकच होते. मला अकराव्या अध्यायातील शेवटच्या ओळी 'होऊनि श्रद्धा-भक्तियुक्त। करील जो या अध्यायाचे नित्य। पारायण होऊनि स्वस्थचित्त। आपदानिर्मुक्त होईल।' आठवल्या व मी पण श्रीसाईबाबांना प्रार्थना केली. अकरा दिवस अकरावा अध्याय नेमाने वाचण्यास निश्चय केले. ११ दिवस वाचून झाल्यावर फुले, पेढे चढवून नारळ फोडते व आरती करते असे बोलले. अन त्याप्रमाणे केल्यावर खरोखरच आमच्या कामात यश आले. वरिष्ठ अधिकाऱ्याने कागदावर बिनबोभाट सही केली.

# बाबांची समतेची व प्रेमाची शिकवण

— श्री. शां. ना. अवचट
विठ्ठलवाडी, केशव भुवन,
आग्रारोड, कल्याण, ४३१ ३०१

पूज्य साईबाबांच्या चरित्राचे सूक्ष्म अवलोकन केल्यास दोन गोष्टी प्रामुख्याने दिसून येतात. त्या म्हणजे प्रत्येक प्राणिमात्रांविषयी समभाव ठेवण्याबद्दल असलेला त्यांचा कटाक्ष आणि आपल्या दैनंदिन जीवनात प्रेममय वृत्ति ठेवण्याचे त्यांनी प्रसंगानुरूप केलेले आवाहन. समता आणि प्रेममय वृत्तिचा पुरस्कार बाबांनी कां केला? त्यांचा आध्यात्मिक दृष्टिकोन कोणता? याबद्दल हे थोडे विवेचन.

परमेश्वराने हे जग निर्माण केले. या जगात वैचित्र्य भरपूर आहे किंबहुना वैचित्र्य हाच या जगाचा स्थायीभाव आहे. या जगतात पशु पक्ष्यांचे अगणित प्रकार आहेत. अनेक वंशाचे लोक आहेत. मानवाने अनेक प्रकारच्या जाती, उपजाती निर्माण केल्या आहेत. अनेक पंथ आहेत. भेद आहेत. या सर्व गदारोळात मानव एक गोष्ट पूर्णपणे विसरून गेला आहे. ती म्हणजे या वैचित्र्यपूर्ण जगात प्रत्येकजण परमेश्वराचा अंश आहे. त्यामुळे आपल्या दैनंदिन जीवनात या ना त्या कारणाने येणाऱ्या व्यक्तिंना 'परके' मानणे हीच मोठी चूक आहे. आणि ही चूक अज्ञानामुळे मनुष्य रोज करीत असतो. फार काय सर्व प्रकारचे संघर्ष, लढाया आणि तज्जन्य उत्पात या चुकीमुळेच घडत असतात.

परमेश्वर स्वतः प्रेमस्वरूप असल्यामुळे त्याच्या साम्राज्यात प्रेमाशिवाय दुसरे काही नाही. राग, लोभ, मत्सर इत्यादी विकार मानवामध्ये त्यांच्या पूर्व कर्मानुसार येत असतात. मानवास परमेश्वरासान्निध जाण्यास हेच विकार मोठा अडथळा आणतात. साखरेपासून विविध प्रकारची मिठाई बनते. म्हणजे आकार विविध असले तरी प्रत्येकात साखर ही असतेच. तद्वत सर्व प्राणिमात्रात वैचित्र्य असले तरी सर्वांच्या ठायी परमेश्वरच भरून राहिलेला असतो. त्यामुळे दुसऱ्याचा मत्सर करणारा वस्तुतः स्वतःचाच मत्सर करीत असतो. पण अज्ञानामुळे त्याला ते समजत नाही. इतकेच या अज्ञानाचे निराकरण करून आपल्या भक्तांना प्रेममय परमेश्वरस्वरूपाची ओळख करून देण्याचे कार्य साईभक्तांनी केले. त्याकरिता बाबांनी काही वेळा दृष्टांत दिले तर काही वेळा संभाषणाच्या ओघात भक्तांची कान उघडणी केली. या संदर्भात बाबांनी एका भक्तास भोजन प्रसंगाचे निमित्त करून जो उपदेश केला तो उद्बोधक तर आहेच पण भेदाभेद मानणाऱ्या सर्वांच्या डोळ्यात अंजन घालणारा आहे.

शिर्डीस राहाणाऱ्या एका भक्ताने बाबांना भोजनाचे निमंत्रण दिले. बाबांनी थोड्या नाखुषीनेच निमंत्रण स्वीकारले. इकडे भक्त भोजनाची तयारी करून बाबांच्या येण्याची वाट पाहू लागला. बराच वेळ झाला. पण बाबा येण्याचे चिन्ह दिसेना. मात्र एक क्षुधापिडीत श्वान त्या भक्ताच्या अंगणात आले. बाबांची वाट पाहात तिष्ठत बसलेल्या त्या भक्ताचा राग अनावर झाला आणि त्याने दगड मारून त्या श्वानास घालवून दिले. संध्याकाळी तो भक्त द्वारकामाईत आला व बाबांना भोजनाला न येण्याचे कारण विचारू लागला. बाबा म्हणाले, अरे! मी अगदी ठरलेल्या वेळी भोजनाला आलो होतो. पण

तू मला ओळखले नाहीस. मी श्वानरूपाने 'भोजनास आलो पण तू मला दगड मारून घालवून दिलेस. अरे? सर्व प्राणिमात्रात मीच आहे. त्यामुळे मी भोजनास आलो नाही या तुझ्या तक्रारीत मुळीच तथ्य नाही. बाबांच्या या स्पष्टीकरणाने तो भक्त निरूत्तर झाला.

वरील प्रसंगावरून बाबांची विशालदृष्टी दिसून येते त्याचप्रमाणे समता व प्रेममय दृष्टी आध्यात्मिक दृष्टिकोनातून कशी आवश्यक आहे याचाही बोध होतो.

# —: श्री साईबाबांनी हाक ऐकली :—

— श्री. पांडूरंग भुजबळ
३७७, सोमवार पेठ, सातारा.

दिनांक ७।११।१९८५ रोजी माझे व्याही श्री. गणपतराव रामचंद्र शिंदे उर्फ मामा रा. पिरवाडी, सातारा यांना सातारचे चिंतामणी हॉस्पिटलमध्ये दाखल केले. त्यांचा आजार म्हणजे मधुमेह, रक्तदाब असा होता व ऐन दिवाळीने आनंदाचे मोसमातच त्यांना दाखल करणे भाग पडले. झाले सर्वांचे आनंदास खीळ बसली आणि सर्वांचेच लक्ष त्यांचे आजारपणाकडे गेले. माझे जावई चि. डॉ. सर्जेराव गणपतराव शिंदे, पशु वैद्यकीय अधिकारी, थोडक्यात म्हणजे माझे जावई, शिष्य व डावा हात अशी त्यांचेबाबत माझी बिरूदावली आहे. असे असताना व जावई हा जावई नसून पूर्वीपासूनच घरातले सातवे माणूस असेच मानले जाते. त्यांचे सुख ते आमचे सुख, त्यांचे दुःख ते आमचे दुःख असे आमचे सर्वांचे वागणे असे व आहे. असे असताना आम्ही त्यांना दुःखात असताना दिवाळीचा सण साजरा करणे हे आम्हाला कोणालाच प्रशस्त वाटले नाही. म्हणून आम्ही हा सण व्यवहारापुरताच साजरा केला व सर्व लक्ष आमचे व्याही श्री. मामा यांचेकडे दिले. त्यांना बरे करण्यासाठी डॉक्टरांचेपासून प्रत्येकजण प्रयत्न करीत होते. पण मामांचा मात्र एकच ध्यास "मला आता जाऊ द्या" काही प्रयत्न करू नका. त्यातच त्यांची मुलगी चि. उषा हिचे लग्न श्री. लक्ष्मणराव भुजबळ, आळेफाटा ह्यांचेबरोबर जमले व लग्न दिनांक २२।१२।१९८५ ला नक्की होते. असे असताना मात्र तिकडे लक्ष न देता मामांची आपली घाई जाण्याचीच चालली होती. जावई व आम्ही आपापल्या परीने सेवा करीत होतोच. पण फरक तर पडत नव्हताच. उलट दिवसेंदिवस तब्येत खाली खालीच होत चालली होती व क्षीण होत होती. रोजच नवीन नवीन घटना घडतच होत्या. असे असताना ऐन दिवाळीत माझे अधिकाऱ्यांनी मला बाहेर गावी अत्यंत महत्त्वाचे गोपनीय कामासाठी दिनांक २३।११।१९८५ ला जाण्याचा लेखी आदेश दिला. आता काय करावयाचे. इकडे मामांची तब्येत हात घाईवर आलेली, आता संपते का मग संपते, अशी शेवटची घटका मोजीत होते. काय करावे व कसे करावे, एकीकडे साहेबांचे अत्यंत महत्त्वाचे काम ते तर कसे टाळावयाचे. कर्तव्यकर्म श्रेष्ठ मानून,

मनाचा धडा करून मी कामासाठी जाण्याचा माझा निर्णय पक्का केला. माझा आतला आवाज मला ''जा'' म्हणूनच सारखा साथ देत होता. त्या जोरावरच मी माझ्या पत्नीस मी ऑफिस कामासाठी बाहेरगावी जात आहे असे सांगितले. तर तिने आपली प्रसंगास धरूनच नकार घंटा वाजविलीच. पण तरीही मी मनाचा हिय्या करून शनिवारी सकाळी ९.०० वाजता जावई श्री साईबाबांचे दर्शनास घरी आले असताना त्यांना स्पष्ट व स्वच्छ विचारले की, ''बाळासाहेब, मी आज ऑफिस कामासाठी बाहेर गावी जात आहे व रात्री परत येत आहे तर, तुम्ही मी जाऊ की नको ते स्पष्ट सांगा?'' त्यांनाही प्रश्न पडला. शेवटी सासरे व जावई हेच नाते बोलत होते व शेवटी त्यांनी जड अंतःकरणाने मला जाण्यास संमती दिली. तेवढ्यावर मी थांबलो नाही तर ते घरी येण्यापूर्वीच मी श्री साईबाबांना प्रार्थना करून त्यांची संमती घेतली होती व नंतर पत्नी व जावई ह्यांचे खास समाधानासाठी व श्री साईबाबांचा परवानगीरूपी आदेश त्यांना स्पष्टच समजावा म्हणून दोन चिठ्या तयार केल्या. एकीवर ''आज जा'' व दुसरीवर ''आज जाऊ नको'' असे लिहीले होते व आधीच पुजा करून श्री साईबाबांना सांगून मी त्या दोन चिठ्या त्यांचे चरणाजवळ ठेवल्या व जावयांची वाट पहात बसलो. ते आले आणि मी त्यांचेबरोबर तोंडी चर्चा केली. लगेच त्यांनी होकार देताच त्यांना देवघरात श्री साईबाबांचे पुढे नेले व त्यातली एक चिठ्ठी उचला व वाचा असे सांगितले. झाले आता कसोटीची व सत्याची वेळ आली. जावयांनी चिठ्ठी उचलली व उघडली व वाचली, तर ती चिठ्ठी ''आज जा'' हीच निघाली. सर्वांनाच फारच आश्चर्य वाटले व मला आनंद झाला. कारण ''सत्य संकल्पाचा दाता भगवान सर्व करी पूर्ण मनोरथ'' ह्या वचनाप्रमाणे माझे सर्व सत्य मानून व कर्तव्यकर्म श्रेष्ठ मानून व वरिष्ठांच्या आज्ञा तंतोतंत पालन करणारा व अधिकारी व सेवा हीच दैवते मानणारा मी, माझे बाजूनेच त्यांनी कौल दिला व जाण्याचा निश्चय पक्का करून मी सर्व तयारी केली व ति. मामांना भेटण्यास गेलो. तेथे त्यांना उदी लावली व जवळच बाहेर श्री दत्तात्रयाचे देऊळ आहे तेथेच कळवळून प्रार्थना केली व स्पष्ट सांगितले ''सर्व काही उद्या, आज काही नाही, मी रात्री येतोच, मला फसवु नका, मला दगा देऊ नका माझा अपेक्षाभंग करू नका. मला दोष येऊ देऊ नका, जावई-सासरे ह्यांचे नात्यात अंतर पडू देऊ नका. अशी आर्त व कळकळीची प्रार्थना मी श्री दत्तात्रयाचे पुढे केली. घरी थोडेसे जेवण केले व कपडे घालून श्री साईबाबांचे पुढे बसलो. उदी लावली व श्री साईबाबांना पुन्हा पुन्हा वरीलप्रमाणे प्रार्थना केली व नेहमीप्रमाणे मी श्री साईबाबांची मूर्ती बरोबर घेऊन ताबडतोब पुन्हा पुन्हा श्री साईबाबांना सांगितले, ''मला फसवू नका, सर्व काही उद्या आज काही नाही'' झाले मी ताबडतोब एस.टी. गाडीने इच्छित ठिकाणी गेलो. सर्व काम केले. सर्व काम संपूर्णपणे यशस्वी झाले व त्या आनंदात मी मामांची सारखी आठवण काढीत मी श्री देवीचे दर्शनास गेलो. तेथे श्री देवीची ओटी भरली. थोडा नाष्टा केला व रात्री १०.३० वाजता निघून रात्री १.४५ वाजता दवाखान्याच्या दारात आलो. दार बंद होते. पण मी बाहेरूनच माझ्या जावयांची गाडी नं. २८८४ पाहिली.

मी आनंदी झालो व समाधानी झालो. माझा माझ्यावर विश्वास बसेना म्हणून मी रिक्शा ड्रायव्हरला पुन्हा नंबर पहाण्यास सांगितला. त्यानेही तोच नंबर सांगितला. ह्याचा अर्थ काय तर ति. मामा सुखरूप आहेत. कसलीही वाईट घटना घडली नाही. ह्याच उर्मीत मी माझ्या सद्‌गुरूंचे शतशः आभार मानून व पुन्हा पुन्हा त्यांना धन्यवाद देऊन व माझा शब्द तुम्ही मानलात व मला धोका दिला नाही. यावरून हे श्री साईबाबांनी सत्य करून दाखविले व मी त्यामुळेच समाधानी झालो. श्री साईबाबांनी व श्री दत्तात्रयांनी माझे आर्त हाकेला ओ दिली. धन्य ते साईबाबा, आपले एकनिष्ठ भक्ताची अब्रु अशी वाचवतात व सांभाळतात. नंतर मी रात्री २.०० वाजता घरी गेलो व समाधानाने झोपलो.

दिनांक २४।११।१९८५ ला सकाळी ९.०० वाजता पुन्हा मी दवाखान्यात गेलो. मला पाहून सर्वांनाच आनंद झाला व मी जिंकलो व मला श्री साईबाबांनी तारले ह्या आनंदातच मी ति. मामांना हाका मारून जागे केले. चौकशी केली, त्यांचे मुखात श्री साईबाबांची उदी घातली, व कपाळास लावली. व १ तास थांबून घरी आलो. आणि बरोबर १.१५ वाजता श्री साईबाबांनी श्री. मामांची दिपज्योत मालवली. असे हे माझे श्री साईबाबा आहेत व त्यांनी माझी आर्त हाक ऐकली. अशा माझ्या सदगुरूंचे कितीही म्हणून उपकार मानावेत तेवढे थोडेच आहेत. म्हणून मी म्हणालो की, श्री साईबाबांनी वरील प्रसंगात आपले खालील वचन सिद्ध करून दाखविले आहे. ते असे की, ''जरी हे शरीर गेलो मी टाकून ।। तरी मी धावेन भक्तासाठी ।। .

# वाट जाते शिरडीच्या गावा

ही वाट दूर जाते शिरडीच्या गावा
माझ्या मनाचे पाखरू धावते साईच्या मंदिरा
भाविकांची दाटी मंदिरी साईच्या दर्शना
मूक भाव कितीकांचे साईच उमजती
अंतरीचा उमाळा साईच समजती
न सांगता समजते ते साईला
शब्द न उरले बोलण्याला
मूक झाली वाणी उर आला भरूनी
हात तो आर्शीवादाचा सदैव असे शीरी
साईच्या डोळ्यातील भाव तो दिलासा
जणु म्हणती ठेव श्रद्धा धरी सबुरी

**— सौ. कलावती वसंतराव चव्हाण**
कैलास भुवन ब्लॉक नं. १
पं. दिन दयाळ रोड डोंबिवली (पश्चिम) जिल्हा ठाणे

# साईभक्ती — साईशक्ती

— श्री. गणेश शांताराम बडगुजर
'साईप्रसाद' पवनानगर
एस्.टी. कॉलनीमागे
सांगवीगाव, पुणे-४११ ०२७

॥ जो जो मज भजे, जैसा जैसा भावे ।
तैसा तैसा पावे मीही त्यासी ॥

शिर्डीनगरी हे साईबाबांचे पवित्र तिर्थक्षेत्र चारही धामात मिळणारा आनंद नुसत्या श्री साईबाबांच्या दर्शनाने मिळतो. म्हणून आजकाल भक्त प्रेमाने 'साईधाम' 'शिर्डीधाम' असेही म्हणतात . सद्‌गुरू साईबाबा एक महान संत या शिर्डीनगरी प्रगटलेले साक्षात् परमेश्वर अवतार घेऊनच ते ईश्वररूपी असूनही त्यांचे जीवन अगदी सामान्याहूनी सामान्य असे होते. अंगी कफनी, डोईस चिंधी हातात करोटे इतक्या साध्या वेशात ते जीवन जगले, आणि मिळणाऱ्या चार-दोन तुकड्यांवर त्यांनी आपला उदरनिर्वाह चालविला. बाबा नुसते सामान्य जीवन जगले नव्हे तर गरीबांपासून श्रीमंतापर्यंत लहानापासून मोठ्यापर्यंत, रंकापासून राजापर्यंत सर्वांना जीवनाचा खराखुरा अर्थ त्यांनी समजावून सांगितला. नुसते श्रीमंत असून चालत नाही तर त्याला गरीबांची जाणीव हवी. त्यांची दुःखे दूर करण्यासाठी त्यांनी झटले पाहिजे. नुसते वयाने मोठे असून चालत नाही तर त्याला लहानांची जाणीव हवी. माणूसकी नावाची गोष्ट त्याच्याकडे हवी. मनाचा मोठेपणा त्याच्याकडे हवा. नुसता मोठेपणाही काय कामाचा? प्रत्यक्ष कृती हवी, झटण्याची, दुःख निवारण्याची, दिनदुबळ्यांना जवळ करण्याची, त्यांच्या दुःखावर हळूवार फूंकर घालून त्यांना आनंद प्राप्त करण्यासाठी झटणे हीच खरी प्रभूसेवा. ईश्वरसेवा. चमत्काराशिवाय नमस्कार नाही म्हणून लोकांची परमेश्वरावरील श्रद्धा, सेवा, भक्ती वाढावी म्हणून बाबांना नानाविध चमत्कर दाखवावे लागले. तेव्हा कुठे लोकांची त्यांच्यावर श्रद्धा बसली. लोक त्यांच्या सेवेस लागले पण केव्हा? बाबांनी पाण्याने पणत पेटवून लोकांना दिपविले. हरविलेला घोडा दाखवून दिला. नुसता चिमटा जमिनीवर आपटून विस्तव निर्माण केला. लोकांची दुःख नुसत्या उदी प्राशनाने, उदी लावल्याने दूर केलीत असे विविध चमत्कार त्यांनी लोकांना दाखविले. त्यांनी चमत्कार दाखविले नसते तर ते एक सामान्य गोसावीच राहीले असते. ते ढोंगी नसते तरी त्यांना लोकांनी ढोंगी साधू-बुवाच म्हटले असते. पण त्यांनी ईश्वरी बळाने चमत्कार दाखविले तेव्हा त्यांच्यातील परमेश्वराची लोकांना ओळख पटली. तेव्हा बाबांचे भक्त वाढलेत. मशीद शेणाने लिंपलेली असताना त्यावर बसून पठाण नमाज पडले. पण त्यांच्या कपड्यास तीळमात्र डाग पडले नाहीत तेव्हा कुठे पठाणांनी बाबांच्या चरणावर लोळण घेतले. ते नमाज पडण्यास जेव्हा आले व त्यांनी शेणाने लिंपलेली मशीद पाहून रागाने लाल झाले व म्हणाले,

अन्याय केला बघू घोर
ओले आहे नमाज घर
गाई म्हशींच्या शेणाने
त्यावर बाबा त्यांना म्हणाले,
नमाज पडा निश्चिंती
तीळमात्र न लागेल माती
गुडग्याशी आपुल्या।

आणि खरोखरच नमाज पडल्यावर पठाणांच्या गुडघ्याला माती लागली नाही. तेव्हा त्या पठाणांनी बाबांच्या चरणावर लोळण घेतले. एक पठाण बोलला, 'आपण आहात वली अल्ला!' पठाणांच्या वाक्यावर बाबा त्याला म्हणाले, 'यात नाही अपराधा। भावे भजा भगवंत। साह्य तुम्हां होईल तो।

'सर्वांभूती परमेश्वर एकची' हे बाबांना दाखवून द्यायचे होते. जात-पात-धर्म हे माणसांनीच निर्माण केलेले आहेत. बाबा हिंदू होते कि मुसलमान होते हे आजवर कुणालाही न उलगडलेले कोडे आहे. 'धर्म-जात-पात तुम्हास हवेच कशासाठी?' असा खडा सवाल बाबा त्याची धर्म-जात विचारणाऱ्याला करीत. बाबांना हेच सिद्ध करायचे होते की, 'कुणीही उच्च-नीच, गरीब-श्रीमंत नाही. आपण सर्व एकाच परमेश्वराची लेकरे आहोत. देवाजवळ कुठलाही भेदभाव नसतो. शेवटी 'परमेश्वर एकची' भक्तांची विविध प्रकारची संकटे दूर करण्यासाठी परमेश्वराला नवनवीन अवतार घ्यावे लागले.

माणसाच्या मनात 'श्रद्धा' हवी आणि 'सबुरी' हवी तरच तो खरा साईभक्त आणि त्याची भक्ती खरी साईभक्ती. त्या साई भक्तीच्या बळावर होणारे बाबांचे दृश्य अदृश्य दर्शन, चमत्कार, विविध अनुभव हिच खरी साईभक्ती. बाबांनी सांगून ठेवलेलेच आहे की, 'बाबा रे! तुझे भोग तुला भोगलेच पाहिजे. त्यात तर मला' बदल करता येणार नाही. जन्म-मरण, सुख-दुःख कुणाला चुकले? साक्षात् परमेश्वरालाही ते चुकले काय? आणि सुख-दुःख जे काय आपण म्हणतो ते खरोखरीच सुख आहे काय? उलट क्षणिक सुखासाठी मनुष्य दुःखाच्या दरीतही कोसळण्याचा संभव असतो. शेवटी जीवन तरी काय? नश्वरच. आज ना उद्या ते नाश पावणाराच. त्यापेक्षा स्वार्थ साधून परमार्थ साधलेला कितीतरी पटीने चांगला. तुम्ही भक्ती करा, पुजन करा, भजन करा, परमेश्वराचे गुणगान गा आणि परमेश्वराला प्राप्त करून घ्या. प्रभु तुमची भक्ती पाहून त्याची शक्ती दाखविल्याशिवाय राहणार नाही. आणि परमेश्वराला प्राप्त करून घेतल्यावर त्यास उणे काय? केवळ बाबा 'श्रद्धा-सबुरी' मंत्राने, उदी प्राशन केल्याने, नुसते नामस्मरण केल्याने भक्ताच्या हाकेला धावून येतात. म्हणूनच बाबा म्हणतात.

'शरण मज आला आणि वाया गेला
दाखवा दाखवा ऐसा कोणी।

'श्रद्धा' म्हणजे 'साईभक्ती' आणि 'सबुरी' ने मिळणारे फळ म्हणजे 'साईशक्ती' होय.

धन्य धन्य ती शिर्डीनगरी
आम्हा दिनांची पंढरी आहे हो।

असे साईध्यानात म्हटलेले आहे. आणि खरोखरीच भक्तांची ती पंढरीच आहे. आणि बाबा भक्तांची विठाई माऊली आहे. म्हणून सांगतो,

पाऊस आला
चिखल झाला
कशाला जातात इतक्या दूर
शिर्डी आपुले पंढरपूर

। श्री अनंत कोटी ब्रम्हांड नायक श्री राजाधिराज
योगिराज सच्चिदानंद सदगुरू साईबाबा की जय।
"साई चरणी कोटी कोटी प्रणाम।"

## "तव चरणी पाहू दे साई"

श्वासांत साई, घासांत साई
तव चरणी पाहू दे साई
माझी मलाच 'परछाई' ॥ धृ. ॥
अभ्यंग-स्नानी, गुलाबपाणी
विश्वरूप साई दावि चक्रपाणी
जागतांच तू, जाग येई ॥ १ ॥
कारुण्य नेत्री, मुद्रा प्रसन्न
पाहतां एकचित्ती, हरपे देहभान
नामे एक 'साई', वेदना पळूनी जाई ॥ २ ॥
थाळीत उरे जेव्हा, एक अन्नकण
तृप्त होती तरी, अगणित मुनिजन
द्रौपदीसखा कृष्णसाई, अजि शिर्डीत पुन्हा येई ॥ ३ ॥

**— विजय द. हजारे एम्.ए.**
सी/६, गुंफादर्शन फर्स्ट कार्टर रोड
बोरीवली पूर्व मुंबई-४०० ०६६

सर्वच्या सर्व ६० रुपये खिशात सापडणे या श्रीसाईनाथांच्या लीलेने माझे आजोबा थक्क झाले. परंतु त्याचबरोबर आपण श्रीसाईबाबांनी घेतलेल्या परीक्षेत पास झालो याचा परम आनंदही झाला. असे आहेत लीला नाटकी आमचे श्री साई, आणि त्यांचे प्रत्यक्ष दर्शन घेऊन त्यांच्या परीक्षेला उतरणारे आमचे पुण्यवान आजोबा दादा वर्दम; आणि म्हणून दादा वर्दम यांचा नातू म्हणवून घ्यायला मला अभिमान वाटतो. आज आमच्याकडून जी काही साईसेवा साईभक्ती घडते ती आमच्या आजोबांचीच पुण्याई आहे. आणि म्हणूनच आम्हाला दरवर्षी शिरडीला जाण्याचा योग येतो. साई माऊली आम्हाला शिरडीला बोलावून घेतात भरपूर प्रेम देतात. यापुढे श्री साईनाथांनी आम्हाला कधीही दूर लोटू नये अशी श्री साईनाथांचे चरणी प्रार्थना करतो.

---

# दर्शन द्यावे साईदेवा

दर्शन द्यावे साईदेवा।
धीर मजसी धरवेना।।

चरणावरती मस्तक नमूनी।
पुजन करीते तुला स्मरूनी।।

तव आशीर्वाद मिळावा।
आस मनी नसे दुसरी।।

तुझी कृपा मजवर असू दे।
तुझ्या चरणी हे मस्तक नमू दे।।

तव आशीर्वादा मी भुकेली।
नमन हे साईदेवा तुजला।।

तुझ्याविना शांती नसे मनाला।
तुझ्या दर्शनाची गोडी मनाला।।

तुझी छाया नित्य शिरी असू दे।
तुझ्या चिंतनी मन माझे रमू दे।।

दर्शन द्यावे साईदेवा।
धीर मजसी धरवेना।।

— **कु. रंजना बाळकृष्ण बोऱ्हाडे**
पट्ठे बापूराव मार्ग, बस डेपोसमोर,
महाराज बिल्डींग, प. मजला,
खो.नं. ३१, मुंबई-४०० ००८

# — श्री साईनाथांनी घेतलेली परीक्षा —

**— श्री. दिनकर स. वर्दम**
११, कांबळी बिल्डिंग, २ रा माळा
खो.नं. ६, टोपीवाला लेन
लॅमिंग्टन रोड, मुंबई- ७

ही गोष्ट आहे, माझे आजोबा कै. गमशेट आपाशेट वर्दम ऊर्फ दादा वर्दम यांनी आम्हा नातवंडांना सांगितलेली, माझे आजोबा कै. दादा वर्दम हे सन १९५८ साली साईचरणी विलीन झाले. ते सतत नामस्मरण करीत असत. कोणते नाम ते घेत असत ते काही आम्हाला समजलेले नाही. परंतु आमच्या गावी म्हणजे 'कुडाळ' (जि. सिंधुदुर्ग) येथे बरेच लोक दादा वर्दम यांच्या हाताने तीन गाठी मारून दिलेल्या दोऱ्याने व्याधीमुक्त होत असत. त्यांच्या हातून मंत्रून घेतलेला दोरा जनावरांना म्हणजे गाई म्हशींनासुद्धा बांधीत असत हे सर्व आम्ही लहान असताना पहात होतोच. शिवाय रात्री घरी आल्यावर ते नवनाथ ग्रंथाचा एक एक अध्याय रोज वाचीत असत व आम्हाला गोष्टीही सांगत असत. या आमच्या पुण्यवान आजोबांना शिरडीत श्रीसाई समाधिस्त होण्यापूर्वी शिरडीला जाऊन प्रत्यक्ष श्री साईभगवंताचे दर्शन घेण्याचा लाभ मिळाला होता, त्यावेळी श्री साईंनी आजोबांची जी परीक्षा घेतली ती घटना आम्हाला आजोबांनी सांगितली ती अशी—

माझे आजोबा कै. दादा वर्दम हे आपल्या १४ वर्षे वयाच्या लहान भावाला बरोबर घेवून शिरडीला गेले होते (हे लहान भाऊ म्हणजे आमचे धाकटे आजोबा श्री. राजाराम आपाशेट वर्दम कुडाळ मुक्कामी आज हयात आहेत) ज्यावेळी हे दोघे बंधू शिरडीला गेले त्यावेळी बाबा मशिदीत होते. कै. दादा वर्दम यांच्या खिशात ५ रु. च्या १२ नोटा म्हणजे एकूण ६० रु. होते त्या काळातील ६० रु. म्हणजे आजच्या जमान्यातील ६०० रु. होत असो, माझ्या आजोबांकडे श्री. साईंनी दक्षिणा मागितली व आजोबांनी ५ रु. दक्षिणा दिली तेव्हा श्री साई म्हणाले 'और लाव' पुन्हा ५ रु. दिले तेव्हा म्हणाले 'और लाव' अशा प्रकारे ११ वेळा ५-५ रु. दिल्यावर शेवटचे ५ रु. राहिले असताना "और लाव" असे म्हटल्यावर माझ्या आजोबांनी शेवटचे ५ रु. दिले व माझी परीक्षा पाहू नका' अशी विनंती केली त्यावेळी श्रीबाबा ओरडले व त्यांना म्हणाले "अब जाव" मग माझे आजोबा बंधूसह कोपरगावपर्यंत चालत आले व मुंबईला परतण्यासाठी पैसे खिशात नसताना गाडीत बसले. गाडी सुटताना अचानक एक टि.सी. आला व त्याने गाडीच्या खिडकीतून हात घालून आजोबांच्या हातात २ तिकीटे दिली व गाडीने वेग घेतला तिकीटे तपासून पाहिली असता ती मुंबईचीच होती. ही तिकीटे खिशात ठेवण्यासाठी आजोबांनी खिशात हात घातला तेव्हा त्यांना नोटांचे पुडके म्हणजेच ५ रु. च्या १२ नोटा ज्या बाबांना अर्पण केल्या होत्या त्या सर्व जशाच्या तशा खिशात असल्याचे आढळून आले. शिरडी ते कोपरगावपर्यंत चालत येवून गाडीत बसे पर्यंत खिशात एकही पैसा नव्हता. परंतु गाडी सुटताना साईरूपी टी.सी.ने तिकीटे देणे व

# हे साईऽऽ तू आई आहेस....

— श्री. अशोक माहिमकर,*
श्रीस्वामी समर्थ मंदिर,
पो. जंजिरा मुरूड (जि. रायगड)

अनन्य चिंतन। करिती जे जन। साई
दयाघन। तयापाठी॥

जीवनामध्ये व भक्तिमध्ये अनन्य चिंतनाचे, नामजपाचे महत्त्व फार आहे.

आपण विज्ञानाचे सहाय्याने कितीही उड्या मारल्या तरी आपले हात आकाशाला टेकू शकत नाहीत व रडारच्या सहाय्याने येणारे वादळ ओळखू शकलो तरी थोपवू शकत नाही!

विश्वसंचालक निसर्गशक्तीने काही गोष्टी तिचे हाती पक्क्या ठेवल्या आहेत. म्हणूनच श्रद्धापूर्वक त्या शक्तीला शरण, त्या शक्तीला मानून आपले जीवनाची वाटचाल करायची. त्या शक्तीसारख्या तेजस्वी अशा थोर योगीराज विभूतींमध्ये ती परमेश्वरी निसर्गशक्ती पाहून त्या विभूतींनी दिलेला 'नामजप' मंत्र मनात ठेवायचा की आपण निर्भय, प्रसन्न व उत्साही होतो.

श्रद्धा 'नामजप' करीत राहीले की त्या थोर विभूतीमधील तेजाच्या लहरी (करंटस्) आपल्यामध्ये हळूहळू संचारू लागतात. शरीरातील व मनातील मरगळ, नैराश्य निघून जाते... तरतरी येऊ लागते व आपले मनोबल वाढू लागते. एका प्रचंड आश्वाराची जाणीव होत राहून आपण निर्भय, आनंदमय होतो!

श्रद्धा विज्ञान आहे, हे अश्रद्ध नवीन पिढीने विसरू नये.

नित्य श्रीसाईंना 'साईऽऽ' अशी तळमळीने साद घालायची... डोळ्यात पाणी आले पाहिजे. जोपर्यंत देवाचे नावाने आपल्या डोळ्यात पाणी येत नाही, तोपर्यंत सारे फुकट!

आणि अशी अडचणी निवारणासाठी, चांगल्यासाठी 'मस्का' ही लावायचा नाही.

तर, हे साईऽऽ तू आई आहेस. 'तेरे फुलोंसे भी प्यार— तेरे कांटोंसेभी प्यार!' माझ्या ओंजळीत फुले टाक नाहीतर काटे टाक, पण फक्त दोन्ही वेळेला माझेकडे तुझी पहायची दृष्टी मायेची ठेव. तू माझी आई आहेस.

आईने मायेने दिलेली शाबासकी (फुले) आणि आईने मायेने दिलेला मार (काटे) ही दोन्ही मुलाचे कल्याणच करतात! फुले व काटे सारखेच आहेत. आमचा पहायचा दृष्टीकोन चुकतो. फुले ही आनंदाचा सुगंध देतात, तर काटे हे 'काट्याने काटा निघतो' या उक्तीप्रमाणे अडचणींचा काटा काढून अंती आनंदच देतात.

दृष्टीच तर सारी खुबी आहे. ही खुबी ज्याने जाणली तो जीवन जिंकला!

आम्ही जीवनात श्रद्धा, सबुरी व हिंमत ढळू द्यायची नाही.

॥ श्रीसाई समर्थ—हिंमत समर्थ ॥

*या लेखाचे लेखक श्री. अशोक माहिमकर यांचे नुकतेच देहावसान झाले. त्यांच्या स्मृतीस आमचे अभिवादन.

# बाबांनी भक्ताची लाज राखली

— श्री. वि.गो. पाठक
सविता सदन
साईनाथ रोड मालाड (प.)
मुंबई- ६४

इ.स.१९८५ च्या गणेश उत्सवात घडलेली घटना

मला एका कोळी गृहस्थाकडे श्री सत्यनारायणाची पूजा करण्यास आमच्या गुरूजीने मला सांगितले. ह्या कोळी लोकांत थोडी निराळी पद्धत असते. आमच्या गुरूजींनी मला सर्व समजावून सांगितले व ते दुसरीकडे कामासाठी निघून गेले. कोळी लोक मखराच्या चारी कोपऱ्यात चार तांब्याचे लहान तांबे (गडू) ठेवतात व त्याच्यावर लहान ताम्हण तूपाने भरून त्यात फुलवात लावायची असते, व ती सुद्धा पोथी वाचायच्या वेळी. ह्या पद्धतीला फार महत्व देतात.

मी त्याप्रमाणे मांडणी केली व पूजेला सुरवात केली. सर्व पूजाविधि व्यवस्थित पार पडला. मी पोथी (कथा) वाचावयास सुरवात केली. पाचवा अध्याय संपूर्ण झाला. आरती मंत्र पुष्पांजली करून मालकासह सर्वांना तीर्थप्रसाद दिला. मी सुद्धा घेतला. थोड्यावेळाने मालकाची परवानगी घेवून रात्रौ ८.३० ला घरी आलो. मला एकदम मखरातल्या फुलवाती प्रज्वलीत न केल्याचे माझ्या लक्षात आले. माझ्या छातीत धस्स् झाले. मी घाबरून गेलो. कारण उद्या आपल्याला मालकाचे दोन शब्द खावे लागणार. गुरूजींना व आपल्याला मान् खाली घालावी लागणार. मी पुनः रात्री त्यांच्या घरी जाण्याचा विचार केला परंतु घरच्या मंडळींनी विरोध केला. आता काय करणार! योगायोगाने रोजची संध्याकाळची बाबांची आरती व्हायची होती. आरती केली व श्रीबाबांना हात जोडून मनोमन प्रार्थना केली, 'आता तुम्हीच माझी लाज राखणार, दुसरे कोण?' पुनः पुनः बाबांना विनंती केली.

रात्री जेवण तर गोड लागले नाहीच व रात्री झोपसुद्धा आली नाही. सकाळी ५ वाजता उठलो आंघोळ करून श्रीबाबांची पुनः प्रार्थना करून उत्तरपूजेसाठी त्यांचे घरी गेलो. दरवाजा बंद होता. बेल दाबली, परंतु छातीत धडधड होत होते. कारण मालक काय बोलेल ते ऐकावे लागेल. दरवाजा उघडला गेला. मालक हसतच पुढे आले. 'या भटजी बसा, लवकर आलात.' पाट बसावयास दिला व घरात चहासाठी सांगून मालक आंघोळीला निघून गेले. माझे लक्ष मखरातल्या फुलवातीकडे गेले. मालक आंघोळीला गेल्याची संधी साधून मी चारी फुलवाती प्रज्वलीत केल्या व पाटावर येऊन बसलो व श्री सत्यनारायणाची व बाबांची पुनः प्रार्थना केली. माझ्या जीवात जीव आला. मला हायसे वाटले. थोड्याच वेळात मालक चहा घेऊन आले. चहा घेतला फारच गोड लागला. नंतर उत्तर पूजा केली.

थोडक्यात सांगावयाचे म्हणजे त्यांचेकडे देवाच्या पाया पडण्यास पुष्कळ लोक येऊन गेले. मालक व त्यांचे नातेवाईक मंडळी रात्री भजन व पत्ते खेळण्यासाठी देवासमोरच बसली होती. परंतु रात्रभर देवाजवळ बसलेल्या मंडळींचे किंवा मालकाचे वा कुणाचेही लक्ष त्या फुलवातीकडे गेले नाही. श्रीबाबांनी त्या सर्वांची नजरबंदी करून आपल्या भक्ताची लाज राखली.

खरोखरच बाबांची किमया अगाध आहे.

श्री बाबांच्या चरणी माझे शतशः प्रणाम!

*******

# = कासवी =

**— सौ. भावना जेऊरकर**
**डोंबिवली**

साई सच्चरितकार कै. गोविंदराव दाभोलकरजींनी अध्याय १९ मध्ये साईबाबांचे व साईभक्तांचे नाते कोणत्या प्रकारे व कसे असावे याविषयी वर्णन केले आहे. ओव्या क्रमांक १११ ते ११३ यामध्ये त्यांनी स्पष्टपणे कथन केले आहे ते असे —

कासवी नदीचे ऐल कांठी। तिची पिल्ले पैल तटीं।
ना दूध, ना ऊब केवळ दृष्टी। देई पुष्टी बाळका॥ १११ ॥

कासवीण आपल्या बाळांना कधीच दूध पाजत नाही. आपल्या पिल्लांना कधीच कुशीत घेत नाही एवढेच नाही तर माय कासवी नदीच्या एका काठी असेल अन् तिची पिल्ले दुसऱ्या काठी असली तरी तिच्या केवळ प्रेमळ दृष्टीने ती आपल्या बाळांचे रक्षण करीत असते. फक्त तिच्या ममतेची दृष्टीच आपल्या बाळांना वाढवत असते; त्यांचे पालनपोषण करीत असते.

अर्थात् बाबा आपणा सर्वांस कासवीण रूपी आईप्रमाणे आहेत. शिर्डी क्षेत्री ही साई आई राहून जगाच्या कानाकोपऱ्यापर्यंत तिची जी भक्तरुपी पिल्ले विखुरलेली आहेत त्यांच्यावर केवळ बाबांची कृपादृष्टीची नजरच आधार देण्यास सदैव कारणीभूत होत असते. बाबांच्या प्रेमळ, कृपाळू कनवाळू नजरेलाच आपण सर्वजण आतुरलेले असतो; असले पाहिजे.

पिलियां सदा आईचे ध्यान। न लगे काहीच करणे आन
न लगे दुग्ध ना चारा, ना अन्न। माता निरीक्षण पोषण त्या॥ ११२ ॥

कासवीणीची बाळे दूर राहूनही सदा आईच्याच विचारात गढून गेलेली असतात त्याप्रमाणे साईभक्त, साईप्रेमी यांनी साईमाऊलीचे चिंतनात नेहमीच मग्न राहिले पाहिजे. माय कासवी आपल्या बाळांना अन्नपाणी, चारा भरवत नाही. मात्र तिचे नेत्रपटल हेच तिच्या पिल्लांचे पोषण करण्यास पुरे होतात. जर आपण साईप्रेमिकांनी आपल्या साई

आईचे निरंतर ध्यान केले, स्मरण केले, तर ती कनवाळू आई आपल्या पिल्लांवर लेकरांवर कृपादृष्टीची नजर ठेवल्याशिवाय राहिल काय? नव्हे ही साई आई आपणा सर्वांवर कृपादृष्टी ठेवेलच.

हें जे निरीक्षण कूर्मदृष्टी। ही तो प्रत्यक्ष अमृतवृष्टी
पिलियां लाधे स्वानंद पुष्टि। एक्य सृष्टी गुरू शिष्यां ॥ ११३ ॥

कासवीणीचे आपल्या बाळांच्या प्रति जे निरीक्षण असते; तिची मायेची दृष्टी तिच्या पिल्लांना जणू अमृताची वृष्टी असते. आपल्या आईच्या नजरेतील आनंद पिल्लांना वाढवत असतो. कासवीण व तिची पिल्ले दृष्टादृष्टीतच एकमेकांची नाती जाणतात, उमजतात, स्वतःला धन्य मानत असतात.

साई प्रेमीकांनो! आपणही साईभक्तीत इतके एकरुप झाले पाहिजे की, साईंच्या नजरेतून आईची ममता, वात्सल्य प्रेम हे भाव वाहत असतात ते आपल्याला प्राशन करता आले पाहिजे. आपली साईंवर एवढी अढळ श्रद्धा असली पाहिजे की, साईंच्या कृपादृष्टीतील अमृत पिण्याची क्षमता आपल्यात आली पाहिजे.

याच अध्यायात ओवी क्रमांक ७३ मध्ये बाबा आपणा सर्वांना सांगतात —

तू मजकडे अनन्य पाहीं। पाहीन तुजकडे तैसाच मी ही ॥ ७३ ॥

इतकी सोपी भक्ती बाबा आपल्याला करावयास सांगतात. कासवी-पिल्लांचे, हरणी-पाडसाचे, माय-लेकराचे नाते म्हणजे अगदी जवळचे अतूट असे ममतेचे नाते जोडून जर साई-आई आपणास दिलासा देते तर मग आपण का बरे साई-आईपासून वंचित व्हावयाचे? म्हणून मला साई-आईबद्दल म्हणावेसे वाटते,

"साई! पाहतो तुला माय कासवी रुपात
तुझी पिल्ले आम्ही, वाढू तुझ्या कृपेत."

# साई मज दिसला

दर्शना आलो साई शिरडी भावफुलांची माळ घेऊनी
मस्तक ठेऊनि तुझीया चरणी चित्त रंगले तुज पाहूनी
प्रेम बहरूनी हर्ष फुलला कलियुगी मज साई दिसला
गंगा यमुना नयनी भरता जळीं स्थळीं मज साई दिसला
चित्त रंगले साई पूजिता अमृत प्याला ओठी भरला
धुवुनी निघाले अंतःकरण कांस धरिता सत्संगाची साई मज दिसला

— **श्री. बा. बा. चमणकर**
'सुलक्ष्मी', बंगला क्रमांक १५
कैलास नगर, डोंबिवली (पश्चिम)

# श्री साईनाथांची अशी कृपा

— सौ. नीलम डी. देशपांडे
११३९ ई-साईक्स एक्सटेंशन
कोल्हापूर

श्री साईनाथांची किमया अगाध आहे. त्यांच्या आशीवार्दाने अशक्य ते शक्य झाल्याचे अनेक अनुभव सर्व साईभक्तांना वेळोवेळी येतच असतात. साईंच्या दरबारी आलेला भक्त कधीही विन्मुख होऊन मागे परतत नाही.

जाणा येथे आहे सहाय्य सर्वांस।
मागे जे जे ज्यास ते ते लाभे।।

या त्यांच्या उक्तीची प्रचीती प्रत्येकाला पदोपदी येतच असते. सगळेच अनुभव काही मासिकातून प्रसिद्ध करता येणार नाहीत. तरी सुद्धा एक अनुभव आता येथे देत आहे.

श्रीसाईबाबांच्या कृपेने माझे लग्न झाले. लग्नानंतर सव्वा वर्षातच एक अनपेक्षित ऑपरेशन झाले. अर्थात् त्याहीवेळी बाबांच्या कृपादृष्टीनेच मी त्या प्रसंगातून वाचले. (तेव्हा बाबांनी माझे कसे काय रक्षण केले ते नोव्हें. १९८१ च्या अंकात प्रकाशित झालेच आहे.) पण त्या ऑपरेशननंतर संतती प्राप्तीचा प्रश्न फार अवघड होऊन बसला. अॅलोपॅथीक सर्व उपचार घेऊन झाले. अशीच ३ वर्षे लोटली. 'दोष काही नाही' म्हणून डॉक्टर सांगत , पण यश कुणालाही येत नव्हते. मी माझा सर्व भार, काळजी साईबाबांवर टाकून राहिले होती. ज्यांनी माझे लग्न केले तो माझा परमेश्वर संसार फुलविल्याशिवाय राहणार नाही म्हणून आशा धरून साईंना विनवीत राहिले. अशातच १९८४ च्या संक्रातीच्या दिवशी ती. सौ. आई साई चरणी विलीन झाली. ते दुःख विसरण्यासाठी फेब्रुवारीत मी माझ्या वडिलांबरोबर शिरडीस गेले. तेथे अभिषेक-पुजा झाली. माझ्या ओटीत प्रसादाचा नारळ घातला गेला. तो तसाच घेऊन मी समाधी मंदिरातील मूर्तीच्या पायावर नमस्कारासाठी वाकले. आणि काय सांगू! मूर्तीवरील फुले पटापट माझ्या पाठीवर बरसली. भाऊ पाठीमागे होतो. त्याला विचारले, 'काय पडले?' तो म्हणाला, 'तुला बाबांनी प्रसाद दिला.' आणि तेथून पुढे वर्षाच्या आतच गोड प्रसादाप्रमाणेच गोड मुलगी मला दिली. आता ती दिसामासी वाढते आहे. काही किरकोळ तब्येतीच्या तक्रारी आहेत त्याही श्रीबाबा दूर करून माझ्या (म्हणजे त्यांच्याच) बाळीला लवकर सुदृढ करतील असा मला दृढविश्वास आहे. तिलाही साईंनी आपल्या भक्तीची गोडी देऊन कृपेचा हस्त ठेवावा हीच नाथांच्या चरणी नम्र प्रार्थना.

# श्री साईबाबांचे नमस्कार करायला लावणारे चमत्कार

— श्री. सत्यवान गायकवाड
३९९ नवी खडकी
येरवडा पुणे-४११००६.

खरे आणि खोटे
जाणे तोचि जाणे,
सद्‌गुरू बाबांचे
फाटके तुटके नेसतो रे
परि नमस्कारास चमत्कार दाखवितो रे

संतांचे जीवन चमत्कारांनी भरलेले असते. चमत्काराशिवाय नमस्कार नसतो हे खरे असले तरी — नमस्काराकरिता चमत्कार संत — सज्जन दाखवित नसतात. कार्यात अडथळे निर्माण झाल्यास, भक्त दुःखाने गांजल्यास, तन्निवारणार्थ कार्याचा एक भाग म्हणून या गोष्टी त्यांना कराव्या, लागतात. येशू ख्रिस्ताच्या चरित्रात चमत्कार आहेत. ज्ञानेश्वरांनी देखील कुटाळखोरांना उत्तर म्हणून रेड्याच्या तोंडून वेद बोलून दाखविले. पाठीवरून अग्नी काढून त्यावर मांडे भाजले. "इंद्रियाद्वारे प्राप्त झालेले ज्ञान अपूर्ण असते कारण इंद्रियांची शक्ति संकुचित सीमीत असते. माणसाचा आत्मा ईश्वराचे मंदिर आहे. आत्मा नेहमी सांगत असतो ईश्वरावर विश्वास ठेवा.

सत्य कृपाळू परमेश्वराने ह्या धरतीवर श्री साईबाबांच्या आत्म्याला (दुसऱ्या मनुष्याच्या शरीरात) पाठवून त्यांच्याकरवी आमच्यासारख्या पामर दासांना स्वतःच्या सत्य अमर धर्माचे सत्य ज्ञान कथन करविले. त्याचबरोबर श्री साईबाबांनी जीवंतपणी स्वतःच्या आचरणाने सर्व मानवांना सबळ पुरावा दाखवून दिला की सर्व जगाचे खरेखुरे मालक एकमेव सत्य कृपाळू परमेश्वर हे पृथ्वीतलावर असलेल्या मानवाला चमत्काराशिवाय नमस्कार नाही हे निश्चित आहे.

## गंगायमुना

एकदा शुभपर्वकाल आलेला पाहून दासगणूंच्या मनात गंगायमुनांच्या संगमावर प्रयाग क्षेत्रात स्नान करण्याचा विचार आला. शिरडीला बाबांच्या परवानगीशिवाय कुणाही भक्तांचे पान हालत नसे. दासगणू नम्रपणे बाबांजवळ गंगास्नानाला जाण्याची परवानगी मागण्यास गेले. बाबा मधुर स्मित करून मिस्किलपणे म्हणाले, "अरे वेड्या, इतक्या लांब तीर्थस्नानाला जाण्याची काय जरूरी आहे? आपले प्रयाग इथेच आहे. मनामध्ये दृढविश्वास मात्र पाहिजे" इतके बोलतात तो खरोखरच अद्‌भुत चमत्कार पाहून दासगणूंनी गहिवरून आज्ञा शिरसावंद्य मानून पायांवर डोके ठेवले आणि बाबांच्या दोन्ही अंगुष्ठांतून गंगायमुनांच्या पवित्र पाण्याच्या झरा झुळझुळ वाहू लागला. हा चमत्कार पाहून दासगणूंना गहिवरून आले. त्यांचे डोळे पाण्याने भरून आले आणि बाबांची अगाध लीला पाहून मनाच्या पूर्ण आनंदी स्थितीत त्यांना खालील भक्तिपर पद लिहिण्याची स्फूर्ति झाली.

अगाध शक्ति अघटित लीला तव सद्गुरूराया।
जडजीवांते भवि ताराया तूं नौका सदया।।
वेणीमाधव आपण होऊनि प्रयाग पद केले।
गंगायमुनाद्वय अंगुष्ठी प्रवाह दाखविले।।

## विठ्ठलाचे दर्शन

श्रीमंत दासगणू महाराजांना पंढरपूरला जाऊन श्री विठ्ठलाचे दर्शन घेण्याची इच्छा झाली. तेव्हा श्रीबाबांनी त्यांना तिथल्या तिथेच शिरडीत साक्षात् श्री पांडुरंगाचे दर्शन घडविले आणि मग दासगणूंच्या तोंडून शिरडी माझे पंढरपूर साईबाबा रमावर या सुंदर अभंगाची निर्मिती झाली.

## पणत्यांत पाणी घालून त्या तेवत ठेवल्या

श्री बाबांना दिवे लावून रोषणाई करण्याची मनस्वी आवड होती. बाबा मशिदीतल्या चार कोपऱ्यात चार पणत्या, रात्रीच्या वेळी लावून ठेवीतच असत पण त्याशिवाय त्या पवित्र लिंबाच्या झाडाखाली एक, शनि मंदिरात एक आणि मारुतीच्या देवळात एक अशा तीन पणत्या रात्रीच्या वेळी लावून ठेवीत. या साऱ्या पणत्या तेवत ठेवण्यासाठी श्री बाबांना दररोज तेलाची गरज भासे त्यासाठी ते दररोज संध्याकाळी गावातील वाण्यांकडे तेलाची भिक्षा मागत असत. जमा केलेले तेल पणत्यांत घालून द्वारकामाई रोषणाईने सुशोभित करावी आणि समोरील दगडावर बसून त्या रोषणाईकडे एकटक पहात असावे हा श्री बाबांचा नित्याचा छंद होता. त्यांच्या या नित्याच्या कार्यक्रमाला गावातले वाणी कंटाळले. रोज तेलाची भिक्षा मागणाऱ्या या वेड्या फकिरास तेल द्यायचे नाही असे त्या सर्वांनी ठरविले. हातात टमरेल घेऊन समोरच वाण्याच्या दारावर जाऊन ते उभे राहिले व म्हणाले तेलीदादा थोडे तेल टाका. त्यावर वाणी म्हणाला अरेरे काय करावे माझ्याकडे तुम्हाला देण्याकरिता बिलकूल तेल नाही. माफ करा. आणि पुढे जा. बाबा दोन तीन वाण्यांकडे गेले. परंतु श्री बाबांना तेलाचा एक थेंब देखील कुणी दिला नाही. बाबांना या गोष्टीचा बिलकुल राग आला नाही. उलट यांना कायमचे आपलेसे करण्यासाठी व रुपये-आणे-पैच्या शुष्क व्यवहारातून परमार्थाकडे खेचून घेण्यासाठी हीच एक सुवर्णसंधी आहे असे मानून ते द्वारकामाईकडे परतले. बाबांच्या पाठोपाठ ते वाणीसुद्धा बाबा कसे काय पणत्या पेटवणार म्हणून फजिती पहाण्यास द्वारकामाईच्या बाहेर लपून उभे राहिले. बाबांनी आपले मन एकाग्र केले आणि मडक्यातील पाणी टमरेलात घेऊन ते पणतीमध्ये भरू लागले. पाण्याने भरून झाल्यावर त्यानी एकेका पणतीची वात काडीने पेटवायला सुरवात केली आणि काय आश्चर्य पाण्याने भरलेल्या पणत्या पेटल्या आणि द्वारकामाई प्रकाशात न्हाऊन निघाली. या चमत्कारामुळे सर्वांच्या डोक्यात लख्ख प्रकाश पडला, आणि सर्वांनी बाबांच्या पायांवर डोके ठेवले. केलेल्या कृतिची क्षमा मागितली. बाबा देव आहेत अशी खात्री झाली. बाबांचा चमत्कार पाहून सर्वांनी साष्टांग नमस्कार केला आणि लोटांगण घातले.

## श्री शंभो साईनाथ

मेघा हा डेप्युटी कलेक्टर साठे यांचे घरी आचारी होता. जातीने ब्राह्मण, परंतु शिक्षणाचा मुळीच गंध नव्हता. त्याच्या तोंडून सदा न कदा 'नमः शिवाय' असे देवाचे नाव बाहेर पडायचे. नित्यनियमाने तो शंकराची पूजा करी. एक दिवस या मेघाला साठेसाहेबांनी आपल्याबरोबर बाबांच्या दर्शनाला शिरडीच्या मशिदीत नेण्याचा विचार केला. परंतु या मेघाला कोणीतरी सांगितले होते की साईबाबा हे काही हिंदू साधू नव्हेत ते मुसलमान फकीर आहेत. परंतु हिंदूंना ते 'धर्मात्मा' तर 'मुसलमानाना' 'अवलिया फकीर' वाटायचे हे मेघाला माहित नव्हते. शंकराची पूजा सोडून एका मुसलमान फकीराची पूजा करायची हे ऐकून मेघाला फार वाईट वाटले. साठेंनी त्याची समजूत घातली व बाबांच्या खऱ्या स्वरुपाची थोडी ओळख करून दिली तेव्हा थोडे समाधान पावून मेघा बाबांच्या दर्शनास गेला द्वारकामाईच्या आवारात पाय ठेवताच श्री बाबा मोठ्याने ओरडले. आणि म्हणाले "खबरदार वर आलास तर' चालता हो. मुसलमानाकडे कशाला आलास?" बाबांनी पहिल्या भेटीतच मेघाच्या मनातील भाव ओळखला व त्याला साक्षात् शंकराचे दर्शन घडविले. हा चमत्कार पाहून मेघाने बाबांच्या पायावर लोटांगण घातले. साष्टांग नमस्कार केला आणि या वेळेपासून रोज दीड तास श्री बाबांची तो आरती करू लागला.

## श्रीरामप्रभूची मंगलमूर्ति दिसू लागली

सन १९०९ च्या नाताळात एक डॉक्टर आपल्या मित्राबरोबर शिरडीस गेले होते. हे डॉक्टर रामभक्त होते. आणि स्वतःला स्नानसंध्याशील कर्मठ ब्राह्मण समजत. त्यांचे सोवळे ओवळे फार कडक असल्यामुळे "आपण या मुसलमान फकीराच्या मशिदीत येणार नाही" अशा काही अटी कबूल करूनच डॉक्टर आपल्या मित्राच्या आग्रहास्तव केवळ गंमत म्हणून शिरडीला आले होते.

या डॉक्टरांच्या मित्राची श्री बाबांवर अढळ श्रद्धा आणि भक्ति होती ज्या वेळी मशिदीत हे दोघे दर्शनाकरिता निघाले तेव्हा डॉक्टरांचे मित्र म्हणाले डॉक्टर आपणास मी दुराग्रह किंवा हट्ट करीत नाही. तेथे गेल्यानंतर आपण योग्य वाटेल असे वागा असे म्हणून ते दोघेही मशिदीत गेले आणि श्रीबाबांच्या पायावर प्रथम डॉक्टरांच्या मित्रांनी नमस्कार केला. त्याच्या पाठोपाठ डॉक्टरांनी सुद्धा साष्टांग नमस्कार केला. मागे वळून पहातो तो त्यांच्या डॉक्टर मित्रांनी बाबांच्या चरणांवर डोके ठेवले. हा चमत्कार पाहून त्यांना विचारले आपण असे करण्याचे प्रयोजन काय तेव्हा डॉक्टर म्हणाले अरे चुकलो द्वारकामाईत शिरताच मला साईबाबांच्या जागी श्रीरामप्रभूंची मंगल मूर्ति दिसू लागली. धन्यधन्य साईनाथा! तुझी लीला अगाध आहे. या तुमच्या दासाला क्षमा करा. पुनः कधीही असा अहंकार आणि गर्व बाळगणार नाही.

## प्लेगच्या साथीचे पलायन

सुमारे १९१० मध्ये शिरडी गावात प्लेगची साथ सुरू झाली ती इतकी भयंकर होती की गावचे स्मशान अवस्थेत रूपांतर होण्याची वेळ आली. शिरडीमधील लोकांनी

अशा संकटकाळी बाबांकडे धाव घेतली. बाबांनी अंतरज्ञानाने शिरडीवरील संकटाची वेळ ओळखून दोन चार बाया बोलवून चार पायल्या गहू दळले आणि ते पीठ गावच्या वेशीवर नेऊन टाकण्यास सांगितले. लगेच माणसे मृत्युमुखी पडण्याचे बंद झाले. हा श्री बाबांचा चमत्कार पाहून शिरडीमधील लोकांच्या डोळ्यात अश्रू उभे राहिले सर्वांनी बाबांच्या चरणावर डोके ठेवले आणि साष्टांग नमस्कार केला.

### टांगेवाल्याचा चमत्कार

एकदा बाबांचे परमभक्त नानासाहेब चांदोरकर हे जामनेरला मामलेदार असताना त्यांची मुलगी प्रसूति वेदना सहन न होऊन ओरडू लागली. पहिल्याच बाळंतपणी तिला घरी आणले होते. अशा संकटसमयी नानांनी श्री बाबांची एकसारखी आठवण आणि आर्तस्वराने हाक मारली. ही हाक शिरडीमध्ये श्री बाबांना ऐकू गेली. ताबडतोब खानदेशात निघालेल्या रामगीरबुवाजवळ उदी आणि आरती-आरती साईबाबा सौख्य दातारा जीवा- ही उतरवून देऊन नानासाहेबांकडे पाठविली. रामगीरबुवांना अपरात्री चाळीस गावच्या रेल्वे स्टेशनवर उतरावे लागले. तेथे टांगेवाल्याच्या रूपाने बाबा प्रकट होऊन त्यांना बाबांनी नानांच्या वाड्यात सोडले आणि श्रीबाबा अदृश्य झाले. आणलेली उदी पाण्यात देऊन कपाळाला लावली तोच मुलगी सुखरूप बाळंत झाली. हा चमत्कार पाहून चांदोरकरांना गहिवरून आले. डोळ्यातून आनंदाश्रू वाहू लागले. व श्रीबाबांना साष्टांग नमस्कार केला.

श्री साईबाबांनी असे कितीतरी चमत्कार केले आणि आजसुद्धा श्री बाबा चमत्कार करून नमस्कार करावयास लावत आहेत. हे सच्चा साईभक्ताने ओळखले पाहिजे.

साई केली आराधना बीज दळोनिया।
प्रसन्न होई ईश्वर साई त्यांच्या भक्तिद्वारे।।
भक्तांची लाज राखी वेळोवेळी ईश्वर साई।
स्वधर्माचे रक्षण होई चमत्कारापायी।।

*****

# माझा शिरडीतील पहिला अनुभव

**— श्री. शं.ग. सारंगधर**
अ/८ साई-कुटीर, डहाणूकर वाडी दत्त मंदिर मार्ग,
कांदिवली (पश्चिम) मुंबई-४०० ०६७

१९५१ सालची ही गोष्ट आहे. त्यावेळी मी मुंबईत ठाकुरद्वारी राहात होतो. एके रात्री मी फणसवाडीतून जात असताना तेथील प्रेमळ विठ्ठल मंदिरातून आरतीचे स्वर कानी आले. देवळात आरती चाललेली दिसत नव्हती. पण स्वर मात्र लक्ष वेधून घेत होते. मी आत गेलो. देवाच्या गाभाऱ्यामागे आरती चालू होती. प्रदक्षिणेच्या मार्गात

बरीच गर्दी होती. मी तेथेच थांबलो. आरती प्रार्थना आटोपल्यावर गर्दीबरोबर मी पण पुढे सरकू लागलो. पाठीमागे एका संताच्या प्रतिमेसमोर भक्तजन नतमस्तक होऊन पुढे जात होते. मी पण शीर नमवून नमस्कार केला. चौकशी करता कळले की ती प्रतिमा शिरडीच्या संतांची — श्री साईबाबांची होय.

त्यावेळपर्यंत मला साईबाबांची काहीच माहिती नव्हती. पण आता त्यांचबद्दल माझ्या मनात कुतुहल निर्माण झाले. भक्तांना आपल्याकडे ओढून आणणाऱ्या या संताची मी जिज्ञासेने जो जो अधिक माहिती मिळवू लागलो तो तो मनातील आर्तता जास्त वाढू लागली. मी वारंवार आरतीला हजर राहू लागलो.

बाबा आता हयात नाहीत. त्यांचे निर्वाण होऊन बरीच वर्षे लोटली. आता त्यांचे सदेह दर्शन होणे नाही. ही जाणीव मन उदास करून टाकीत असे.

शिरडी गाव मूळचे एक लहानसे खेडेगाव. पण श्री साईसच्चरितात त्याचे वर्णन कसे केले आहे पहा :—

गाव शिरडी आधी लहान। साई सहवासे झाला महान।
त्याचेनि झाला अति पावन। त्याचेनि तीर्थपण तयाला।
(सा.स.अ. ३९ ओ. ३)

इथे बसून भक्तांच्या सुखदुःखाची त्यांनी काळजी वाहिली. आता ते हयात नाहीत म्हणून उदास होण्याचे काय कारण. सच्चरितकार दिलासा देतात :—

आता काय शिरडींत। समर्थ झाले ब्रह्मीभूत।
ऐसी न शंका यावी मनांत। मरणातीत श्रीसाई।
(सा.स.अ. ४३ ओ. ७४)

शिवाय श्रीबाबांनी सांगितले आहेना —

नित्य मी जिवंत जाणा हेचि सत्य। नित्य घ्या प्रचित अनुभवे।

मी नसलो तरी समाधीतून माझी हाडे तुमच्याशी बोलतील असे आश्वासन पण त्यांनी दिले आहे. श्री. बाबांचे बोल खोटे कसे असतील? या बोलावर विश्वास ठेवून त्या पावन क्षेत्राचे दर्शन घ्यावे म्हणून शिरडीला जाण्याचे मी निश्चित केले. ऑफिसातून रजा घेऊन एक दिवस प्रस्थान केले. रात्रीच्या गाडीने निघालो व शिरडीला पहाटेच्या सुमारास पोहोचलो. बस शिरडीजवळ येत असताना पहाटेच्या अंधारात समाधी मंदिराच्या कळसावरील तळपणारा दिवा आकाशातील ताऱ्याप्रमाणे वाटला. नकळत माझे कर जुळले.

बसमधून उतरताच हमालाने सामान उचलून आम्हाला ऑफिसात नेले. त्यावेळी ऑफिस गुरु-पादुकास्थानासमोरील जागेत होते. तेथे नाव, गाव, पत्ता लिहून घेतल्यावर समाधी मंदिराच्या वर मागील बाजूच्या एका खोलीची चावी देऊन हमालाबरोबर जाण्यास सांगितले. समाधी मंदिरातील काकड आरती संपून समाधी स्नानाचा कार्यक्रम चालू होता. सामान खोलीत ठेवून वरूनच तो सोहळा पाहत उभा राहिलो. समाधीवरील गॅलरीच्या कठड्याला त्या वेळी जाळी नव्हती. ती नंतर लावण्यात आली. श्रीसाईबाबांच्या पुतळ्याच्या

प्रतिष्ठापना पण १९५४ साली झाली. तत्पूर्वी त्याजागी एक सुंदर प्रतिमा होती. जी आता बाबांच्या वापरातील वस्तूंच्या काच घरात ठेवली आहे.

स्नान उरकल्यावर प्रथम समाधी मंदिरात जाऊन श्रीबाबांचे दर्शन घेतले. यावेळी अभिषेक सोहळा चालू होता. मध्यान आरतीच्या वेळची प्रसन्न शांतता आणि गांभीर्य व अखेरीस भालदार-चोपदारांनी दिलेली ललकारी यांनी मी प्रभावित झालो. मला हा अनुभव नवीनच होता. दुपारचे भोजन संस्थानच्या भोजनगृहात घेऊन थोडी विश्रांती घेतल्यावर खाली उतरलो.

प्रथम द्वारकामाईत गेलो. ही मूळची एक पडकी उपेक्षित मशिद. श्रीबाबांच्या वास्तव्याने तिचे एका पवित्र धर्मस्थानात रूपांतर झाले. 'द्वारकामाई' असे तिचे नामाभिधान झाले.

मोठी कृपाळू ही मशिदमाई। ही भोळ्या भाविकांची ही आई।
एकदा हिचे जो अंकी बैसला। बेडा तयाचा पार पडला।
(सा.स.अ. २२)

असे या द्वारकामाईचे महत्व श्रीबाबांनी वर्णन केले आहे. शिरडी गावचा पुढील अर्धशतकाचा इतिहास इथेच घडला. श्रीबाबांच्या किर्तीचा परिमल देशी-परदेशी येथूनच पसरला. विना प्रचार. ज्या शिलेवर श्रीबाबा बसत ती पावन शिला इथेच आहे. येथील त्या अखंड पेटणाऱ्या धुनीतील उदी कपाळाला लावली आणि पुढे निघालो.

श्रीबाबा एक दिवसाआड ज्या चावडीत झोपत ती द्वारकामाईच्या बाजूलाच आहे. समोर थोड्या पावलावर श्रीमती लक्ष्मीबाई शिंदे यांचे घर आहे, श्रीबाबांना याच रोज जेवू घालत. यांनाच श्रीबाबांनी निर्वाण समयी नऊ रुपये दिले. जे त्यांनी तस्वीरीत मढवून ठेवले आहेत. श्रीबाबांना जेवू घालण्याचे भाग्य लाभलेल्या या भाग्यवंत माऊलीच्या चरणाला वंदन करून खाली उतरलो.

रविवारी शिरडीचा बाजार. थोड्या अंतरावर श्रीखंडोबाचे देऊळ आहे. मराठवाड्यातील धूप खेड्याच्या श्री. चांदूभाई पाटील यांच्या घरच्या लग्न वऱ्हाडाबरोबर आलेले श्रीबाबांना ''आवो साईबाबा'' म्हणून हाक मारली. जे नाव श्रीबाबांना कायमचे चिकटले व ते श्रीसाईबाबा म्हणून ते त्रिखंडात अजरामर झाले. परतताना वाटेत लेंडी बागेत जरा फिरलो.

शेवटी गुरूपादुकास्थानात आलो. 'ही जागा माझ्या गुरूचे समाधीस्थान' म्हणून श्रीबाबा सांगत. येथील ज्या निंबवृक्षाखाली श्रीबाबा ध्यानस्त बसत त्या बाजूच्या फांदीची पाने कडू लागत नाहीत. 'या ठिकाणी गुरुवारी व शुक्रवारी उद जाळीत जा. तुमचे कल्याण होईल.' असे श्रीबाबा सांगत.

संध्याकाळच्या आरतीची वेळ झाली म्हणून लगबगीने समाधी मंदिरात आलो. रात्री शेजारती आटोपल्यावर मंदिर बंद होते ते पुन्हा पहाटे ''घनशाम सुंदरा'' या भूपाळीने उघडते.

गुरुवारच्या रात्रीचा पालखीचा सोहळा पाहाण्याची फार इच्छा होती. पण बुधवारी आम्हाला जागा सोडणे भाग होते. त्यावेळी गावात राहण्याची सोय नव्हती व श्री. साठे यांच्या वाड्यातील खोल्या व समाधी मंदिराच्या पुढील खोल्या एवढीच संस्थानतर्फे

निवासाची सोय होती. म्हणून गुरुवारसाठी येणाऱ्या भक्तांकरीता आम्हाला खोली खाली करून देणे भाग होते. गुरुवारचा पालखीचा सोहळा पाहायला मिळणार नाही म्हणून मनाला चुटपूट लागून राहिली होती. मन तळमळत होते. पण इलाज नव्हता.

शेवटचा उपाय म्हणून संस्थानच्या अधिकाऱ्यांना शुक्रवार सकाळपर्यंत वेळ वाढवून देण्याची विनंती केली. पण त्यांनीही आपली असाह्यता प्रगट केली. निराश होऊन जागा खाली करून देण्याच्या तयारीस लागलो. पण थोड्या वेळानी संस्थानच्या शिपायाने ऑफिसमध्ये मला बोलाऊन नेले. एक अर्ज लिहून घेतला व मला शुक्रवार पर्यंत मुदत वाढवून मिळाली. माझ्या मनाची तळमळ जाणून श्रीबाबांनीच हे केले असे मी समजतो. गुरुवारचा रात्रीचा पालखीचा सोहळा पाहाण्याची माझी इच्छा पूर्ण झाली. हा श्रीबाबांचा कृपा-प्रसाद असे मी मानतो. असा हा माझा शिरडीतील पहिला अनुभव!

# साई माऊली

— श्री. पी.के. गीध
शासकीय वसाहत
वांद्रा पूर्व

"अनंत कोटि ब्रह्मांडनायक राजाधिराज योगीराज परब्रह्म श्री सच्चिदानंद सद्गुरू साईनाथ महाराज की जय."

"नित्य मी जिवंत जाणा हेचि सत्य।। नित्य घ्या प्रचित अनुभवें।।
शरण मज आला आणि वाया गेला।। दाखवा दाखवा ऐसा कोणी।।
जो जो मज भजे जैशा जैशा भावे।। तैसा तैसा पावे मीही त्यासी।।

वरील बाबांच्या वचनाचे आम्हाला अनेक अनुभव आले आहेत व अजूनही येत आहेत. त्यापैकी दोन अनुभव खालीलप्रमाणे आहेत. परमेश्वराच्या इच्छेशिवाय काहीच घडत नाही हेच खरे. भगवान श्रीकृष्णानी श्रीमद्‌भगवत् गीतेंत सांगितले आहे की, माझ्या सत्तेशिवाय झाडाचे पानसुद्धा हलत नाही.

त्याचे असे झाले की, नेहमीप्रमाणे डिसेंबर १९८३ च्या शेवटच्या गुरुवारी सहकुटुंब शिर्डीस जाण्याचा आमचा बेत होता. यावेळी आमच्याबरोबर डोंबिवली येथील आमचे नातेवाईकही येणार होते. म्हणून मुंबई सेंट्रलहून एस्.टी. ने न जाता डोंबिवलीहून आम्ही एस्.टी. ने शिर्डीला जाणार होतो. दिवस भराभर जात होते. डिसेंबर महिन्यातला शेवटचा

आपला शेवट जवळ आला आहे असे मला वाटू लागले. मनात विचार येत होते की, रात्रीच माझे काही बरे-वाईट झाले तर माझ्याबरोबर आणलेल्या दहा माणसांचे काय होईल? श्री समर्थ साईबाबांचे नामस्मरण मी चालूच ठेवले. बाबा भक्तांचा अंत पाहतात परंतु त्याचा ते अंत करीत नाहीत याचा मला यावेळी अनुभव आला. पहाटे मला डुलकी लागली व थोडेसे बरे वाटू लागले. सकाळी मी उठलो प्रथम थोडा गरम चहा घेतला व माझ्या कुटुंबियांसह बाहेर पडलो. तो दिवस शनिवारचा होता. आमचे एस्.टी. चे रिझर्व्हेशन या दिवसाचे सकाळच्या सातच्या गाडीचे होते. परंतु सकाळच्या सातच्या एस्.टी. ने जाणे मला शक्य नसल्याने आम्ही ते रिझर्व्हेशन रद्द करून दुपारच्या दोनच्या एस्.टी. चे रिझर्व्हेशन केले. गावात थोडी खरेदी केली. तोपर्यंत दुपारच्या आरतीची वेळ झाली म्हणून मी माझी मुलगी व भाची आरतीला गेलो. आरती संपल्यानंतर समाधी मंदिरातून बाहेर पडत असताना आमचे साईभक्त मित्र श्री. गाळवणकर (पार्ले) हे आम्हाला भेटले. त्यांनी आम्हा तिघांना साईभक्त श्रीमती आम्माकडे जेवावयास नेले. जेवणात अनेक उत्तम पदार्थ होते. परंतु मी मात्र फक्त दही भातच जेवलो. देवाचा प्रसाद व दहीभात खाल्ल्यामुळे मला बरीच हुशारी वाटली. वास्तविक कालच्या अजीर्णावर मला दही भाताचीच आवश्यकता होती. हे सर्वज्ञ साईबाबांना अगोदरच माहित होते. म्हणून त्यांनी माझी सोय श्रीमती आम्माकडे केली. हा एक चमत्कारच म्हणावा लागेल. कारण श्री. गाळवणकर हे आम्हाला अचानक भेटले. त्यांनी आम्हाला कधीही न पाहिलेल्या आम्माकडे जेवावयास नेले. तेथे मला हवा असणारा नेमका दही भातच मिळाला. आपल्या भक्ताची बाबा कशी काळजी वाहतात त्याचे हे एक उदाहरण आहे, अशा रीतीने माझ्यावर आलेले दुसरे संकटही श्रीबाबांच्या कृपाशिर्वादाने निवारण झाले. आम्ही आम्माकडून जेवून निघालो तोपर्यंत आमच्या गाडीची सुटण्याची वेळ झाली होती. म्हणून आम्ही आमचे खोलीवरचे सामान घेवून एस्.टी. स्टँडवर आलो. तितक्यात मुंबईला जाणारी गाडी लागली. रिझर्व्हेशन असल्यामुळे आम्हाला बसावयास जागा मिळाली व थोड्याच वेळात गाडी सुरू झाली. आमचा परतीचा प्रवास सुरू झाला. त्या रात्री ११ वाजता आम्ही वांद्रे मुक्कामी श्रीसाई समर्थांच्या आशीर्वादाने सुखरूप पोहचलो.

असे आहेत आपले भक्तवत्सल भक्ताभिमानी
शिर्डी निवासी श्री समर्थ साईबाबा. त्यांना पुनश्च कोटी कोटी साष्टांग नमस्कार.

अशा या भक्तवत्सल साईमाऊली जवळ मी काय मागणार हेचि दान देगा वरदान! तुझा विसर न व्हावा!

बुधवार उजाडला. आम्ही सर्व आनंदात होतो. परंतु बुधवारी ऑफिसला जाणे भाग होते. कारण शिर्डीला जाण्यासाठी मी गुरुवार ते शनिवार अशी तीन दिवस रजा घेतली होती. मुंबईच्या धावपळीच्या जीवनाची आपणास कल्पना आहेच. सकाळी ऑफिसला जाताना फारच घाई होते. बुधवारी सकाळी मी स्टोव्हवर गरम पाणी घेऊन स्नानगृहाकडे जात असताना माझ्या हातातील गरम पाण्याचे भांडे निसटले व भांड्यातील गरम पाणी माझ्या मांडीवर सांडले. मांडी खूपच भाजली व दाह होऊ लागला.

तशा स्थितीत मी कशीतरी आंघोळ केली व नैमित्तिक पूजा करून मांडीला परमपूज्य साईबाबांची संजीवनी उदी लावली. त्याशिवाय दुसरे कोणतेही औषध न लावता मी ऑफिसला गेलो. त्याच दिवशी दुपारी माझी पत्नी व मुले डोंबिवलीला गेली. ऑफिस सुटल्यावर संध्याकाळी मीही डोंबिवलीला गेलो. माझ्या मांडीला फोड आले. अंगात ताप झाला. उद्यापर्यंत मी नक्कीच आजारी पडणार अशी मला भिती वाटू लागली. पायाने धड चालताही येत नव्हते. काही सुचत नव्हते. उद्या तर आम्हाला शिर्डीला जावयाचे होते. मनात विचार आला की, अशा परिस्थितीत शिर्डीला जाणे रद्द झाले तर सर्वांचे आनंदावर विरजण पडेल. त्या रात्री झोपण्यापूर्वी मी बाबांची मनोमन प्रार्थना केली की, बाबा मला उद्या बरे वाटू द्या व आम्हा सर्वांना तुम्ही शिर्डीला घेवून जा. तसे झाले तर या अनुभवाचा लेख मी श्री साईलीला मासिकात देईन. खरोखरच एका रात्रीत मला फारच बरे वाटले. बाबा माझ्या नवसाला पावले. सकाळी माझी तब्येत एकदम ठणठणीत झाली. सर्वांना आनंद झाला. कारण ठरल्याप्रमाणे आम्हाला शिर्डीला जाता येणार होते.

गुरुवारी सकाळी आम्ही डोंबिवलीहून निघालो तो संध्याकाळी ५ वाजता शिर्डी मुक्कामी सुखरुप पोहोचलो. शिर्डीला गेल्यानंतर मुंबईला परत येण्यासाठी एस्.टी. चे रिर्झव्हेंशन केले व राहण्यासाठी संस्थानची जागाही मिळाली.

गुरूस्थान, समाधी मंदिर, द्वारकामाई, लेंडीबाग, चावडी याठिकाणी दर्शनाला जाणे व समाधी मंदिरातील आरत्यांना हजर राहणे व संस्थानच्या भोजनगृहात जेवण घेणे असा आमचा कार्यक्रम शुक्रवार संध्याकाळपर्यंत व्यवस्थित चालू होता. दिवस आनंदात जात होते. परंतु अद्याप माझी कसोटी संपली नव्हती. शुक्रवारी संध्याकाळचे जेवण न घेता काहीतरी लाईट घ्यावे म्हणून त्या रात्री आम्ही वडा-पाव व भजी खाल्ली. दुर्दैवाने भजी व पाव आम्हाला शिळे मिळाले. त्यामुळे रात्री मला त्रास झाला. पोट दुखू लागले व चढले, श्वासोच्छ्वासास त्रास होऊ लागला. ढेकरही येत नव्हती. अस्वस्थपणा वाटू लागला. झोप येत नव्हती किंवा चैनही पडत नव्हती. बरोबरची सर्व माणसे झोपी गेली जसजशी रात्र होत गेली तसतसा त्रास वाढू लागला. मी खोलीच्या बाहेर व पुन्हा खोलीत अशा येरझारा मारू लागलो. रात्रीच्या वेळी औषध कोठे मिळणार. रस्त्यावरही सामसूम होती. माझ्याकडे एकच औषध होते. ते म्हणजे बाबांची उदी. ती मी पाण्यातून घेत होतो व पोटाला लावत होतो. तसेच बाबांचे नामस्मरणही करत होतो. त्रास वाढत होता इतका की माझा माझ्यावरचा विश्वास डळमळीत होऊ लागला. आता

आपला शेवट जवळ आला आहे असे मला वाटू लागले. मनात विचार येत होते की, रात्रीच माझे काही बरे-वाईट झाले तर माझ्याबरोबर आणलेल्या दहा माणसांचे काय होईल? श्री समर्थ साईबाबांचे नामस्मरण मी चालूच ठेवले. बाबा भक्तांचा अंत पाहतात परंतु त्याचा ते अंत करीत नाहीत याचा मला यावेळी अनुभव आला. पहाटे मला डुलकी लागली व थोडेसे बरे वाटू लागले. सकाळी मी उठलो प्रथम थोडा गरम चहा घेतला व माझ्या कुटुंबियांसह बाहेर पडलो. तो दिवस शनिवारचा होता. आमचे एस्.टी. चे रिझर्व्हेशन या दिवसाचे सकाळच्या सातच्या गाडीचे होते. परंतु सकाळच्या सातच्या एस्.टी. ने जाणे मला शक्य नसल्याने आम्ही ते रिझर्व्हेशन रद्द करून दुपारच्या दोनच्या एस्.टी. चे रिझर्व्हेशन केले. गावात थोडी खरेदी केली. तोपर्यंत दुपारच्या आरतीची वेळ झाली म्हणून मी माझी मुलगी व भाची आरतीला गेलो. आरती संपल्यानंतर समाधी मंदिरातून बाहेर पडत असताना आमचे साईभक्त मित्र श्री. गाळवणकर (पार्ले) हे आम्हाला भेटले. त्यांनी आम्हा तिघांना साईभक्त श्रीमती आम्माकडे जेवावयास नेले. जेवणात अनेक उत्तम पदार्थ होते. परंतु मी मात्र फक्त दही भातच जेवलो. देवाचा प्रसाद व दहीभात खाल्ल्यामुळे मला बरीच हुशारी वाटली. वास्तविक कालच्या अजीर्णावर मला दही भाताचीच आवश्यकता होती. हे सर्वज्ञ साईबाबांना अगोदरच माहित होते. म्हणून त्यांनी माझी सोय श्रीमती आम्माकडे केली. हा एक चमत्कारच म्हणावा लागेल. कारण श्री. गाळवणकर हे आम्हाला अचानक भेटले. त्यांनी आम्हाला कधीही न पाहिलेल्या आम्माकडे जेवावयास नेले. तेथे मला हवा असणारा नेमका दही भातच मिळाला. आपल्या भक्ताची बाबा कशी काळजी वाहतात त्याचे हे एक उदाहरण आहे, अशा रीतीने माझ्यावर आलेले दुसरे संकटही श्रीबाबांच्या कृपाशिर्वादाने निवारण झाले. आम्ही आम्माकडून जेवून निघालो तोपर्यंत आमच्या गाडीची सुटण्याची वेळ झाली होती. म्हणून आम्ही आमचे खोलीवरचे सामान घेवून एस्.टी. स्टँडवर आलो. तितक्यात मुंबईला जाणारी गाडी लागली. रिझर्व्हेशन असल्यामुळे आम्हाला बसावयास जागा मिळाली व थोड्याच वेळात गाडी सुरू झाली. आमचा परतीचा प्रवास सुरू झाला. त्या रात्री ११ वाजता आम्ही वांद्रे मुक्कामी श्रीसाई समर्थांच्या आशीर्वादाने सुखरूप पोहचलो.

असे आहेत आपले भक्तवत्सल भक्ताभिमानी

शिर्डी निवासी श्री समर्थ साईबाबा. त्यांना पुनश्च कोटी कोटी साष्टांग नमस्कार.

अशा या भक्तवत्सल साईमाऊली जवळ मी काय मागणार हेचि दान देगा वरदान! तुझा विसर न व्हावा!

# साईकृपेचा वर्षाव

**कु. तेजस्विनी दामोदर तारळेकर**
''कृष्ण-कुंज' घ.नं. १७०९, 'ई' वार्ड
राजारामपुरी ७ वी गल्ली
कोल्हापूर-४१६ ००१

साईबाबांचा कृपावर्षाव सर्व भूमात्रांवर अखंड होत असतो. फक्त साईभक्तांवरच नाही, केवळ मनुष्यमात्रावरच नाही; तर साईभक्त नसणाऱ्यांवरही आणि मानवेतर प्राण्यांवरही कृपावर्षाव होतो. साईबाबा न मानणारे व (त्यांच्या मते) दुसऱ्या देवतांची, संतांची भक्ति करणारे हे त्या त्या रूपात बाबांनाच भजतात व त्यांची कृपा मिळवितात. कारण सर्वत्र सर्व देवदेवतांच्या संतमहंताच्या रूपात बाबाच भरून राहिले आहेत. पूर्वसुकृताच्या योगे या जन्मी अनेक मानवेतर प्राण्यांनीही बाबांची कृपा मिळविली आहे. असे आपण साईसच्चरितात वाचतोच!

आपल्या प्रारब्धाने आपल्या प्रापंचिक आणि पारमार्थिक वाटचालीत काही अडीअडचणी येतात. त्यावेळी आपण अनन्यभावाने बाबांची करूणा भाकली तर बाबा त्या अडचणी दूर करून आपला मार्ग निष्कंटक करतात आणि त्या मार्गावर आपली वाटचाल वेगाने व सुखाने होत राहते.

परमार्थप्राप्ति (बाबांचा अखंड सहवास) करण्याच्या प्रयत्नात प्रारब्धाने जेव्हा अडचणी उभ्या राहतात तेव्हा ते प्रारब्ध (न टळणारे असे मानले जाते) बाबा भक्तांच्या प्रेमाखातर सहज दूर करतात. त्यानंतर बाबांचे प्रत्यक्ष दर्शन, आवाज, स्पर्श असे अनुभव प्राप्त होतात. ही प्रत्यक्ष अनुभूति मी घेतली आहे.

याचप्रमाणे प्रपंचातील अडचणीवर बाबांच्या कृपेने मात करता येते. याची उदाहरणे तर हरगडी अनुभवण्यास मिळतात. तूर्त त्यातील दोन उदाहरणे साईभक्तांसमोर ठेवत आहे.

माझा भाऊ पोलीस प्रॉसिक्युटर म्हणून सांगली जिल्ह्यात काम करतो आहे. काही वर्षांपूर्वी त्याची बदली सांगलीहून रत्नागिरी जिल्ह्यात खेड-दापोली येथे झाली. घरी हा एकटाच पुरुष, तोही इतक्या लांब जाणार म्हणून आम्ही खूप काळजीत होतो. त्याच्याबरोबर आम्हा सर्वांना इथे घर सोडून जाणे शक्य नव्हते. लहानपणापासून आम्ही सर्व कुटुंबीय कधीही एकमेकांना सोडून राहिलो नाही. याशिवाय दुसरी अडचण म्हणजे आम्ही सर्व शाकाहारी असल्याने तिकडे कोकणात भावाच्या जेवणाचा प्रश्नही कठीण होता.

जेव्हा काहीच सुचेनासे होते, तेव्हा बाबांशिवाय कुणाकडे मागणार? बाबाही जणू भक्तांच्या हाकेची वाटच पाहत असतात. बाबा आमच्या हाकेला धावून आले. आणि एका महिन्यात त्याची बदली पुन्हा सांगलीला झाली.

एकदा माझी दुसऱ्या क्रमांकाची भाची चि. देवयानी ही दोन वर्षांची असताना अचानक आजारी पडली. तिच्या अंगावर पुरळ उठले. सारखी आग होऊ लागली.

कधीही न रडणारी, ती सारखी रडू लागली. त्यातच तिला ताप आला आणि जुलाब सुरू झाले. दिवसातून खूपवेळा तिला जुलाब झाल्याने ती पार थकून निपचित पडून राहिली. तिला रडण्याचीही शक्ति उरली नाही. डॉक्टरी उपाव सुरूच होते. पण काळजी कमी नव्हते. शेवटी डॉक्टरांनी सांगितले, 'आता जर हिचे जुलाब कमी झाले नाही तर बालरोग तज्ञाकडे दवाखान्यात ठेवावे लागेल. आमचे तर हातपाय गळून गेले.

आम्ही बाबांचा धावा केला. आणि कधीही अपवाद न करता धावून येणारे बाबा आमच्या हाकेला धावले. रात्रभर तिला शांत झोप लागली आणि दुसऱ्या दिवशी सकाळी ती ठणठणीत बरी झाली.

अशी ही साईकृपा अगाध आहे. या कृपेचा वर्षाव आम्हा सर्वांवर असाच अखंड होत राहो ही बाबा चरणी प्रार्थना. त्यांच्या चरणी माझे सर्वांसह कोटी कोटी प्रणाम!

"श्री सच्चिदानंद सद्‌गुरू साईनाथ महाराज की जय!'

# साई ऋण मुक्त आम्ही होऊ का?

**— श्री. मधुकर अंबाडे**
अंबाडे हाऊस, लकडी पुलासमोर
बडोदा

एक प्रश्नार्थक शीर्षक! एक असा प्रश्न की ज्याचं उत्तर शोधता, शोधता, कदाचित एखादा सामान्य भक्तही अंतरमूख होऊन, त्यालाही जागृती प्राप्त व्हावी! जन्माचं सार्थक व्हावं, जीवन उजळून निघावं, उत्तर शोधण्यानं! बाबा! तुझी भक्ती म्हणजे शांतीच्या संपत्तीचा अक्षय ठेवा! बाबा! तुमच्यासारखे महानसंत ईश्वरी अवतार ह्या भूमिवर जर प्रगटले नसते, तर आज नास्तिकतेचं, स्वच्छंदीपणाचं काहूर माजलं असतं. कदाचित मानव धर्मच नष्ट झाला असता. किंबहुना श्रद्धा म्हणजे काय, हेच आम्हाला समजलं नसतं. हे कृपावंत साई! दयावंत साई! तुझ्या कृपेला ना अंत, ना पार! परमार्थ कर्णाचा तू अवतार! निराधाराचा तू एकमेव आधार! हे बाबा! रामकृष्ण तू! येशुख्रिस्त तू! गुरुनानक तू! पैगंबर तू! अग्नीदेव तू/ वरुणदेव तू! सूर्यदेवही तू! मातापिता तू! भक्तांकित साई तू! वर्णनातीत साई तू! कलीकाळी लीलाधारी, गिरिधर गोपाल तू! सर्वत्र तूचि तू!

"भाव तेथे देव" "देव भावाचा भुकेला" "जया मनी जैसा भाव, तया तैसा अनुभव" ह्या सर्व उक्तिंची प्रचिती आणून देणाऱ्या साई! श्रद्धा-सबुरीचा अनमोल मंत्रदोर विनासायास भक्तांच्या हाती देणाऱ्या साईनाथा! प्रत्यक्ष आपल्या चर्मचक्षुने आजही तुला देहस्वरुपात पहाणारे शिक्षित आणि दीक्षित भक्त, आजच्या युगात अनेक असताना; आणि श्रद्धा आस्था अंतरी असलेल्या कुणाही भक्ताला तसा अनुभव करून देण्यास तू

हाती दिलीस. भाविक भक्तांसाठी आजही प्रत्यक्षात प्रगटणारा तू! परमेश्वर! परमात्मा! अल्लाह! मालिक!! सर्वांवर मातृवत प्रेम करणारा तू! हे साई! केवळ आपल्या छबी दर्शनानं आजही भक्तांना ध्यानभोगाचा अनमोल, अनुपम आनंद प्रदान करणारा तू! दूर राहून केवळ दृष्टीक्षेपानं कासवीच्या पिलांप्रमाणे आमचं पालन पोषण करणारा तू! वेळोवेळी आर्त हाकेला धावून येणारा तू! मानवाला पश्चातापाच्या पवित्र गंगेत न्हाऊ घालणारा तू! आम्ही शरण तुला भगवंता!!

करुणाळू! कृपाळू! दयाळू साई! आमच्या अज्ञानत्वावर दयाद्र होऊन, तू आपल्या अलौकिक शक्तीने अव्यक्तातून व्यक्त होऊन, आपल्या प्रचंड योग शक्तीच्या सामर्थ्याने मानवासाठी, प्राणीमात्रांसाठी ह्या भूमिवर मानवरूप धारण केलंस. आपल्या दिव्य आणि अलौकिक चमत्काराद्वारे मानव-मनी श्रद्धेचं बीज पेरलंस. आम्हाला सद्मार्गावर प्रत्यक्ष हाताला धरून तू आणलंस. एक महान पथ प्रदर्शक होऊन विवेक रूपानं आमच्यातच विद्यमान। राहिलास. आम्हाला सर्वस्व अर्पण करूनही तू परम दानी, नामानिराळा राहिलास. तूच दिलेल्या आमच्यातील अद्‌भूत शक्तींना आम्ही जर नाही ओळखलं, तर ह्यात दोष कोणाचा? तुझा हात सोडून देऊन, तुझ्यापासून विमूख होऊन, मायेच्या अंधकारात आम्ही भटकत राहिलो, तर त्यात दोष कोणाचा? अज्ञानाचा, संदेहाच्या अंधकारात एखाद्या शिळेवर आम्हीच आमचं मस्तक आपटून घेण्यासारखी स्थिती आम्ही आमची करून घेतली तर ह्यात दोष कोणाचा?

वरुण देवाला आदेश देऊन पर्जन्य थांबविला होता ह्या साईनं! तंत्रमंत्रावाचून अग्नी प्रगटवला होता ह्या साईनं! मशिदीतील अग्नीज्वाला शांत केल्या होत्या ह्याच साईनं! 'गणाधीशाचा गणाधीश तू! योगेश्वर दत्तराज तू! कैलासपती महादेव तू! योगीयांचा योगीराज तू! ब्रह्मदेव तू! आद्यशक्ती गायत्री तू! ब्रह्मा-विष्णू-महेश्वर तू! शिवशंकर तू! पंढरपूरचा विठ्ठल तू! द्वारकाधीश तू!! मर्यादा पुरुषोत्तम रामही तू!!!

संत चुडामणी तूच! संतांचा संतही तूच! हृदयातील भगवंतही तूच! आधाराचा आधारही तूच! देवाचा देवही तूच! हे देवाधिदेवा, साई देवा! अनंत कोटी ब्रह्माण्डनायका! साई सर्वेश्वरा! सर्वात्मका! राजाधिराज, साई महाराज! सर्वांचा सनातन सारथी! परब्रह्म! परम्‌ गुरू! सद्‌गुरू! तुझा त्रिवार जय जयकार! साई त्रिवार जय जयकार!! बाबा! त्रिवार जय जयकार!!!

वर्णनातीत, शब्दातीत असलेल्या साईचं वर्णन आम्ही मानव काय करू शकणार? कर्ता करविता तू साई! शेवटी संत तुकाराम महाराजांच्या अभंगाचे स्मरण झाल्यावाचून रहात नाही — "बोलविता धनी वेगळाची"

भूतलावरील हिंडल्या फिरल्या प्रत्यक्ष देहधारी ह्या साई देवाची एकदा का मनाला ओळख पटली की मग आपोआप नाद सूरात हृदयमंदिरी शब्द घुमू लागतात ते असे —

गगनात तारका, शिरडीत द्वारका
साईबाबांसारखा, देव नाही देव नाही

समर्थ असताना, आजच्या विज्ञान युगातील मानवाने देखील का साशंक रहावं? भक्ताचा केवळ प्रेमभाव पाहून त्याचा अंकित होणारा कृपावंत, दयावंत महासंत साई! विवेक रूपानं सर्व हृदयस्थ व्यक्त असणाऱ्या हे साई देवा! आम्हाला श्रद्धेची ओळख करून देणाऱ्या माझ्या साईराया! तुला अनंत कोटी दंडवत!

योग्य काळी, उचित समयी म्हणजे धर्मग्लानी संभवित असताना इ.स. १८५४ साली एका निम्बवृक्षातली, तेजस्वी अशा बाल योग्याच्या रूपात तू प्रगटलास. असंख्य जीवांना मोक्ष-दान दिलंस. कृष्णरूपात अर्जुनाला दिलेलं वचन तू पाळलंस!

यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत।
अभ्युत्थानम धर्मस्य तदाऽऽत्मानं सृजाम्यहम्॥

[ज्या ज्या वेळी धर्माचा ऱ्हास होतो आणि अधर्म माजतो, त्या त्या वेळी मी स्वतः जन्म (अवतार) घेतो.]

हे साई! धर्म रक्षणार्थ तू भूतली अवतरलास. श्रीकृष्णानं रथात बसून गीता सांगितली आणि तू एका सामान्य शिलेवर बसून सनातन धर्माचं महान तत्वज्ञान सहज भावे सोप्या शब्दात सांगितलंस.

"ईश्वर एकच आहे, सर्वांवर प्रेम करा, सर्व प्राणीमात्रांवर दया करा, आपला धर्म सोडू नका, पण परधर्माची निंदाही करू नका. द्रव्य लोभार्थ कुणाचंही वाईट करू नका. ऋण करून सण साजरा करू नका. कुणाचीही मेहनत फुकट घेऊ नका. संतोषातच सुख आहे. लहान मुलं ही देवाच्या दारातील फुलं आहेत. त्यांना जास्तीत जास्त प्रेम द्या. दीन दुःखीतांना उपेक्षू नका. धर्मांध होऊन भांडू नका. सूडवृत्ती ठेवू नका. जशी वृत्ती तसा जन्म माणसास घ्यावा लागतो. भोग हे जन्मोजन्मी भोगावेच लागतात. श्रद्धा सबुरी सोडू नका. कुणालाही दुखवू नका. कुणाचंही कटु वचन सहन करा पण वाईट बोलू नका. मी माझ्या भक्तांसाठी सातासमुद्रापार असलो तरी धावून येईन. विश्वास ठेवा. माझे वाक्य प्रमाण माना मी नित्य जीवंत आहे. ह्याची नित्य प्रचिती अनुभववानं घेऊन पहा. माझ्या भक्तांना मी अन्न, वस्त्र आणि निवाऱ्याची हमी देतो. ह्या पेक्षा अधिक एका फकीराकडून तुम्हाला काय हवं?"

दिव्य आणि अद्‌भूत साई चमत्काराद्वारे आजही अखंड साईज्ञानगंगा वहात आहे! हे साई! अनेक भक्तांचे अनेक रोग, असाध्य रोग, प्राणघातक रोग! तीव्र वेदना देणाऱ्या दुर्धर व्याधी तू स्वतः अंगीकारून भक्तांना जीवनमुक्त केलंस, रोगमुक्त केलंस. भोगमुक्त केलंस. शत्रुत्व ठेवणाऱ्याशीही शत्रुत्व न ठेवणं, हे आपल्या वर्तनानं तू आम्हाला शिकवलंस. मानव कल्याणार्थ आपलं उभं आयुष्य खर्ची घातलंस. तुझा एक महान भक्त तात्या कोते! त्याची महान आई, बायजाबाई! त्या आईला दिलेल्या वचनाला तू जागलास. तात्याला जीवदान दिलंस, आणि तू मृत्यू स्वीकारलास! प्राण जातील पण वचन जाणार नाही, ही रघुकुलातील परंपरा टिकवलीस हे साई! तू काय म्हणून नाही केलंस? आणि आजही काय नाही करीत? उदी रूपात संजीवनीच तू आज आमच्या

प्राणीमात्रांवरील तुझ्या अनंत कृपेमुळे आम्ही तुझे फार फार ऋणी आहोत. हे साई! दीन दुबळा पराधीन मानव केवळ तुझ्या अमोघ अशा कृपाछत्राखालीच स्वाधीन आणि चिन्मय राहू शकतो. आम्ही मानव तुझे अनंत ऋणी आहोत; परंतु फक्त एकाच गोष्टीमुळे आम्ही ऋणमुक्त होऊ शकतो, जर आम्ही आस्थेपूर्वक, श्रद्धा-विश्वासपूर्वक ह्या मायावी जगात मायावी न बनता, प्रमादवश न होता, अहंकार रहित होऊन, संयमशील होऊन, सहनशील होऊन, सात्विक होऊन, सदाकाळ तुझेच होऊन राहिलो तर! सातत्यानं तुझ्या नवविधा भक्तीत आत्मीयतेने दंग राहिलो तर! बाबा! तुझ्याच दिलेल्या शक्तीने आम्ही ऋणमुक्त होऊ शकतो खरे, पण तुझ्याच कृपेने! हे साई!! तुझ्याच कृपेने!!!

# साई चुकवा जन्म-मरण फेरा

साई चुकवा जन्म-मरण फेरा,
  पुन्हा नको हा संसार पसारा ।। ध्रृ. ।।
साई- श्रध्देने राहा जीवनात,
साई- नामाने व्हा पुण्यवंत,
सारे विश्व शेवटी नाशवंत,
तरीही निष्काम कर्म न विसरा ।। १ ।।
प्रयत्न करीता प्रचीती येते,
जीवा-शिवाचे नाते जुळते,
सारे जग गुरूमय भासते,
परमात्म्याची अंती आस धरा ।। २ ।।
षड्रिपु गळतील आपोआप,
मन होईल दान्त नि शांत,
साईच भरला चराचरात,
अनुभवावर या विश्वास करा ।। ३ ।।

— **सौ. संगीता दिलीप गोडबोले**
(एम्.ए.,बी.एड्)
'परिमल'प्लॉट नंबर ३७२, सेक्टर २८,
प्राधिकरण, पुणे ४११ ०४४.

प्राणीमात्रांवरील तुझ्या अनंत कृपेमुळे आम्ही तुझे फार फार ऋणी आहोत. हे साई! दीन दुबळा पराधीन मानव केवळ तुझ्या अमोघ अशा कृपाछत्राखालीच स्वाधीन आणि चिन्मय राहू शकतो. आम्ही मानव तुझे अनंत ऋणी आहोत; परंतु फक्त एकाच गोष्टीमुळे आम्ही ऋणमुक्त होऊ शकतो, जर आम्ही आस्थेपूर्वक, श्रद्धा-विश्वासपूर्वक ह्या मायावी जगात मायावी न बनता, प्रमादवश न होता, अहंकार रहित होऊन, संयमशील होऊन, सहनशील होऊन, सात्विक होऊन, सदाकाळ तुझेच होऊन राहिलो तर! सातत्यानं तुझ्या नवविधा भक्तीत आत्मीयतेने दंग राहिलो तर! बाबा! तुझ्याच दिलेल्या शक्तीने आम्ही ऋणमुक्त होऊ शकतो खरे, पण तुझ्याच कृपेने! हे साई!! तुझ्याच कृपेने!!!

# साई चुकवा जन्म-मरण फेरा

साई चुकवा जन्म-मरण फेरा,
पुन्हा नको हा संसार पसारा ।। धृ. ।।
साई- श्रध्देने राहा जीवनात,
साई- नामाने व्हा पुण्यवंत,
सारे विश्व शेवटी नाशवंत,
तरीही निष्काम कर्म न विसरा ।। १ ।।
प्रयत्न करीता प्रचीती येते,
जीवा-शिवाचे नाते जुळते,
सारे जग गुरूमय भासते,
परमात्म्याची अंती आस धरा ।। २ ।।
षड्रिपु गळतील आपोआप,
मन होईल दान्त नि शांत,
साईच भरला चराचरात,
अनुभवावर या विश्वास करा ।। ३ ।।

— सौ. संगीता दिलीप गोडबोले
(एम्.ए.,बी.एड्)
'परिमल'प्लॉट नंबर ३७२, सेक्टर २८,
प्राधिकरण, पुणे ४११ ०४४.

# "साईइच्छा बलियेसी"

— आशिष हजारे
बोरिवली, मुंबई-४०० ०६६.

गेल्या जुलै महिन्यातली गोष्ट! बाबांच्या कृपेने माझ्या प्रयत्नाला यश आले आणि चांगल्या मार्कांनी मी माझी बारावीची परीक्षा उत्तीर्ण झालो. भाईंची साईप्रसाद गुरूपौर्णिमा विशेषांक शिरडीला साईचरणी प्रकाशित करण्याची मनोकामना १ ते ३ जुलै दरम्यान बाबांनी पुरविली तशीच मला माझ्या इच्छेप्रमाणे पुढील शिक्षणासाठी हव्या त्या शाखेत व मुंबईतील कॉलेजातच प्रवेश मिळण्याची माझी इच्छाही बाबांनी पुरविली तो दिवस होता गुरूवार दिनांक ११.७.८५ फी वगैरे भरून येताना भाई म्हणाले,

"आशू तुला बाबांनी ॲडमिशन दिली आता एखाद्या शनिवारी-रविवारी आपण दोघे शिरडीला जाऊन येऊ या नंतर कधीतरी" ह्यावर मला नकळत मी चटकन उत्तरलो. "भाई, नंतर कशाला, उद्या रात्रीच निघू या "अरे, आत्ताच मी जाऊन आलो..." पण त्यांना बोलू न देता मी हट्ट केला तेव्हा साहजिक ते तयार झाले. आमच्या बरोबर आमचे देशपांडे भावोजी (भाईंच्या सविताताईचे यजमान व आण्णा प्रधानांचे जावई) येण्यास तयार झाले मम्मीची परवानगी घेऊन आमची तिघांची स्वारी शुक्रवारी रात्री गाडीने मनमाडला तेथून एस.टी.ने शनिवारी १३.७.८५ रोजी पहाटे शिरडी क्षेत्री पोहचली. अभ्यंगस्नान काकडारती उरकून अभिषेक साईसत्यनारायणाच्या पूजेच्या तिकीटस्‌ही काढल्या. छानपैकी साईबाबांचे दर्शन झाले. मनासारखा अभिषेक झाला. 'आशू, आल्यासारखे तू साईसत्यनारायणाची पूजा करून घे, असे म्हणून माझे एकट्याचेच पूजेचे तिकीट भाईंनी काढले होते. पूजेची वेळ होती एक वाजताची अभिषेक वगैरे उरकेपर्यंत मध्यान्ह झाली. मध्यान्हारती झाल्यावर 'भोजनगृहातील साईप्रसाद' संपेल म्हणून तेथे जाऊन जेवण घेतले. व साधारण पाऊणच्या सुमारास परतलो. वाटेत पूजेची पावती शोधली तो ती माझ्याकडे नव्हती की भाईंकडे वा भावोजींकडेही नव्हती. मग रूमवर जाऊन सर्व कपडे बॅगा तपासल्या पावती हरवली होती. मी खूपच निराश झालो. "बाबांची इच्छा नसावी माझ्या हातून साईसत्यनारायणाची पूजा व्हावी अशी" पण भाईंनी मला धीर दिला, व म्हणाले "आपण पूजेच्या तेथे जाऊन बघूया.. साईइच्छा बलियेसी... मी मराठे भटजींना सांगून बघतो." जवळ पावती नसताना तेथे जाणे मला पटले नाही. पण भाई-भावोजींचा आग्रह! समाधीमंदिराच्या वर मला घेऊन भाई गेले ते ओरडतच.... "अहो मराठे, माझ्या मुलाला पूजेसाठी आणले पण त्याची पावतीच हरवली हो कुठे.. नंबर साधारण ६९-७० च्या दरम्यान असावा..." ते ऐकून मराठेंनी "अहो या या हजारे.. तुमचीच वाट पहातोय मी... आत्ताच जरावेळापूर्वी कुणीतरी येऊन ही पहा पावती दिलीय" असे म्हणत हातातली पावती दाखवली. आश्चर्य म्हणजे तिचा नंबर ७० होता. मी पाणावलेल्या डोळ्यांनी भाईंकडे बघितलं. त्यांनी माझ्या पाठीवर थोपटले. मराठे भटजींना धन्यवाद देऊन आम्ही साईसमोर नतमस्तक झालो. मला मात्र पूजा करतानाही त्यांचे शब्द आठवत होते. "साईइच्छा बलियेसी"

# वेताळास मुक्ती मिळाली

— सौ. निर्मला चं. मालवणकर
साई-स्मृति, दादर.

संतांच्या सहवासात फार दिवस राहिल्याने व त्यांचे वागणे आपल्या आचरणात आणल्याने काही काळाने शिष्यांस पण कळत न कळत सिद्धी प्राप्त होते. समर्थ रामदासांचे शिष्य कल्याण स्वामीत तंतोतंत समर्थांचीच योग्यता उतरली होती.

संत हे आपल्या शिष्यांची योग्यता पाहातात व तात्काळ आपल्या सारखे करतात.

संत शिरोमणी साईबाबा ह्यांच्याकडे पण बरेच अंतःकरणापासून श्रद्धा ठेवणारे भक्तगण होते. त्यांनी मुळात "श्रद्धा व सबुरी" हाच तर मंत्र सर्वांना दिला होता.

बाबांचे काही चमत्कार ज्ञात व काही अज्ञात आहेत. त्यांच्या वेळच्या भक्तांकडून जेव्हा आपणास एकादी गोष्ट त्यांच्या चमत्काराविषयी कळते. तेव्हा आपणास एक खरा खरा आनंद होतो व हा आनंद आपल्यासारख्या साईभक्तांस कळावा अशी एक अंतःकरणात ओढ उत्पन्न होते. व म्हणूनच मी त्यांच्या वेळच्या श्री भाऊसाहेब तर्खडांचा अनुभव लिहित आहे.

शिर्डीत पूर्वी बरेच जंगल होते. बाबांच्या लेंडी बागेत घनदाट झाडी होती. ते स्नानास जावयाचे तेथे पण फार झाडी होती म्हणूनच ते योग सामर्थ्याने जांभळीच्या झाडावर आपल्या आतड्या धुवून वाळत घालत असत.

प्रातःर्विधीस ओढ्याच्या काठी लांब रानात त्यावेळेस जात असत.

एकदा भाऊ असेच भल्या पहाटे गेले असताना, एक भला मोठा नाग त्यांच्याकडे येताना पाहिला त्यांनी धीराने डोळेबंद करून "बाबा बाबा" म्हणावयास सुरुवात केली. हळूच थोडे डोळे उघडे करून पाहिले तर तो तोंड फिरवून निघून जाताना दिसला. इतक्यात एक मोठा आक्राळ विक्राळ कोंबडा त्यांच्या अंगावर धावत येताना दिसला. त्यांनी परत डोळे बंद करून बाबांचे स्मरण केले. दोन मिनिटाने डोळे उघडून पाहतात तर ९-१० वर्षांचा मुलगा त्यांना म्हणत होता ही माझी जागा आहे, तू येथून जा. ते काही भितीने जागेवरून हलूच शकले नव्हते. तसा तो मुलगा मोठा मोठा होऊ लागला, तेव्हा ते मटकन् खालीच बसले व जमीनीवरची माती घेऊन बाबा ही तुमची उदी असे म्हणून ती माती त्याच्या अंगावर टाकली. त्या बरोबर धूर होऊन तो आकाशात उडू लागला. भाऊ गर्भगळीत होऊन धावत द्वारकामाईत आले.

ते येण्यापूर्वी बाबा द्वारकामाईत फार आनंदात होते व आपल्या भक्तांना म्हणत होते आज भाऊने वेताळाला मुक्ति दिली. पण लोकांना त्याचा काही अर्थ कळला नव्हता

येवढ्यात भाऊ आले. त्यांनी बाबांच्या पायावर साष्टांग लोळण घातली त्यांचे सर्व अंग पाण्याने ओलेचिंब झाले होते. सर्व भक्तांच्या समोर झालेला हा प्रकार त्यांनी सांगितला तेव्हा बाबा म्हणाले "अरे भाऊ त्या ओढ्याकाठच्या वेताळाला मुक्ति दिली तो स्वर्गात गेला."

तेव्हा भक्तांना मघाच्या बोलण्याचा अर्थ कळला. संत आपल्या भक्तांकडून काय

[illegible] हे भक्तांना प्रथम कळत नाही, व जेव्हा कळते तेव्हा त्यांचा [illegible], व ते बाबांच्या चरणी भक्तीभावाने लीन होतात.

श्री सच्चिदानंद सद्गुरू साईबाबा की जय''

**********

# — समाधीस ज्याचे लागतील पाय —

— श्री. विजय यशवंत सहामते
''साईनिवास'' मु.पो. चिंचणी
तालुका-डहाणू, जिल्हा-ठाणे.

[illegible] हे साधु संताची भूमी, संतांच्या पावन पदस्पर्शाने पावन झालेल्या या [illegible] समाधीस्त झाले आहेत. त्यांची चिरकाल आठवण रहावी. त्यांच्या [illegible] रहावी व जेणे करून त्यांच्या उपदेशाने प्रत्येकांनी आपले जीवन [illegible] ह्या साठीच त्यांच्या समाधीची आज आवश्यकता आहे.

[illegible] मांगल्याचे प्रतीक एखाद्या संताची समाधी अथवा देवतेची मूर्ती [illegible] आपोआपच दोन्ही कर जुळले जातात. मनातील विचारांचे वादळ क्षणिक [illegible] व आपण त्या समाधीशी अथवा मूर्तीशी एकरूप होतो. आपल्यातील [illegible] विरघळतो, द्वैत, अद्वैत नाहिसे होते.

[illegible] जिवंत समाधी घेतली जिवंत समाधी घेणे हे काही सामान्य [illegible] संतानी काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर इ. गुणांना जिंकलेले [illegible] परमेश्वराशी एकरूप झालेले असतात. परमेश्वर चिंतनात ते विलीन होतात [illegible] पर्यंत पोहोचतात. धन्य ते संत— तेव्हाच आपण त्यांच्या समाधीची [illegible] परमेश्वर मानतो. सामान्यातून असामान्य होणे ह्याला सुद्धा परमेश्वरी [illegible] लागतेच. महाराष्ट्राला संताची पुण्यभूमी समजले जाते ते ह्या संताच्या [illegible] संत हे द्रष्टे असतात ह्याची प्रचिती सुद्धा आपणाला आज येत आहे [illegible] भयंकर व दुर्धर परिस्थिती, आमचे कपटी आचार, विचार माणसांतील [illegible]. आज आम्ही कुठल्या संस्कृतीला पोहोचलो आहोत आमच्यातील [illegible] आहे. परंतु संतांची चरित्रे जर आम्ही पाहिली तर त्यात आजच्या [illegible] मार्गाला कसे न्यावे हेच सांगितले आहे. परोपकार, मानवाची कर्तव्ये, [illegible] निष्काम कर्मयोग इ. वर सुंदर विवेचन आढळते— खरोखर आजच्या [illegible] साठी संताची वागणूक आचरणात आणणेच इष्ट ठरेल.

[illegible] लागतील पायः- परंतु हे पाय लागण्यास सुद्धा भाग्य लागते. कर्म [illegible] माणसे भेटतात आचार विचार एकत्र येऊन त्या स्थळांना भेटी [illegible] मनःशांतीचा आनंद उपभोगूनच तो आनंद दुसऱ्याना कसा लुटता

कार्य कार्य करून घेतात हे भक्तांना प्रथम कळत नाही, व जेव्हा कळते तेव्हा त्यांचा आनंद द्विगुणीत होतो, व ते बाबांच्या चरणी भक्तीभावाने लीन होतात.

"श्री सत्च्चिदानंद सद्‌गुरू साईबाबा की जय"

★★★★★★★★★

# — समाधीस ज्याचे लागतील पाय —

— श्री. विजय यशवंत सहामते
"साईनिवास" मु.पो. चिंचणी
तालुका-डहाणू, जिल्हा-ठाणे.

भारत भूमी ही साधु संताची भूमी, संतांच्या पावन पदस्पर्शाने पावन झालेल्या या भूमीत कितीतरी संत समाधीस्त झाले आहेत. त्यांची चिरकाल आठवण रहावी. त्यांच्या वचनांची स्मृती कायम रहावी व जेणे करून त्यांच्या उपदेशाने प्रत्येकांनी आपले जीवन सुखी करून घ्यावे ह्या साठीच त्यांच्या समाधीची आज आवश्यकता आहे.

समाधी म्हणजेच मांगल्याचे प्रतीक एखाद्या संताची समाधी अथवा देवतेची मूर्ती पाहिल्यानंतर आपोआपच दोन्ही कर जुळले जातात. मनातील विचारांचे वादळ क्षणिक का होईना क्षमते व आपण त्या समाधीशी अथवा मूर्तीशी एकरूप होतो. आपल्यातील मीपणा, अहंपणा विरघळतो, द्वैत, अद्वैत नाहिसे होते.

ज्ञानेश्वर महाराजांनी जिवंत समाधी घेतली जिवंत समाधी घेणे हे काही सामान्य माणसाचे काम नाही. संतानी काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर इ. गुणांना जिंकलेले असते. ते परमेश्वराशी एकरूप झालेले असतात. परमेश्वर चिंतनात ते विलीन होतात आणि परमेश्वर स्थानापर्यंत पोहोचतात. धन्य ते संत— तेव्हाच आपण त्यांच्या समाधीची पूजा करतो. त्यांना परमेश्वर मानतो. सामान्यातून असामान्य होणे ह्याला सुद्धा परमेश्वरी संकेत असावा लागतोच. महाराष्ट्राला संताची पुण्यभूमी समजले जाते ते ह्या संताच्या पवित्र कार्यामुळेच. संत हे द्रष्टे असतात ह्याची प्रचिती सुद्धा आपणाला आज येत आहे कारण आजची स्फोटक व दुर्दर परिस्थिती, आमचे कपटी आचार, विचार माणसांतील स्पृश्यास्पृश्य भेदभाव, आज आम्ही कुठल्या संस्कृतीला पोहोचलो आहोत आमच्यातील माणुसकी लोप पावत आहे. परंतु संतांची चरित्रे जर आम्ही पाहिली तर त्यात आजच्या पिढीला चांगल्या मार्गाला कसे न्यावे हेच सांगितले आहे. परोपकार, मानवाची कर्तव्ये, श्रद्धा, सबूरी, निष्काम कर्मयोग इ. वर सुंदर विवेचन आढळते— खरोखर आजच्या युगात मनशांतीसाठी संताची वागणूक आचरणात आणणेच इष्ट ठरेल.

समाधीस ज्याचे लागतील पायः- परंतु हे पाय लागण्यास सुद्धा भाग्य लागते. कर्म धर्म संयोगाने चांगली माणसे भेटतात आचार विचार एकत्र येऊन त्या स्थळांना भेटी दिल्या जातात. तेथील मनःशांतीचा आनंद उपभोगूनच तो आनंद दुसऱ्याना कसा लुटता

येईल ते आपणच पहातो. व एक प्रकारचे आमचे स्नेह वाढून आम्ही त्या समाधिशी लीन होतो. आमच्यातील मी तू पणाचे बंधन वादावादी अहंपणा इ. दूर होतो. आम्ही सर्व प्रकारचे साई बंधु भगिनी समाधीपाशी एकत्र येतो— आमचे विश्व एक कुटुंब बनते. मनशांती लाभते. धन्य त्या संतांच्या समाध्या.

शिर्डी येथील श्री साईबाबांची समाधीसुद्धा आज संपूर्ण मानव जातीस सांगते आहे. बाबांनो एक व्हा हिन्दू मुस्लीम ख्रिस्त, ईसाई तुम्ही सगळी माझी बालके अहात तुम्ही एक एक आपसात का झगडता? येथे कुणी कुणाचे नाही. नग्न आलो नग्न जावयाचे आहे. आपण संसाराची काळजी का करावी'' अल्ला सबका भला करेगा. पूजेतील फुलापेक्षा श्रद्धा-सबूरीचे निर्माल्यच मला हवे आहे. मला दिखाऊ वस्तू नको आहेत. धर्माने व नेकीने वागा ईश्वर तुमचे कल्याण करीलच. परंतु आज आम्हाला बाबांच्या वचनांची खरोखरच आवश्यकता आहे. समाधीस निव्वळ दर्शन देऊन आमचे कल्याण होणार नाही तर त्यांच्या आशिर्वादाने त्यांची शिकवण जर आम्ही थोड्या प्रमाणात जरी आचरणात आणली तरी आमच्या भाग्योदयाचे क्षितिज खूप लांब नाही. ते क्षितिज जवळ आणण्यास आमच्या साईचे आशिर्वाद आमच्या पाठीशी आहेत फक्त मनोधैर्य मात्र आम्ही ठेवले पाहिजे बाबांनी म्हटलेच आहे. माझ्या समाधीची जो पायरी चढेल दुःख हे हरेल सर्व त्याचे तेव्हा यंदाच्या वर्षी श्री साईनाथास एकच विनंती बाबा तूच क्षणकर्ता, बुद्धीदाता, पालन कर्ता आम्ही तुझ्या चरणाशी (समाधीशी) येतो व येऊ परंतु आमच्यातील विचारांचे जाळे तोडण्यास ह्या कलीयुगांतील फक्त तुझेच हात समर्थ आहेत. अन्यथा आम्ही कुठल्या थराला पोहोचू ह्याची कल्पना ह्या क्षणी तरी करता येत नाही.

# चित्तशुद्धी हाच आत्मानंद

— श्री. प्रमोद बी. रायसोनी
१६४, समर्थ नगर, औरंगाबाद.

चित्तशुद्ध असती तर शत्रु मित्र होती
व्याघ्रही न खाती सर्प तया ।।

खरोखर माणसाचे चित्त शुद्ध पाहिजे. जीवनात खरी साधना हीच होय. मनावर चांगले संस्कार करण्यासाठीच हा सर्व खटाटोप भक्ती, पूजा-तीर्थ, गुरु करणे हे सर्व चित्तशुद्धीसाठीच होय.

आता चित्तशुद्धी कशी करावी म्हणजे आपणास परमानंद मिळेल. ह्यासाठी आपण आपले योगीराज शिर्डीचे साईबाबा काय उपाय करत हे पाहू. बाबा नेहमी कुत्र्यास भाकरी टाकत, झाडांना पाणी घालीत, गोरगरीबांना अन्न देत, काहींना द्रव्यदान करत व

[illegible] नित्य नियमाने ५ घरातून भिक्षा मागत हा सर्व खटाटोप चित्त शुद्धीसाठी कलीयुगात [illegible] अत्यंत महत्व आहे.

त्याप्रमाणे पीठाच्या गिरणीत जाण्यापूर्वी आपण धान्याचे नीट दळण करतो. त्यातील खडा माती, गोटे काढतो त्याचप्रमाणे आपल्या मनाला जे अनेक जन्मापासून काही वाईट संस्कार आहे ते दान देऊन चित्तशुद्ध करून ते काढणे. चित्त शुद्धीमुळे मन स्वच्छ म्हणजे, दानामुळे चित्तशुद्धी होते. एकदा मन शुद्ध पवित्र झाले की आपणास सर्व प्राणीमात्रात सर्वत्र प्रेमाचा पूर वहातो असे दिसते, मग शत्रु जे आपल्या मनातच असतात ते नष्ट होतात मनात एकच ध्वनी कंप पावतो. सोऽहम् सर्वत्र परमेश्वर दिसतो ह्यासाठी ह्या चित्तशुद्धीची साधना फार महत्वाची आहे. जीवन सफल होण्यासाठी जीवनात आत्मानंद देण्यासाठी चित्तशुद्ध हवे. थोडक्यात

**मन → दान → चित्तशुद्ध → आत्मानंद → साई → साक्षात्कार→**

---

# धाव धाव श्री साईनाथा

धाव धाव श्री साईनाथा समर्था
तुझविन नाही मज कोणी त्राता ।। धृ ।।
दमली वाचा थकली काया
काही दिसेना काही सुचेना
दाखव वाट ही मोक्षाची आता ।। १ ।।

तुझ्या कृपेने संसारी नच उणे
व्याधीने त्रस्त वाटे नको हे जिणे
तव दर्शनाची आस मज साईनाथा ।। २ ।।

या घरकुलात पुण्यवान सारी
साईमय ही सगळी झाली
भेटीसाठी या ऐकूनी हाक अनंता ।। ३ ।।

सकलांची करता बाबा दुःखे दूर
माझाच न पडावा तुम्हा तसाच विसर
आता सबुरी न उरली साई भगवंता ।। ४ ।।

**— सौ. रेखा भा. माहीमकर**
अमरज्योती को.हौ. सोसायटी,
बिल्डिंग नं. २२, फ्लॅट नं. १६, २ रा मजला,
चार बंगला, जे.पी. रोड, अंधेरी (पश्चिम),
मुंबई-४०० ०५८.



# साईभक्तांना सप्रेम भेट

इंदूरचे परमसाईभक्त व प्रख्यात कायदेपंडित न्यायमूर्ती मेघःश्याम भगवंत रेगे (रेगे-अवस्थी जोडीपैंकी) हे १९१० साली श्री साईबाबांच्या दर्शन भेटीसाठी शिर्डीस गेले. बाबांच्या प्रथम भेटीतच ते मंत्रमुग्ध झाले. स्वतः श्री बाबांनी आपले एक चित्र श्री. रेगे यांना दिले. श्री बाबांची आजवर अनेक छायाचित्रे प्रसिद्ध आहेत पण श्री बाबांच्या स्वहस्तेचे हे छायाचित्र हे महत्व जाणून आम्ही हे छायाचित्र भक्तांसाठी मुद्दाम प्रसिद्ध करीत आहोत. न्यायमूर्ती रेगे यांच्या संस्कृत पंडित वयोवृद्ध कन्या कु. शांताबाई यांनी हे चित्र खास साईभक्तांसाठी पाठविले आहे.

# साईनाथ या हो

साईनाथ या हो, साईनाथ या हो
अंतरंगी नाथा, पुजा मांडली हो ॥ धृ. ॥

सजविले सिंहासन, देह मंदिराचे
लावियले निरांजन, श्रद्धा सबुरीचे
नाम साधनेचा, गंध टिळा ल्या हो ॥ १ ॥

दिली धुनी ठायी, षड्रिपु आहुति
भक्ती भावनेची, दिव्य फुले हाती
चरणी वाहतो मी, स्वीकारुनी घ्या हो ॥ २ ॥

नैवद्य अनंता, उभ्या जीवनाचा
श्वासातुनि गातो, भाव आरतीचा
जन्मभरी देवा, सोबती रहा हो ॥ ३ ॥

— श्री. ग. रा. पालकर
२३३/२ दारुवाला चाळ,
बझार वॉर्ड, कुर्ला, मुं. ७०

# ॥ श्री साई ॥

शब्द बद्ध करू कसा, साई वरील श्रद्धेचा
अंतरंगी फुलत असे, कमळ साईस वाहण्या
प्रेमधर्मांच स्फुरतो आज साई गुण गाव्या
मी अशी, मी तशी क्षणीक भ्रमीक का होते?
पुनश्च आठविता साईरूप, तल्लीन मग होते
साईपुढे नम्र होऊनी, सुखदुःख मागते सारे
सदैव सुखदुःखासंगे, साई मज सोबतीस लाभे
मी कैसी विसरले केवळ मी नावातच मी पण आहे
माझे मीपण हेच उधारीचे रूप उधारीची काया
साईच आहे शतजन्मीचे सोबत
प्रकाश अडविता पाठीशी सावली उरते
कधी काळी साई अन् माझे जडेल का नाते?
हीच सारी आशा हीच सारी खंत मज साठी असे.

— कु. लिना गोविंद पराडकर
१०/ब, चौवा चंदन सोसायटी, जोगेश्वरी (वेस्ट)

# शिरडीवृत्त

## माहे जानेवारी ८६

या महिन्यात श्री साईबाबांचे दर्शनासाठी साईभक्तांची गर्दी बरीच होती. काही कलाकारांनी श्रींच्या पुढे हजेरी दिली ती खालीलप्रमाणे —

**कीर्तन —** १) ह.भ.प. मधुकर गणेश सूर्यवंशी, संस्थान गवई- कीर्तनकार प्रवचनकार यांची कीर्तने एकादशी व महत्वाचे दिवशी झाली.
२) ह.भ.प. विश्वनाथ महाराज सुराळेकर, तालुका- वैजापूर.
३) ह.भ.प. श्रीमती जानकीबाई इंगळे, गोरेगांव.

**प्रवचन —** ह.भ.प. लक्ष्मण महाराज वाकचौरे, शिरडी.

**भजन, गायन, वादन, नृत्य इ. —** १) श्री. भोलानाथ समेळ, गिरगाव. २) श्री. नंदकुमार सारंगधर, गिरगाव. ३) श्री. रतनलाल शर्मा, धंतोली, नागपूर. ४) श्री. वासुदेव दयाळ, नागपूर. ५) सौ. दिप्ती दिनकर मातोंडकर, डोंबिवली. ६) सौ. मंजिरी मुतालिक, नौपाडा. ७) ह.भ.प. सदाशिव कृष्ण पुराणिक (रेडिओ स्टार) आळंदी. ८) श्री. विजयकुमार, सिकंदराबाद. ९) श्री वैभव कला दरबार, कोल्हापूरचे पुढील वीस कलाकार सर्वश्री सुभाष हिलगे. १०) श्री. प्रकाश हिलगे. ११) श्री. उदयराज पवार. १२) श्री. विजय दळवी. १३) श्री. अशोकराव उपाध्ये. १४) श्री. सुरेश मोरे. १५) श्री. बाबू पवार. १६) श्री. गुलाब देसाई. १७) श्री. धीरज वावारेकर. १८) श्री. मामा खेडेकर. १९) श्री. अशोक चव्हाण. २०) श्री. संभाजी. २१) श्री. बाळासाहेब शिंदे. २२) कु. आशू वराळे. २३) कु. लता पाटील. २४) कु. राजश्री शिंदे. २५) कु. कल्पना अंधारे. २६) कु. शुभांगी पेंडसे. २७) कु. अरुणा वाकरेकर. २८) श्रीमती माई वराळे. २९) श्री. किशोर दादाजी जाधव, चंद्रपूर. ३०) सौ. प्रमिला दत्तात्रय पैठणकर, नासिक. ३१) सौ. संगीता संजय धुरु, सोपारा निर्मळ. ३२) श्री. शिवराम बाबूराव बिडवे, संगमनेर. ३३) श्री. अरुण ओंकारदास सोमाणी, संगमनेर. ३४) श्री. पुंडलीक महाराज आळंदी. ३५) श्री साईकृपा भजन मंडळ, वडाळा. ३६) श्री गोपाळनारी भजन मंडळ, खार. ३७) श्री. विजय धोंडू साखरकर, गोरेगांव. ३८) डॉ. एस. के. खरवंडीकर, अहमदनगर. ३९) वेदशास्त्र संपन्न द.ग. पाठकशास्त्री, अहमदनगर. ४०) सुपर स्टार ऑर्केस्ट्रा मुंबईचे पुढील तीस कलाकार सर्वश्री मनोहर पांडूरंग वाळवे. ४१) श्री. एकनाथ मिराशी. ४२) श्री. समर्थ नारायण आयरे. ४३) श्री. सुधीर शिरवडकर. ४४) श्री. प्रकाश राणे. ४५) श्री. अरुण राणे. ४६) श्री. अरुण शिर्के. ४७) श्री. सूर्यकांत तिळवे. ४८) श्री चंद्रकांत तिळवे. ४९) श्री. सिद्धार्थ पांचाळ. ५०) श्री. दिपक तांबे. ५१) श्री. तानाजी हडसे. ५२) कु. कलावती परब. ५३) श्री. अविनाश पेडणेकर. ५४) श्री. नारायण विठोबा आयरे. ५५) श्री. संजय आयरे. ५६) श्री. सुनील आयरे. ५७) श्री. सुरेश

[illegible]. ५८) श्री. संजय नार्वेकर. ५९) श्री. सुदाम पांचाळ. ६०) श्री. सुनील ठाकूर, ६१) श्री. संजय मिराशी. ६२) श्री. दिलीप राणे. ६३) श्री. शंकर काशे. ६४) श्री. शालिग्राम शर्मा. ६५) श्री. रमेश मिराशी. ६६) श्री. रमेश कांबळी. ६७) श्री. अशोक [illegible]. ६८) श्री. अशोक परब. ६९) श्री. चंद्रकांत मिस्त्री. ७०) श्री. मनोहर विष्णू परब, मुंबई. ७१) श्री. सुरेश गणपत म्हात्रे, चेंबूर. ७२) श्री दत्तगुरु प्रासादीक भजनी मंडळ, जोगेश्वरी. ७३) श्री. जयवंत कुलकर्णी, मुंबई. ७४) श्री साईधाम मित्र मंडळ, अविनाश [illegible], मुंबई. ७५) जादुगार एस. व्ही. कुमार, देवळाली, नासिक. ७६) सौ. जयश्री [illegible] सिसोदे, नासिक रोड. ७७) सौ. वीना बन्सीलाल शिसोदे. ७८) श्री. आंबादास [illegible] बेरे, दादर. ७९) श्री. भालचंद्र पाटील हिरगांवकर, संचालक, संगीता महाडीक [illegible] मंडळ, पुणे. ८०) श्री. आबासाहेब भैलूमे, कर्जत. ८१) श्री. बबन किसन [illegible], कर्जत. ८२) श्री. बाबा बळवंत भैलूमे. ८३) श्री. भाऊराव निवृत्ती भैलूमे. ८४) विशालाक्षी अभिशंकर, बंगलोर. ८५) पांडूरंग भजनी मंडळ, रायलसीमा. ८६) ह.भ.प. बाबुराव नरोडे, रेडीओस्टार, कोपरगांव. ८७) श्री. बाळाराम कुलकर्णी, सावळी विहीर. ८८) श्री. हीरालाल उपाध्याय, सावळी विहीर. ८९) मालती कपिलेश्वरी, मुंबई. ९०) श्री साईनाथ भजनी मंडळ, परेल. ९१) श्री अवधूत प्रासादिक मंडळ, बोरीवली. ९२) श्री. शिवराम गोविंद घोगले, ताडदेव. ९३) श्री. एस. बी. शेरे, डोंबिवली. ९४) श्री साईनाथ [illegible] भजनी मंडळ, ताडदेव. ९५) श्री. महादेव सन्याप्पा मुगळीकर, कोल्हापूर, ९६) श्री जंगबहादूर लोकगीत पार्टी, वाराणसी.

**प्रजासत्ताक दिन** — दि. २६ जानेवारी १९८६ रविवार रोजी सकाळी ७.३० वाजता संस्थानमध्ये माननीय कार्यकारी अधिकारी श्री. रा. द. बन्नेसाहेब यांचे शुभहस्ते ध्वजवंदन कार्यक्रम झाला. गावातील प्रतिष्ठित नागरिक, श्रींच्या दर्शनासाठी आलेले साईभक्त, साईनाथ माध्यमिक विद्यालयातील शिक्षक वर्ग, विद्यार्थी-विद्यार्थीनी, संस्थान कर्मचारी, सेवेकरी, बॅण्डपथक, होमगार्डस्, पोलीस उपस्थित होते. कार्यक्रम उत्साहाने साजरा झाला. उपस्थितांना चहापान दिल्यावर कार्यक्रम समाप्त झाला.

**बक्षीस समारंभ** — सन १९८५ सालाकरिता उत्कृष्ट स्वच्छता कामगारासाठी ठेवलेले सौ. [illegible]बाई शंकरराव गोडखिंडी पारितोषिक (चांदीचे पदक) श्रीमती चाँदबी शेख पठाण, कायम स्वच्छता कामगार. श्री साईबाबा संस्थान शिरडी याना देण्यात आले. तसेच सन १९८५ सालाकरिता श्री साईनाथ रुग्णालयातील उत्कृष्ट कामगारांसाठी ठेवलेले श्री. अशोक शंकरराव गोडखिंडी पारितोषके (चांदीचे पथक) श्री. माधव मुरलीधर [illegible], कायम वॉर्ड बॉय, साईनाथ रुग्णालय, श्री साईबाबा संस्थान शिरडी याना देण्यात आले.

**हवापाणी** — शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही. पहाटे थंड गारवा असतो.

# मार्च १९८६

या महिन्यात साईभक्तांची दर्शनासाठी गर्दी मोठ्या प्रमाणात होती काही कलाकारांनी श्रीच्या पुढे हजेरी दिली ती खालील प्रमाणे—

**कीर्तन:-** १) ह.भ.प. श्री. मधुकर सूर्यवंशी, संस्थान गवई यांची कीर्तने एकादशी व महत्वाचे दिवशी झाली.

२) ह.भ.प. लक्ष्मण महाराज वाकचौरे शिर्डी

३) ह.भ.प. लक्ष्मण आनंदा मिरजकर, सांगली.

**प्रवचन:-** १) ह.भ.प. विश्वनाथ बंडू सहाने. सुराळे वैजापूर

२) ह.भ.प. रघुनाथ विठोबा व्हले व्हलेवाडी, राजगुरूनगर

**भजन, गायन, वादन इ.:-** १) श्री. बी. सत्यनारायण, शिकंदराबाद. २) श्री. भालचंद्र सस्वरुपे, रायसेन. ३) सौ. अंजनी निवृत्ती जाधव, आळे. ४) श्री. गोकुळ घोडके, राहता. ५) श्री. रतनकुमार काशीकर, पुणे. ६) श्री. नंदकुमार भाडवलकर, पुणे. ७) श्री. गंगाधर जाधव, पुणे. ८) श्री. नंदकुमार दत्तसेवक, पुणे. ९) श्री. पी.यू. पिल्ले, डॉ. नागेश्वरराव, विजयवाडा. १०) कुमार सुहास वैद्य, नासिक. ११) श्री. नंदकुमार सामंत, बोरीवली. १२) श्री. अरविंद हंबर्डे, बोरीवली. १३) सौ. शोभना म. जावळे, विलेपार्ले. १४) श्री. रतनलाल शर्मा, नागपूर. १५) श्री. शिवाजी दत्तात्रय बोडके, माण. १६) श्री. आर.ए. राऊत, बोरीवली. १७) श्री. महादेव अनंतराव किर्लोस्कर, कोल्हापूर. १८) श्री. भिकाजी सावळेराम गरगुळ, राजूरी. १९) श्रीमती उषा खचाळ, मुंबई. २०) श्रीमती मोसमी चक्रवर्ती, पुणे. २१) श्री. रामा चक्रवर्ती, पुणे. २२) सौ. प्रतिभा देऊसकर, ठाणे. २३) श्री. कृष्णा गवस, गोरेगाव. २४) पंडीत संगीतरत्न, नन्हेबाबू कुँवर, बिदर. २५) श्री. बी.एस्. शंभरकर, डोंबिवली. २६) कु. आशा, बिदर.

**हवापाणी:-** शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही.

# एप्रिल १९८६

# रामनवमी उत्सव कार्यक्रम

या महिन्यात साईभक्तांची श्री साईबाबांच्या दर्शनासाठी बरीच गर्दी होती. श्री सच्चिदानंद साईनाथ महाराज शिरडी श्री रामनवमी उत्सव सालाबादप्रमाणे गुरूवार दि. १७।४।८६ ते शनिवार दि. १९।४।८६ पर्यंत ३ दिवस साजरा झाला. दिवसेंदिवस श्री साईबाबांचे दर्शनासाठी साईभक्तांची गर्दी मोठ्या प्रमाणात वाढते त्यामुळे उत्सवात कोणत्याही प्रकारे गैरसोय होऊ नये म्हणून श्री साईबाबा संस्थानने एक महिना अगोदर पासूनच तयारी ठेवली होती. त्यामुळे योजलेले सर्व कार्यक्रम व्यवस्थीत पार पडले.

**उत्सवाचा प्रारंभ दिन- गुरूवार दि. १७.४.८६—** रोजी नित्यकार्यक्रमाव्यतिरिक्त सकाळी ६ वाजता श्रींच्या फोटोची व पोथीची मिरवणूक समाधी मंदिरातून गुरूस्थानमार्गे द्वारकामाईत गेली. त्या ठिकाणी श्रींच्या फोटोची स्थापना चांदीच्या भव्य सिंहासनावर झाल्यावर श्री साई सच्चरीत अध्याय वाचनास सुरुवात झाली. दुपारी ४.३० ते ६.३० पर्यंत ह.भ.प. श्री. मनू महाराज, कोकलेगावकर, नांदेड यांचे सुश्राव्य कीर्तन झाले. रात्रौ ७.३० ते ९.०० व ११.०० ते पुढे श्री. जयवंत कुलकर्णी, पार्श्वगायक, सिने-गायक मुंबई यांचा गायनाचा कार्यक्रम झाला. रात्रौ ९.१५ ते ११.०० श्रींचे पालखीची गावातून भव्य मिरवणूक काढण्यात आली स्थानिक लोकांनीच व भक्त मंडळींनी गारूड भारूड कार्यक्रम केले. श्री. रघुनाथ सांडभोर, सिने-कलाकार पुणे यांचा भारूड कार्यक्रम झाला. त्यानंतर वाद्यांचे गजरात श्रींची पालखी मिरवणूक समाधी मंदिरात आली. शेजारती झाली.

**उत्सवाचा मुख्य दिवस दिवस:- शुक्रवार दि. १८.४.८६** रोजी उत्सवाचा मुख्य दिवस असल्याने पहाटेपासूनच श्रींच्या दर्शनास भक्तांच्या रांगा लागल्या होत्या. नित्य कार्यक्रमाव्यतिरिक्त सकाळी ६ वाजता श्रींच्या फोटोची व श्री साईसच्चरीत ग्रंथ वाचन समाप्तीची मिरवणूक द्वारकामाईतून मंदिरात आली. त्यानंतर गावातून कावडी मिरवणूकीचा मोठा कार्यक्रम झाला. शिरडीतील भाविक मंडळी व साईभक्त आदले दिवशी रात्री कोपरगावमुक्कामी जाऊन गोदावरी नदीचे पाणी घेऊन नऊ मैल पायी चालत आले. सकाळी ६.३० वाजता संस्थान विश्वस्तांनी पूजा केल्यावर अंदाजे बाराशे ते तेराशे कावडींची मिरवणूक वाजत गाजत गावातून निघाली. मंदिराजवळ मिरवणूक आल्यानंतर सुवासिनींनी कावडीस ओवाळले. नंतर कावडी आणणाऱ्या प्रत्येकाने बाबांच्या समाधीस स्नान घातले.

सकाळी १०.३० ते १२.३० पर्यत ह.भ.प. मनू महाराज कोकलेगावकर, नांदेड यांचे रामजन्म कीर्तन झाले. सायंकाळी ४ वाजता श्रींच्या निशाणांची व ४.४५ वा. श्रींच्या रथाची गावातून मिरवणूक निघाली. मिरवणूक आल्यावर धुपारती झाली. रात्रौ १० ते सकाळी ६ वाजेपर्यंत उपस्थित कलाकारांनी श्रींच्या पुढे हजेऱ्या दिल्या. रात्रभर जागर झाला. मंदिर साईभक्तांना दर्शनासाठी रात्रभर खुले ठेवले होते.

**उत्सवाचा सांगता दिन- शनिवार दि. १९.४.८६** नित्यकार्यक्रमाव्यतिरिक्त ह.भ.प. मनू महाराज कोकलेगांवकर, नांदेड यांचे गोपाळकाला कीर्तन १०.३० वा. सुरू झाले. दहीहंडी व मध्यान्ह आरती झाल्यानंतर तीर्थप्रसाद वाटण्यात आला. रात्रौ ७.३० ते १० श्री. के. राजकुमार केतकर, नटराज नृत्य निकेतन ठाणे यांचा नृत्य कार्यक्रम झाला. रात्रौ १० वा. शेजारती झाली व उत्सव समाप्त झाला.

**हवापाणी-** शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही. काही कलाकारांनी श्रींच्या पुढे हजेरी दिली ती खालील प्रमाणे —

**कीर्तन-** १) ह.भ.प. श्री. मधुकर गणेश सूर्यवंशी, संस्थान गवई यांची कीर्तने एकादशी व महत्वाचे दिवशी झाली. १) ह.भ.प. श्री. मनू महाराज कोकलेगांवकर, नांदेड ३) ह.भ.प. विश्वनाथ बंडू सहाने सुराळे (वैजापूर)

**प्रवचन** — ह.भ.प. विश्वनाथ बंडू सहाने सुराळे.

**भजन, गायन, वादन, नृत्य इ.** — १) पंडीत नन्हे बाबू कुंवर संगीत रत्न, बिदर. २) श्री. बी.एस. शंभरकर डोंबिवली. ३) कु. आशा बिदर. ४) श्रीमती नटेश्वरी गुप्ता हैद्राबाद. ५) श्री साईबाबा भजनी मंडळ शिर्डी. ६) श्री. डॉ. कोमल मुजुमदार जमशेदपूर ७) श्री अनंत महाजनी ग्वाल्हेर ८) श्री. रमाकांत जोशी. नांदेड. ९) श्री. कचरूलाल तरटे नांदेड १०) श्री अनिल पंढरीनाथ उत्तरवाल नांदेड ११) श्री श्रीराम सातर्डेकर परेल. १२) श्री. जयवंतराव कुलकर्णी, मुंबई. १३) श्री. अशोक बाळकृष्ण कदम ठाणे १४) श्री. मनोहर बाळकृष्ण कदम १५) श्री. प्रसाद कुलकर्णी कल्याण १६) श्री. जी. मल्हेरा, पुणे १७) श्रीकला हटंगडी, मुंबई. १८) श्री. अरविंद म्हात्रे. १९) सौ. सरला म्हात्रे. २०) मंजूळा हटंगडी. २१) सरीता कोडकनी. २२) रतना, मुंबई. २३) श्री. राम दत्तात्रय दैठणकर, पुणे. २४) श्री. सखाराम राघूजी गुरव, कोपरगाव. २५) श्री. कृष्णा यादव मरके, अहमदनगर. २६) श्री. गोपाळ पाराशर, मुंबई. २७) श्री. दिनेश शंकर आमले, वडाळा. २८) श्री. सुधीर संभाजी सावंत, परळ. २९) श्री. शशीकांत दत्तात्रय चिंचोरे, राहता.. ३०) श्री. रघुनाथ बाबुराव सांडभोर, पुणे. ३१) श्री. भोलानाथ समेळ, मुंबई. ३२) श्री. अनंत राणे, वांद्रा. ३३) सौ. स्नेहलता भाटे, शिर्डी. ३४) सौ. कमलाबाई देशपांडे, शिर्डी. ३५) श्रीमती लिलावती गुजराथी, शिर्डी. ३६) श्री. हरकचंद चंद्रभान रूनवाल, आलेगाव. ३७) श्री. चंद्रसेन साळगावकर, विलेपार्ले. ३८) सौ. सविता सुरेश गिजरे, पुणे. ३९) शेखर नटवरलाल विसपुते, शिर्डी. ४०) भरत नटवरलाल विसपुते ४१) श्री. शाहू भोसले, भायखळा. ४२) श्री. दौलत शर्मा, मुंबई. ४३) श्री. छबू शंकर कदमल सिन्नर ४४) संजय केशव पराडकर, दादर. ४५) श्री. नितीन डिस्कळकर, दादर. ४६) नितीन कोरगावकर, भांडूप. ४७) श्री. कचरू तरटे, नांदेड. ४८) श्री. रमाकांत जोशी, नांदेड. ४९) श्री. अनिल उत्तरवार, नांदेड. ५०) श्री. अनिल परभनवण, नांदेड. ५१) श्री विश्वास पंडीत जोशी, राजगुरूनगर. ५२) श्री. रावसाहेब देशमुख, अमरावती. ५३) अन्नपुर्णादेवी, शिर्डी. ५४) कुमार कुलकर्णी, पाथर्डी. ५५) श्री. शांताराम मिराणे, शिर्डी. ५६) श्री. विद्युत विबूराज नाईक, मुंबई. ५७) निर्मला नायडू, शिर्डी. ५८) श्री. अशोक चिंतामण राऊत, मुंबई. ५९) के. नागविरथा, हैदराबाद. ६०) श्री. सिद्धेश्वर पीसे, बार्शी. ६१) श्री. डी.जी. करडोले, वैजापूर. ६२) श्री. बी.एम. कुलकर्णी, वैजापूर. ६३) श्री. ललीतकुमार जोशी, शिर्डी. ६४) श्री. ज्ञानेश्वर रामचंद्र वैद्य, शिर्डी. ६५) श्री. वाल्मिक कचरू शेलार, वैजापूर. ६६) श्री. मधुसुदन औटी, गणेशनगर. ६७) वामन टाकसाळी, पुणतांबा. ६८) श्री. रघुनाथ सोनवणे, पुणतांबे. ६९) श्री. दिगंबर उद्धवराव भातोडे, राहता. ७०) श्री. शशीकांत दत्तात्रय नांगरे, राहता. ७१) श्री. रामदास भाऊसाहेब फाकटकर, नारायणगाव. ७२) श्री. शंकर गणपतराव शेळके, कोल्हापूर. ७३) अनिता खेडकर, संगमनेर. ७४) अलका खेडकर, संगमनेर. ७५) मधुकर पुंडलीक सकट, गांगलगाव. ७६) श्री. शहाजी

थोरात, सांगली. ७७) श्री. चैत्राम कोंडीबा लाखे, शिरवळ. ७८) श्री. पुंजाबा दवंगे, शिर्डी. ७९) सौ. भारती ईश्वरलाल मेहता, सांताक्रूझ. ८०) श्री. विष्णू दयाळ रवीदास, उन्नाव. ८१) श्री. गुंडोपंत आबा मेमान, कोल्हापूर. ८२) श्री. भिकन वसंतराव पवार, शिर्डी. ८३) श्री. शेख नबाब उमरपटेल, अस्तगाव. ८४) श्री. साहेबराव रामचंद्र देवकुडे, सायगाव. ८५) श्री. ज्ञानोबा तात्या वाडेकर, शिर्डी. ८६) श्री. पी.डी. जाधव, मुंबई. ८७) श्री. गजानन मित्रमंडळ, पुणे. ८८) श्री. मधुकर उपासनी, कान्हेगाव. ८९) श्री. वसंत दामोदर रासने, पुणे. ९०) श्री. रघुनाथ नागरे, शिर्डी. ९१) श्री. चतुर्थन नागरे, शिर्डी. ९१) श्री. शांताराम मिराणे, शिर्डी. ९३) श्री. माणिक साळी, शिर्डी.

९४) श्री. मधुकर निवृत्ती भालेराव, शिर्डी. ९५) श्री. बारावकर काका, शिर्डी. ९६) श्री. के. राजकुमार केतकर, ठाणे. ९७) श्री. किशोर तेलवणे. ९८) श्री. सुरेश करमरकर. ९९) सौ. निर्मला धारवाडकर. १००) श्री. जनार्दन मयेकर. १०१) श्री. यशवंत मोरे. १०२) श्री. राजेंद्र भोसले. १०३) कु. राजश्री करमरकर. १०४) श्री. विनायक केतकर. १०५) श्रीमती इंदिरा. १०६) श्री. सतीश नागेशराव, मुंबई. १०७) श्री. शशीकांत दळवी. १०८) श्री. बारकूशेठ मांडवकर. १०९) श्री. सुरेश अंजर्लेकर. ११०) श्री. वसंत जोशी. १११) श्री. विलास पावसकर. ११२) श्री. यशवंत नाईक. ११३) श्री. अरविंद पवार. ११४) श्री. मारुती मांजरेकर. ११५) श्री. चंद्रकांत विनेरकर. ११६) श्री. नारायण कदम. ११७) श्री. सुधाकर शिंत्रे. ११८) श्री. आत्माराम बंगाल. ११९) श्री. एकनाथ बंगाल. १२०) श्री. अनंत बंगाल. १२१) श्री. शरद गायकवाड. १२२) श्री. सुभाष कांबळी. १२३) श्री. बबलू मिस्त्रा. १२४) श्री. अरुण उबाळे. १२५) श्री. रमेश घाडीगावकर. १२६) श्री. रविंद्र परब. १२७) श्री. शशीकांत जाधव. १२८) श्री. मोहन बोलांडे. १२९) श्री. अजय गिरोडकर. १३०) श्री. दशरथ पवार. १३१) श्री. नागेश कंठक. १३२) श्री. अशोक कानडे. १३३) श्री. अरविंद जामखंडेकर. १३४) श्री. किशोर कदम. १३५) श्री. अनिल चव्हाण. १३६) श्री. शशांक तावडे. १३७) श्री. बाळाराम मोगरे. १३८) श्री. सुनील साळवी. १३९) श्री. नरेश नाईक. १४०) श्री. रमेश भाईसाहेब, १४१) श्री. सुकदेव नांदवीकर. १४२) श्री. रविंद्र कुलकर्णी. १४३) श्री. नंदकुमार चव्हाण. १४४) श्री. राजू शिर्के. १४५) श्री. मिलींद कांबळी. १४६) श्री. अनिल पुराणिक. १४७) श्री. अरुण चव्हाण. १४८) श्री. चंद्रकांत फाळके. १४९) श्री. कृष्णा पाटणकर. १५०) श्री. विलास परळकर. १५१) श्री. अविनाश सी. कुत्तरकर. १५२) सौ. अलका द. पवार. १५३) श्री. विलास महाडीक. १५४) श्री. एस.एस. वाघ, साकरवाडी. १५५) श्री. पी.आर. यादव, लक्ष्मीवाडी. १५६) श्री. एच.ए. पटेल. १५७) सौ. एम.एच. पटेल. १५८) श्री. आंबोडकर. १५९) कॅप्टन गोपाल शेट्टी. १६०) राजेश पळसकर. १६१) उमेश पावसकर. १६२) कै. तुकाराम खेडकर लोकनाट्यमंडळ, नारायणगाव. १६३) मूनीभाई १६४) विजय डेकोरेटर्स. १६५) विष्णू महादेव राऊत. १६६) श्री. के.टी. टिकू, मुंबई. १६७) विवेक मुळे.

# श्री साईबाबा संस्थान, शिरडी
## श्री साईबाबा संस्थान प्रकाशित पुस्तकांची यादी

| अनु. पुस्तकाचे नांव | भाषा | किंमत | पॅकिंग व पोस्टेज |
|---|---|---|---|
| १. श्री साई चरित्र | मराठी | ३४-५० | ६-०० |
| २. —"— | इंग्रजी | २०-०० | ४-२५ |
| ३. —"— | हिन्दी | १६-०० | ४-२५ |
| ४. —"— | कन्नड | १०-०० | ४-०० |
| ५. —"— | तेलगू | १४-५० | ५-२५ |
| ६. —"— | तामीळ | १२-०० | ४-५० |
| ७. —"— | सिंधी | २२-०० | ४-५० |
| ८. गुजराथी पोथी | गुजराथी | ३१-०० | ६-०० |
| ९. श्री साईलिलामृत | मराठी | ७-५० | ४-०० |
| १०. —"— | गुजराथी | ४-२५ | ४-०० |
| ११. अवतार व कार्य | मराठी | ६-५० | ४-०० |
| १२. स्तवन मंजिरी | मराठी | ०-३० | ३-५० |
| १३. —"— | गुजराथी | ०-३० | ३-५० |
| १४. सगूणोपासना | मराठी | ०-७० | ३-५० |
| १५. चार अध्याय | मराठी | १-२५ | ३-५० |
| १६. सगूणोपासना | सिंधी | १-२५ | ३-५० |
| १७. सचित्र साईबाबा | इंग्रजी | ३-४० | ३-५० |
| १८. मुलांचे साईबाबा | मराठी | १-५० | ३-५० |
| १९. —"— | इंग्रजी | २-०० | ३-५० |
| २०. —"— | तेलगू | २-५० | ३-५० |
| २१. —"— | गुजराथी | १-५० | ३-५० |
| २२. गाईड टू होली शिरडी | इंग्रजी | १-५० | ३-५० |
| २३. —"— | मराठी | १-५० | ३-५० |
| २४. —"— | गुजराथी | १-५० | ३-५० |
| २५. तेलगु पुजाविधी | तेलगु | — | — |
| २६. रूद्राध्याय | मराठी | ०-९० | ३-५० |
| २७. साईबाबा ऑफ शिरडी बाय प्रधान | इंग्रजी | ३-०० | ३-५० |
| २८. साईबाबा ऑफ शिरडी वाय. पी. भरूचा | इंग्रजी | ६-५० | ४-०० |

LICENCE No. 19

Licence to Post Without Prepayment
At Dadar Head Office, Bombay-14

# श्री साईबाबा संस्थान शिरडी

## फोटोंची यादी

| क्रम. फोटोचे नाव | साईज | किंमत | पोस्टेज व पॅकिंग |
|---|---|---|---|
| १ आशीर्वाद फोटो | १४" × २०" | १-८५ | ३-५० |
| २ — — | १०" × १४" | १-१५ | ३-५० |
| ३ — — | १०" × १२" | १-५० | ३-५० |
| ४ — — | ७" × २०" | ०-६० | ३-५० |
| ५ — — | ५½" × ६½" | ०-३५ | ३-५० |
| ६ — — | ४" × ५" | ०-३० | ३-५० |
| ७ — — | २" × ३" | ०-२० | ३-५० |
| ८ दगडावर बसलेले साईबाबा (रंगीत) | १४" × २०" | १-८५ | ३-५० |
| ९ (काळापांढरा) | १४" × २०" | ०-८५ | ३-५० |
| १० दगडावर बसलेले साईबाबा (रंगीत) | ३½ × ५½ | ०-६० | ३-५० |
| ११ द्वारका माई (रंगीत) | १७" × २२" | ५-७५ | ३-५० |
| १२ — — | १४" × २०" | १-६० | ३-५० |
| १३ — — | १०" × १४" | १-२५ | ३-५० |
| १४ समाधी फोटो | १३" × ९" | १-१५ | ३-५० |
| १५ — — | ८" × ६" | ०-७५ | ३-५० |
| १६ — — | ४" × २½" | ०-१० | ३-५० |
| १७ चेहरा फोटो (रंगीत) | ९" × १२" | १-६५ | ३-५० |
| १८ ऑफसेट फोटो | ९" × १३" | १-५० | ३-५० |
| १९ — — | ५" × ७" | ०-४० | ३-५० |
| २० दगडावर बसलेले बाबा ([illegible]) | ९" × १२" | ०-७५ | ३-५० |
| २१ [illegible] फोटो (बस्ट) | ३¼ × ४½" | ०-३५ | ३-५० |

श्री [illegible] संपादक यांनी श्री साईबाबा संस्थान, साई निकेतन, ८०४ बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई - ४०० ०१४, यांचे करिता गिता ऑफसेट, बी-२३, [illegible] इंडस्ट्रियल इस्टेट, नायगाव क्रॉस रोड, वडाळा, मुंबई - ४०० ०३१ येथे